Talati

# निर्देश पत्र
## मिरा - भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय : स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि. ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( सचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

| विषय | मा. महासभा<br>दि. २८/०५/२०१३<br><br>प्रकरण क्र - १० ते ११ |
|---|---|

मुळप्रत

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|

२

१२/१४

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त-१/ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०६/०५/२०१३.

## मा. महासभा

**मा. महासभा सूचना क्र. :- ०२, दिनांक ०६/०५/२०१३.**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा गुरुवार दि. १६/०५/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०२, दि. ०६/०५/२०१३ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

**मा. महासभा सुचना क्रमांक ०२, दि. ०६/०५/२०१३ सोबतची विषय पत्रिका**
**सभा गुरुवार दि. १६/०५/२०१३**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| --- | **प्रश्नोत्तरे** – |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत** – |
| १० | दि. २०/०३/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **सर्व निवडणुका** – |
| --- | **सर्व नियुक्त्या** - निरंक |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – निरंक |
| --- | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** – |
| ११ | मिरा भाईंदर महानगरपालिका मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत रहिवास वापराकरिता लागणारे आवश्यक वाहनतळ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करणेबाबत. |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** – |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ०६ मे २०१३

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. १६/०५/२०१३ रोजी आयोजित केली आहे.**
**सदर सभेकरिता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.**

| प्रश्न |
|---|
| **०६ श्री. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. ११/०१/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| 1) Details of Fire Safety measure suggested by fire department in building used/ owned by MBMC state and Central government in MBMC Juridiction area with details of their implication status. |
| A) Details of Notice & Penalty against contractor/ institution who are responsible for maintenance of electrical polls in last 9 years. |
| B) List of defaulters in paying taxes on open land with principle and penalty details why this taxes are not recovered so far. |
| **०७ श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. ०४/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) महानगरपालिकेने सन २००४ ते २०१२ ह्या कालावधीत मे. टंडन असोसिएट ह्या तांत्रिक सल्लागारास देण्यात आलेल्या कामाची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे देण्यात यावी. (अ) कामांची नावे (ब) कामाची अंदाजपत्रक रक्कम (क) कार्यादेश तारीख (ड) काम पूर्ण करण्याची मुदत (तारीखसह) |
| अ) कामाची मुदत पूर्ण होऊनही बरीच कामे पूर्ण झाली नाहीत हे खरे आहे काय? |
| ब) असल्यास अपूर्ण असलेल्या कामाचा तपशिल द्यावा? |
| क) कामे मुदतीत पूर्ण न केल्याने त्याचे विरुध्द कोणती कारवाई केली? |
| ड) कामे मुदतीत न केल्याने महानगरपालिकेचे किती नुकसान झाले? |
| **०८ श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. ०४/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भूमिगत गटार योजना कामाची एस्टीमेंट रक्कम किती आहे? |
| अ) कामाचा कार्यादेश दिनांक कोणता आहे? |
| ब) कामाची मुदत काय आहे? |
| क) महानगरपालिकने ठरविलेल्या वेळापत्रकानुसार (Bar Chart) काम झाले नाही हे खरे आहे काय? |
| ड) असल्यास, काम वेळापत्रकानुसार किती होणे आवश्यक आहे? प्रत्यक्षात आजपर्यंतच्या कामाची स्थिती काय आहे? |
| इ) काम वेळेवर न झाल्याने ठेकेदारावर कोणती कारवाई करण्यात आली आहे? |
| **०९ श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. ०४/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) महानगरपालिकेची कामे मिळविण्यासाठी महानगरपालिका लोकप्रतिनिधीना लांच देताना मे. टंडन असोसिएट्स हया तांत्रिक सल्लागाराच्या प्रतिनिधीस लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले होते हे खरे आहे काय? |
| अ) असल्यास, लांचलुचपत प्रतिबंधक कायदाखाली ज्याप्रमाणे शासकीय कर्मचाऱ्यां विरुध्द कारवाई होते त्या प्रमाणे संबंधित ठेकेदार विरुध्द कोणती कारवाई केली आहे? |
| ब) संबंधित ठेकेदारास काळया यादीमधे् टाकण्याबाबत प्रशासनाची भुमिका काय आहे? |
| **१० श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. ०४/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) शहराच्या भुमिगत गटार योजनेच्या देखरेखीसाठी नेमण्यात आलेल्या तांत्रिक सल्लागारावर आजपर्यंत किती खर्च करण्यात आलेला आहे? |
| अ) देखरेखीसाठी खाजगी तांत्रिक सल्लागार नेमूनही त्या व्यतिरिक्त महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांचे अभियंते प्रतिनियुक्तीवर नेमण्यात आले आहेत हे खरे आहे काय? |
| ब) असल्यास, किती अभियंते केव्हापासून प्रतिनियुक्तीवर आहेत? त्यासाठी महानगरपालिकेला किती खर्च झाला आहे? |
| क) तांत्रिक सल्लागाराची नेमणूक कोणी अशताही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ह्याच्या अभियंत्याची आवश्यकता आहे काय? |
| **११) श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. ०४/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मिरा भाईंदर शहर भूमिगत गटार योजना कामाचे एस्टीमेट रक्कम किती आहे? |
| अ) महानगरपालिकेने मंजूर केलेल्या निविदा दराप्रमाणे किती खर्च होणार आहे? |

| |
|---|
| ब) योजनेसाठी राज्य व केंद्रशासनाकडून किती अनुदान मिळणार आहे व प्रत्यक्षात किती अनुदान प्राप्त झाले आहे काय? |
| क) उर्वरीत रक्कम महानगरपालिका कर्ज रुपाने किती उपलब्ध केली आहे? किती रक्कम कर्जरुपाने अद्याप मिळणार आहे? |
| ड) काम पूर्ण करण्याची मुदत काय आहे? |
| इ) आजपर्यंत झालेल्या एकूण खर्च किती आहे? |
| **१२ श्री. नरेंद्र एल. मेहता मा. सदस्य यांनी दि. ०८/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मिरा भाईंदर शहरासाठी किती पाणी पुरवठा उपलब्ध होत आहे? |
| अ) सध्याचा वाढत्या लोकसंख्येला शासनाच्या भायदंडाप्रमाणे (भामकाप्रमाणे) दरडोई किती पाणी पुरवठा आवश्यक आहे? |
| ब) प्रत्यक्षात होणारा पाणी पुरवठा लोकसंख्येला पुरेसा आहे का? |
| क) नसल्यास वाढत्या लोकसंख्येला वाढीव पाणी पुरवठा उपलब्ध करण्याच्या महानगरपालिकेकडे काही योजना आहेत का? |
| **१३ श्री. नरेंद्र एल. मेहता मा. सदस्य यांनी दि. ०८/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) ठाणे जिल्ह्यातील सूर्य धरणातून उपलब्ध होणाऱ्या पाणी साठ्यावत मिरा भाईंदर व वसई विरार ह्या महानगरपालिका क्षेत्रासाठी पाणी पुरवठा करणारी प्रस्तावित योजना एम.एम.आर.डी.ए. ने तयार केली आहे. त्यास महानगरपालिकेची सहमती मागणी करणारा प्रस्ताव एम.एम.आर.डी.ए. ने महानगरपालिकेकडे सादर केला आहे हे खरे आहे काय? |
| अ) असल्यास, सदर प्रस्तावावर काय कार्यवाही झाली आहे? |
| ब) नसल्यास, केव्हा कारवाई करण्यात येईल? |
| **१४ श्रीम. प्रतिभा तांगडे-पाटील मा. सदस्या यांनी दि. ०८/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) ठाणे जिल्ह्यातील सूर्य धरणातून उपलब्ध होणाऱ्या पाणी साठ्यावत मिरा भाईंदर व वसई विरार ह्या महानगरपालिका क्षेत्रासाठी पाणी पुरवठा करणारी प्रस्तावित योजना एम.एम.आर.डी.ए. ने तयार केली आहे. त्यास महानगरपालिकेची सहमती मागणी करणारा प्रस्ताव एम.एम.आर.डी.ए. ने महानगरपालिकेकडे सादर केला आहे हे खरे आहे काय? |
| अ) असल्यास, सदर प्रस्तावावर काय कार्यवाही झाली आहे? |
| ब) नसल्यास, केव्हा कारवाई करण्यात येईल? |
| **१५ श्रीम. प्रतिभा तांगडे-पाटील मा. सदस्या यांनी दि. ०८/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मिरा भाईंदर शहरासाठी किती पाणी पुरवठा उपलब्ध होत आहे? |
| अ) सध्याचा वाढत्या लोकसंख्येला शासनाच्या भायदंडाप्रमाणे (भामकाप्रमाणे) दरडोई किती पाणी पुरवठा आवश्यक आहे? |
| ब) प्रत्यक्षात होणारा पाणी पुरवठा लोकसंख्येला पुरेसा आहे का? |
| क) नसल्यास वाढत्या लोकसंख्येला वाढीव पाणी पुरवठा उपलब्ध करण्याच्या महानगरपालिकेकडे काही योजना आहेत का? |
| **१६ श्री. लियाकत गफ्फार शेख मा. सदस्या यांनी दि. ०४/०३/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) स्थानिक शेतकऱ्यांनी आपल्या शेतात राहती घरे बांधलेली आहेत. परंतु तेथे रस्ता अस्तित्वात नाही. किंबहूना विकास आराखड्यात रस्ताही दाखवलेला नाही. अशा परिस्थितीत स्थानिक रहिवाश्यांच्या मागणीनूसार लोकहितार्थ मुंबई प्रादेशिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (३४) नुसार नवीन रस्ता तयार करता येईल का? सदर कलमानूसार महानगरपालिकेस तातडीने भूसंपादन करण्याची तरतुद असताना तातडीने कारवाई करील काय? या प्रक्रियेसाठी किती कालावधी अपेक्षित आहे. जर उत्तर नाही असेल तर कुठल्या कायद्या अंतर्गत कारवाई करता येणार नाही याबाबत सुस्पष्ट खुलासा करण्यात यावा. |
| अ) उत्तन येथे दाट लोकवस्ती असलेल्या ठिकाणी लोकांनी राहत्या घराला लागून सेप्टीक टँक बांधलेली आहेत. परंतु त्याचा आऊटलेट (मलनिःसारण विर्सजन) महानगरपालिकेच्या गटारापर्यंत पोहचणे शक्य नाही. कारण तिथंपर्यंत पोहचण्यासाठी इतरांची मालकी जमिनी, घरे वगैरे येतात. सेप्टीक टँक भरल्यानंतर त्यांच्याकडे मलनिःसारण वाहिनीमार्फत खाली करणे हा ऐकमेव पर्याय असतो. परंतु, दुदैवाने अशा ठिकाणी गाडीही पोहचू शकत नसल्यामुळे मलमुत्र आजुबाजूच्या परिसरात वाहून जाते अथवा जमिनीत मुरते त्यामुळे दुर्गंधी पसरुन रोगराई वाढत आहे. वास्तविक पाहता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १६२ व १६३ नुसार लगत जमीन मालकांच्या जागेतून महानगरपालिकेच्या मुख्य गटारापर्यंत नाला घेऊन जाण्याची तरतुद आहे. मात्र लगत जमीन मालकांच्या |

हरकतीमुळे महानगरपालिका या गोष्टींकडे बारकाईने लक्ष देत नाही. अशा परिस्थितीत उपरोक्त कलमांचा महानगरपालिका सक्तीने वापर करील काय? त्याकामी विशेष अधिकाऱ्याची नेमणूक करुन पोलिस संरक्षणामार्फत अशी कामे पार पाडण्यात येतील का?

**१७ श्री. लियाकत गफ्फार शेख मा. सदस्या यांनी दि. ०४/०३/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न**

१) मालकी किंवा सरकारी जागेतून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने बांधलेल्या व सध्या अस्तित्वात असलेल्या सार्वजनिक रस्त्यांवर अतिक्रमण किंवा जाणूनबुजून अडथळा निर्माण करीत असल्यास महानगरपालिकेकडून काय कारवाई अपेक्षित आहे? फक्त अतिक्रमण दुर करणार किंवा अशा लोकांवर एम.आर.टी.पी. ॲक्ट व इंडियन पिनल कोडचे ४३१ नुसार गुन्हा दाखल करणार का? या अगोदर अशी काही कारवाई झाली आहे का? असल्यास तपशिल द्यावा? किंवा याबाबतीत काही लोकप्रतिनिधींचे प्रलंबित प्रकरणे असल्यास माहिती द्यावी?

**१८ श्री. मदन उदितनारायण सिंह मा. सदस्या यांनी दि. १८/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न**

१) मिरा भाईंदर विकास नियंत्रण नियमावली दि. १५/१०/२००० रोजी मंजूर झाले असून दि. २८/०२/२००२ ला नगरपालिकेचे रुपांतर महानगरपालिकेत झाले असून सदर नियमावलीत किती आरक्षणे आहेत? त्याची तपशिलवार माहिती.

अ) महानगरपालिकेद्वारा विकसीत करावयाचे ३५६ आरक्षण पैकी यादीतुन छाननी केली असता प्रायमरी शाळा ८२, प्ले ग्राऊंड २०, गार्डन ९१, हायस्कुल प्ले ग्राऊंड २५, बोटनीकल प्ले ग्राऊंड १, चिल्ड्रेन ग्राऊंड १, बोट क्लब १, पार्क १, सोसीयल फारेस्ट्री १, टेक्नीकल स्कुल प्ले ग्राऊंड १, स्विमींग पुल १ वरील प्रकारे आहेत. सदर आरक्षणापैकी महानगरपालिकेने कोणकोणती व किती आरक्षणे ताब्यात घेतलेली आहेत?

ब) प्रत्येक आरक्षणाचे एकूण क्षेत्रफळ किती? व ताब्यात घेतलेले क्षेत्रफळ किती?
१) ताब्यात घेताना टी.डी.आर. द्वारे किती आरक्षणे ताब्यात घेतली?
२) समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून किती आरक्षण ताब्यात घेतले आहे?
३) रेडी रेकनर रेट प्रमाणे मोबदला देऊन किती आरक्षण ताब्यात घेतले आहे?

क) महानगरपालिकेने ताब्यात घेतलेल्या आरक्षणाचे मालकांचे नाव व प्रत्येक आरक्षणामध्ये दिलेल्या टी.डी.आर. चे क्षेत्रफळ ची माहिती देण्यांत यावी.

ड) ताब्यात न घेतलेल्या आरक्षणाचे क्र. मालकाचे नांव व कारण.

इ) महानगरपालिकेने टी.डी.आर. माध्यमाने मोबदला न देता आरक्षण ताब्यात घेतले पाहिजे होते. सदर आरक्षण ताब्यात न आल्यामुळे होत असलेल्या गैरसोयीसाठी जबाबदार कोण?

ई) वरील ३५६ आरक्षण महानगरपालिकेने विकसित करण्यांपैकी अनेक आरक्षण ते ताब्यात घेतले नाही. सदर आरक्षण खाजगी मालकांकडून कुठलेही कर न भरता व्यक्तीशः / व्यावसायीक वापराकरीता वापरली जात आहे. नियमानुसार ते वापरु शकतात काय?

**१९ श्री. अनिल भोसले मा. सदस्य यांनी दि. २९/०३/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न**

१) भाईंदर (पश्चिम) सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये श्रीम. रिटा मॉटारो ह्यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामामुळे त्या लगत असलेल्या इमारतीतील रहिवाश्यांना त्रास व व्यत्यय होत असल्याने सदर अनधिकृत बांधकाम तोडण्यात यावे अशी मागणी करणारे निवेदक विनय कॉ.हौ.सो.लि. व इतर रहिवाश्यांनी दि. ०८/०२/२०१३, दि. ११/०२/२०१३ व दि. २८/०२/२०१३ रोजी मा. आयुक्त व मा. उपायुक्त (मु.) ह्यांना भेटून दिली आहेत हे खरे आहे काय?

अ) खरे असल्यास सदर निवेदनानुसार अद्याप पर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत?

ब) सदर इमारत अनधिकृत असल्याने ती तोडण्याची कारवाई केव्हा करण्यात येईल?

**२० श्री. अनिल भोसले मा. सदस्य यांनी दि. ३०/०३/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न**

१) भाईंदर (पश्चिम) सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या बांधलेल्या इमारती संदर्भात महानगरपालिके विरुध्द दाखल केलेले सर्व दावे मा. न्यायालयाने फेटाळल्यानंतर मनपाच्या विधी अधिकारी यांनी सदर अनधिकृत इमारत तोडण्यात यावे असे निर्देश प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.१ ह्यांना मनपा/विधी/२३६/२०१२-१३, दि. ०६/०३/२०१२ रोजी दिले आहेत हे खरे आहे काय?

अ) खरे असल्यास मनपाच्या विधी अधिकाऱ्यांच्या निर्देशनानुसार कारवाई न करण्याची कारणे काय आहेत?

ब) निर्देशानुसार केव्हा कारवाई करण्यात येईल?

**२१ श्री. अनिल भोसले मा. सदस्य यांनी दि. ३०/०३/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न**

१) भाईंदर (पश्चिम) सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या बांधलेल्या इमारत झुकल्याने त्यापासून लगतच्या इमारतींना व त्यातील रहिवाश्यांना धोका निर्माण झाल्याने सदर झुकलेल्या इमारती व विकासका विरुध्द कारवाई करण्याची मागणी करणाऱ्या निवेदक विनय कॉ.हौ.सो.लि., भाईंदर ह्या

गृहनिर्माण संस्थेने दि. ०७/१२/२०१२, दि. ०२/०१/२०१३ व लोकशाही दिन दि. ०४/०२/२०१३ व दि. ०७/०२/२०१३ मध्ये ठेवून ही अद्यापि कारवाई झाली नाही हे खरे आहे काय?

अ) कारवाई न करण्याची कारणे काय आहेत?

ब) त्या भागातील रहिवाश्यांना होणारा धोका दूर करण्या संदर्भात केव्हा कारवाई करणार?

**२२ सौ. तारा विनायक घरत मा. सदस्या यांनी दि. ०१/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न**

सद्याच्या प्रभाग क्र. १३ मध्ये असलेल्या विकास आराखड्यातील आरक्षणाबाबत.
१) मिरा भाईंदर शहराच्या विकास आराखड्यात सद्या अस्तित्वात असलेल्या पालिका प्रभाग क्र. १३ च्या हद्दीत किती व कोणकोणती आरक्षणे आहेत? त्याचे क्षेत्रफळ, सर्व्हे क्रमांक काय आहे?

अ) किती व कुठली आरक्षणे विकसीत झालेली आहेत?

ब) किती व कुठल्या आरक्षणांवर अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम झाले आहे?

क) आरक्षणातील कुठल्या अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम व बांधकाम करणाऱ्यांवर कोणती कारवाई आजतागायत झाली आहे?

ड) किती व कोणती आरक्षणे किती टीडीआर देऊन घेतली आहेत?

इ) टीडीआर देऊन मिळालेली आरक्षणाची जागा पालिकेच्या ताब्यात आहे काय? का त्यावर अतिक्रमण झालेली आहेत?

**२३ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. ०१/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न**

१) भाईंदर (प.) भागात सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या दोन मजली इमारत बांधली आहे. ती पाडणेसंदर्भात महापालिकेने केलेल्या कारवाईच्या विरोधात संबंधित मालकाने मा. न्यायालयात दावा क्र. स्पे.सीसुट १४/२०१२ व अपिल क्र.६१/२०१२ दाखल केले होते. ते दावा-अपिल फेटाळण्याने सदर अनधिकृत इमारत तोडण्यात यावी असे निर्देश महापालिका विधी अधिकारी ह्यांनी त्यांचेकडील पत्र क्र. मनपा/विधी/२३६/२०१२-१३, दि. ०६/०६/२०१२ ने प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.१ ह्यांना दिले होते, हे खरे आहे काय?

अ) असल्यास ९ महिने कालावधी होऊनही अद्यापपर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत?

ब) अनधिकृत इमारत पाडण्याची कारवाई केव्हा करण्यात येईल?

**२४ सौ. प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील मा. सदस्या यांनी दि. ०२/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न**

१) भाईंदर (प.) भागात सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या दोन माळ्यांची इमारत बांधल्याने त्या लगतच्या विनय कॉ.हौ.सो.लि., भाईंदर गृहनिर्माण संस्था व इतर इमारतीतील फ्लॅट धारकांची हवा व उजेड बंद झाल्याने त्या त्रस्त झालेल्या फ्लॅटधारकांनी सदर अनधिकृत बांधलेली इमारत पाडण्यात यावी, अशी मागणी करणारी दि. १४/१२/२०१२, दि. ०२/०२/२०१३, दि. ११/०२/२०१३, दि. २०/०२/२०१३, दि. २८/०२/२०१३ व २४/०३/२०१३ ची निवेदने मा. आयुक्त ह्यांना प्रत्यक्ष भेटून दिली आहेत, हे खरे आहे काय?

अ) असल्यास, त्रस्त झालेल्या नागरीकांच्या निवेदनांवर अद्यापपर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत?

ब) कारवाई केव्हा करण्यात येईल?

**२५ डॉ. रमेश धरमचंद जैन मा. सदस्य यांनी दि. ०२/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न**

१) महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने मोकळ्या जागेवरील कराची परिणामकारक वसुली होण्याच्या दृष्टीने कोणत्याही जमिन मालक / विकासकाकडून मोकळ्या जागेवरील कराचा भरणा केल्याशिवाय सुधारीत बांधकाम मंजूरी, जोत्याचा दाखला, भोवगटा दाखला देण्यात येवू नये असे निर्देश देणारे आदेश मा. आयुक्त सो. ह्यांनी त्यांचेकडील आदेश क्र. मनपा/१४३/२००८-०९, दि. २२/१२/२००८ व आदेश क्र. मनपा/आयुक्त/२९४/२००९-१०, दि. २३/१२/२००९ ने नगररचना विभागास दिले होते हे खरे आहे का?

अ) असल्यास, दि. ०१/०४/२००८ ते दि. ३१/०३/२०१३ पर्यंत ह्या कालावधीमध्ये नगररचना विभागाने दिलेल्या सुधारीत बांधकाम परवानगी, ज्योत्याचा दाखला, भोगवटा दाखल ह्यांची तपशिलवार माहिती (मौजे, सर्व्हे क्र., विकासकाचे नाव, मंजुर बांधकाम क्षेत्र, मंजुरी आदेश / दिनांक व भरणा केलेल्या मोकळ्या जागेवरील कराची पावती क्र. व दिनांक) प्रत्येक वर्षवार मिळावी.

ब) मा. आयुक्त सो. ह्यांचे आदेश असताना मोकळ्या जागेवरील कराची पावती वसुली न केल्याने मनपाचे कोट्यावधी रुपयाचे आलेल्या नुकसानीस जबाबदार कोण आहे?

**२६ श्रीम. दिपिका पंकज अरोरा मा. सदस्या यांनी दि. १५/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न**

१) हमारे मिरा भाईंदर मे किटकनाशक छिडकाओ गाडी कितनी है?

अ) यह गाडी एक प्रभाग मे कितनी बार एक सप्ताह मे जानी चाहिए?

| |
|---|
| ब) अगर यह गाडी महिनों से खराब हो जाए तो हमारे पास दुसरी गाडी का बंदोबस्त है? |
| क) दुसरी गाडी न होने पर, क्या Alternative पध्दती है छिडकाओं की? |
| **२७ सौ. दिप्ती शेखर भट्ट मा. सदस्या यांनी दि. ०४/०५/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मा. आयुक्त सो. तसेच सर्व विभागीय अधिकाऱ्यांना नगरसेवकांनी पाठविलेल्या तक्रारीबाबत तसेच कामाबाबतच्या पाठपुराव्या संदर्भात पत्रांची उत्तरे किती दिवसांत दिली जातात का? असल्यास किती दिवसात देणे अपेक्षित असते? |

# मा. महासभा

# दि. २०/०३/२०१३

# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा महासभा दि. २०/०३/२०१३**

आज बुधवार दि. २०/०३/२०१३ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ७ दि. ११/०३/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | महापौर |
| २) | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | उपमहापौर |
| ३) | भोईर राजू यशवंत | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सभागृह नेता |
| ५) | मेहता नरेंद्र लालचंद | विरोधी पक्षनेता |
| ६) | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ७) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ८) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ९) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| १०) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ११) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| १२) | मयेकर सरस्वती रजनीकांत | सदस्या |
| १३) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १४) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १५) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १६) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १७) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १८) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १९) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २०) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| २१) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| २२) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २३) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २४) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २५) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २६) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २७) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २८) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| २९) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| ३०) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| ३१) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३२) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| ३३) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३४) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३५) | शरद केशव पाटील | गटनेता, भारतीय जनता पार्टी |
| ३६) | जैन गिता भरत | सदस्या |
| ३७) | जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३८) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३९) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ४०) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४१) | मॅन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४२) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ४३) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ४४) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४५) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४६) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४७) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ४८) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ४९) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ५०) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ५१) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ५२) | परमार अनिता भरत | सदस्या |
| ५३) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ५४) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ५५) | झिनत रऊफ कुरेशी | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५६) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५७) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५८) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ५९) | सुजाता रविकांत शिंदे | सदस्या |
| ६०) | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | सदस्य |
| ६१) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ६२) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ६३) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ६४) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ६५) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ६६) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६७) | जैन सिमा महेंद्र | सदस्या |
| ६८) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ६९) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ७०) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ७१) | भट्ट दिप्ती शेखर | सदस्या |
| ७२) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ७३) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ७४) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ७५) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७६) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ७७) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ७८) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७९) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ८०) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ८१) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ८२) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ८३) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ८४) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ८५) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ८६) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| २) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| ३) | प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| ४) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ५) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |

**रजेचा अर्ज –**

| | | |
|---|---|---|
| १) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ३) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |

**मा. महापौर :-**

आजच्या सभेकरीता उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत करीत आहे. सदरची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी अशी माझी विनंती आहे. आजच्या सभेमध्ये सभागृहातील वरिष्ठ सदस्या श्रीम. ग्रिटा फॅरो व सौ. प्रभात प्रकाश पाटील या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये सलग पाच वेळा निवडुन आल्याने त्यांचा आजच्या सभेमध्ये मा. आमदारांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात येणार आहे. तसेच पद्मश्री पुरस्कार विजेते मा.श्री. ब्रम्हदेव राम पंडीत यांचा सत्कार देखील आज करण्यात येणार होता परंतु ते काही कामानिमित्त दिल्ली येथे गेलेले असल्याने आज येथे उपस्थित राहू शकत नाहीत.

**प्र. नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा बुधवार दि. २०/०३/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०७, दि. ११/०३/२०१३ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. आजच्या मा. महासभेत पद्मश्री पुरस्कार विजेते श्री. ब्रम्हदेव राम पंडीत व ज्येष्ठ नगरसेविका श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो व सौ. प्रभात प्रकाश पाटील यांचे मा. आमदारांच्या हस्ते सत्कार आयोजित केलेले आहेत. तरी तो सत्कार समारंभाचा कार्यक्रम आत्ता सुरु होणार आहे. मा. आमदारांचे सभागृहामध्ये आगमन होत आहे. सन्मा. आमदार श्री. गिल्बर्ट जॉन मेंन्डोंसा यांचे स्वागत मा. आयुक्त श्री. सुरेश काकाणी साहेब करत आहेत. मा. सदस्या श्रीम. ग्रिटा फॅरो यांच्याविषयी थोडक्यात माहिती आहे. सन्मा. सदस्या श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो ह्या सन १९९१, १९९७, २००२, २००७ व २०१२ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये सलग पाच वेळा निवडून आलेल्या आहेत. वेळोवेळी त्यांची विवीध समित्यांवर सदस्य म्हणून नेमणूक झालेली असून समितींच्या कामकाजामध्ये हिरीरीने सहभाग घेऊन त्यांच्या पक्षाने त्यांचेवर सोपविलेली जबाबदारी त्यांनी व्यवस्थितरित्या पार पाडलेली आहे. सन २०१२ च्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये विजयी झालेवर पक्षाने त्यांचेवर महिला व बालकल्याण समितीच्या सभापती पदाची जबाबदारी सोपविलेली आहे. दि. ०८ मार्च २०१३ रोजी जागतीक महिला दिनाचे औचित्य साधून त्यांनी महिलांसाठी खास कार्यक्रम आयोजित करुन शहरातील महिलांवर प्रभाव पाडून आपल्यातील नेतृत्वाची चुणूक दाखविलेली आहे. सन्मा. सदस्या श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो यांची कौटूंबिक राजकीय पार्श्वभूमी पाहीली तर त्यांचे बंधू व आजच्या सत्कार प्रसंगी उपस्थित असलेले सन्मा. आमदार श्री. गिल्बर्ट जॉन मेंडोंसा यांनी ग्रामपंचायतीमध्ये सरपंचापासून नगरपालिकेमध्ये प्रथम नगराध्यक्ष पद भुषविले आहे. तसेच त्यांच्या वहिनी सन्मा. सौ. मायरा गिल्बर्ट मेंडोंसा यांनी देखील महानगरपालिकेच्या प्रथम महापौर होण्याचा मान प्राप्त केलेला आहे. व्यासपिठावर उपस्थित मा. महापौर सौ. कॅटलीन परेरा या देखील त्यांची भाची असून या शहराच्या विकासाकरिता त्यांच्या कुटुंबाने भरपूर योगदान दिलेले आहे. सार्वत्रिक निवडणूक २०१२ मध्ये निवडून येऊन त्यांनी सलग पाच वेळा निवडूकीमध्ये जिंकून येण्याचा मान प्राप्त केलेला आहे. करिता आज या ठिकाणी मा. आमदार श्री. गिल्बर्ट जॉन मेडोंन्सा व विधान परिषद सदस्य,श्री. मुझफ्फर हुसैन यांच्या शुभहस्ते व मा. महापौर सौ. कॅटलीन परेरा, मा. उपमहापौर श्रीम. सय्यद नुरजहॉ नझर हुसैन यांच्या उपस्थितीमध्ये जाहिर सत्कार करण्यात येत आहे. तसेच मा. सदस्या सौ. प्रभात प्रकाश पाटील यांच्याविषयीची थोडक्यात माहिती आहे. सन्मा. सदस्या सौ. प्रभात प्रकाश पाटील ह्या तत्कालीन नगरपालिका तसेच सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये सलग पाच वेळा निवडून आलेल्या आहेत. सन १९९१ च्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये प्रथमतः निवडून आलेल्या होत्या. यावेळी त्यांनी सभापती, महिला व बालकल्याण समिती हे पद भुषवून महिला व बालकांसाठी विविध योजना राबविल्या होत्या तद्नंतर १९९७, २००२, २००७ व २०१२ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये निवडून आलेल्या आहेत. सन २००७ मध्ये निवडून आल्यानंतर त्यांनी सभागृह नेते हे अतिमहत्वाचे पद भुषवून सभागृहामध्ये विरोधी पक्ष व सत्ताधारी पक्ष या दोघांमध्ये खेळीमेळीचे वातावरण निर्माण करुन सभागृहाचे कामकाज व्यवस्थितरित्या पार पाडलेले आहे. सन्मा. सदस्या सौ. प्रभात प्रकाश पाटील यांची कौटूंबिक राजकीय पार्श्वभूमी पाहीली तर त्यांचे सासरे स्वातंत्र्यसेनानी कै. मोरेश्वर पाटील यांनी तत्कालीन ग्रामपंचायतीमध्यें सरपंच पद तसेच जिल्हा कृषी समितीचे अध्यक्षपद भुषविले आहे तसेच त्यांच्या माहेरी त्यांचे चुलत भाऊ श्री. मनोहर साळवी व राजाराम साळवी सारखे मातब्बर राजकीय नेत्यांचा सहवास लाभलेला आहे. सार्वत्रिक निवडणूक २०१२ मध्ये निवडून येऊन त्यांनी सलग पाच वेळा निवडूकीमध्ये जिंकून येण्याचा मान त्यांनी प्राप्त केलेला आहे. करिता आज या ठिकाणी मा. आमदार श्री. गिल्बर्ट जॉन मेडोंन्सा, विधान परिषद सदस्य, श्री. मुझफ्फर हुसैन यांच्या शुभहस्ते व मा. महापौर सौ. कॅटलीन परेरा, मा. उपमहापौर श्रीम.

सय्यद नुरजहॉ नझर हुसैन यांच्या उपस्थितीमध्ये जाहिर सत्कार करण्यात येत आहे. तरी दोन्ही सन्मा. सदस्या यांनी कृपया मंचावर यायचे आहे.

(सन्मा. सदस्या श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो व सन्मा. सदस्या सौ. प्रभात प्रकाश पाटील यांना मा. आमदार श्री. गिल्बर्ट जॉन मेंन्डोंसा यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.)

**नगरसचिव :-**

मा. उपमहापौर यांच्यामार्फत सत्कार करण्यात येत आहे. (मा. उपमहापौर श्रीम. सय्यद नुरजहॉं नजर हुसैन यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मा. सदस्या ग्रीटा फॅरो व सन्मा. सदस्या सौ. प्रभात पाटील यांचा सत्कार करण्यात आला.)

**ग्रिटा फॅरो :-**

व्यासपिठावरील माझे बंधु आमदार श्री. गिल्बर्ट मेंन्डोंसाजी, त्याचबरोबर उपस्थित असलेल्या मा. महापौर श्रीम. कॅटलीन परेराजी, मा. उपमहापौर श्री. सय्यद नुरजहॉं नजर हूसैन जी, मा. आयुक्त साहेब, सभागृहात उपस्थित असलेले सर्व सन्मा. नगरसेविका व नगरसेवक संपूर्ण अधिकारी वर्ग, पत्रकार बंधु-भगिनी, व उपस्थित असलेले नागरीक बंधु. आज हा माझा सभागृहामध्ये सत्कार होत आहे, याचे संपुर्ण श्रेय मी माझे बंधु प्रथम मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेंन्डोंसाजी यांना देत आहे. आत्ता मला सांगण्यासारखे काही राहीले नाही. माझी पुर्ण हीस्टरी वाचली गेली. परंतु मी दोन शब्द सांगत आहे. जेव्हा १९९१ मध्ये महिला आरक्षण वॉर्ड झाला त्यावेळेला माझे बंधु नागरीकांबरोबर चर्चा करु लागले. ते बोलले की, आत्ता कोणाला तिकीट द्यायचे. त्यावेळेला माझे नाव समोर ठेवण्यात आले. माझ्या बंधुने माझ्या मिस्टरांशी चर्चा करुन मला निवडणुकीत उतरविले आणि त्यावेळेला माझ्यासाठी एक दालन उघडून दिले आणि खरोखर ज्या नागरीकांनी माझे नाव समोर ठेवले त्या लोकांनी मला भरगच्च मतांनी निवडुन दिले. त्यावेळेला माझ्यासमोर माझ्या ज्या भगिनी उभ्या होत्या त्यांचे डिपॉझीट सुध्दा जप्त झाले आणि खरोखर त्यावेळेला मी असा विचार केला, ज्या नागरीकांनी माझ्या बंधुना माझे नाव समोर ठेवले की, तुमच्या ज्या सिस्टर आहेत त्यांना तिकीट द्या. त्यांनी माझ्यावर जो विश्वास ठेवलेला होता, तो आत्ता पूर्ण करायला पाहिजे होता. म्हणून मी एक निश्चय केला की, इलेक्शन दिवसापूरता फक्त पक्ष आणि इतर दिवशी माणूसकी हा माझा पक्ष असणार आणि त्या तिरीरीने मी माझ्या बंधुंच्या सहकार्याने कामास लागले. मी माझ्या वॉर्डमध्ये लोकांपर्यत पोहोचले. अधिक लोक माझ्या जवळीक आले मला मतदान न करणारे होते तेसुध्दा मी काम करत असताना माझ्या जवळ आले आणि त्यामधुन मला लोकांचे प्रेम मिळाले त्यामुळे मी नेहमी केलेल्या कामाची पोचपावती म्हणून मला त्या लोकांनी सलग पाच वेळा निवडुन दिले. हे त्यांच्यावरचे माझे प्रेम आणि मीसुध्दा त्यांची कामे वेळोवेळी करुन दिली परंतु हे काम करत असताना मी विसरु शकत नाही मला प्रशासन मुख्याधिकारीपासुन कमिशनर, अधिकारी वर्ग, यांनी संपुर्ण सहकार्य केले त्यामुळेच मी माझ्या वॉर्डचे संपुर्ण काम पुर्ण करु शकले मी सर्व महिलांना एकच सांगेन की, आपली ताकद ओळखून आपण पुढे-पुढे ध्यास घेतला पाहिजे आणि ८ मार्च हा जागतिक महिला दिन न समजून रोजच आपला महिला दिन आहे आणि आपण एक नविन-नविन विक्रम करायला ठरवले पाहिजे. हाच माझा सर्व महिलांना संदेश. मला दोन शब्द बोलण्याची, मनोगत व्यक्त करण्याची संधी दिली, त्याबद्दल मी सर्वांची आभारी आहे.

**प्रभात पाटील :-**

आजच्या दोन महिलांच्या सत्कार समारंभानिमित्त इथे उपस्थित असलेले या शहराचे मा. आमदार श्री. गिल्बर्टजी मेंडोंसा, या शहराच्या मा. महापौर श्रीम. कॅटलीन परेरा मॅडम, मा. उपमहापौर श्रीम. सय्यद नुरजहॉं नजर हुसैनजी, डायसवरील उपस्थित सर्व अधिकारी, माझे सर्व नगरसेवक सहकारी मित्र-मैत्रिणी, पत्रकार बंधु आणि या शहराचे समस्त नागरीक, सर्वांना माझा नमस्कार आज ज्यांचे बोट धरुन राजकारणाची कास पकडली, मी. मा. आमदारांना संबोधुन ही गोष्ट बोलते, कारण १९९१ मध्ये जेव्हा समोर प्रपोजल आले, तेव्हा राजकारण काय किंवा निवडणुका काय हे माहिती नव्हते. तेव्हा त्यांचा एक भक्कम हात पाठीवर होता की, मी तुमच्या पाठीमागे आहे, तुम्ही लढा. असा ज्यांनी विश्वास दिला, त्यांच्याच हस्ते आजचा सत्कार होतो आहे, हे मी म्हणेन की, माझ्या आयुष्यातील सर्वात मोठे फलीत आहे की, ते आज इथे उपस्थित आहेत. त्याचे कारण एवढेच आहे की, १९९७ ला जेव्हा मी त्यांच्याकडे जनरल प्रभागातून निवडणुकीसाठी तिकीट मागितले आणि त्यावेळेला नेमके कॉंग्रेस विभाजन झाले होते. कॉंग्रेसचे दोन तुकडे झाले आणि मला असे वाटते की, मा. आमदार साहेब त्यावेळेला माझ्या तिकीटावर खुप अडले होते की, तिथे कॉंग्रेसला तिकीट द्या, म्हणजे श्रीम. प्रभात पाटील यांना द्या आणि तिथे काही तरी बिघडले. कॉंग्रेसचे दोन तुकडे झाले आणि दोन पॅनलमध्ये निवडणुका लढल्या. तरीसुध्दा ते स्वतः साशंक होते की, मॅडम लक्षात ठेवा, तिथे श्री. जयंत पाटील लढत आहेत आणि मला तुमच्यासारख्या लोकांना राजकारणातून बाद करायचे नाही तुम्ही दुसरी कडुन तिकीट मागा मी देतो पण मी म्हटले, मला तिथेच लढायचे आहे आणि त्या एवढ्या घालमेलीच्या दिवसामध्ये किंवा एक जबरदस्त आव्हान समोर असताना ते माझ्या पाठीशी पूर्णपणे खंबीररित्या उभे राहिले आणि तिथून एक आत्मविश्वास निर्माण झाला की, आपल्यापुढे कोण पुरुष आहे किंवा किती ताकदवान आहे. परंतु महिला लढली तर ती जिंकु शकते, हा विश्वास मला ९७ मध्ये मिळाला आणि त्यावेळेला सुध्दा ते माझ्या बरोबर होते. पुढे कर्म धर्म संयोगाने दोन कॉंग्रेस झाल्या. जरी ते बरोबर नसले किंवा मी त्यांच्याबरोबर नसले परंतु, संबंध तसेच

ठेवले याचे कारण आहे की, मा. आमदार साहेब आणि माझा भाऊ पक्के मित्र आहेत हे त्यांनी कधीच सांगितले नाही पण मी आज तुम्हाला सांगते त्यांची ती मैत्री आजही कायम आहे म्हणून कदाचित त्यांचे नेहमीच माझ्याकडे लक्ष राहिले. आजच्या कार्यक्रमाला माझ्या पक्षाचे मा. आमदार आले नाहीत. त्यांना काहीतरी पक्षाचा व्हीप आला आहे. त्याच्यामुळे ते उपस्थित नाहीत. परंतु, या सर्व लोकांनी, श्री गिल्बर्ट मेंडोंसा असो किंवा श्री. मुझफ्फर हुसैन असो, एका स्त्रिच्या मागे उभे राहून त्यांना खंबीर करण्यामध्ये त्यांनी जी भुमिका बजावली, त्याला तोड नाही. मी तर असे म्हणेन की, त्यानंतरसुध्दा मी ओपनमधुन लढले. एका पुरूषासमोर लढले. निवडुन आले आपली शक्ती आहे मी एवढाच संदेश देईन की, आपल्याकडे ती ताकद आहे. आपल्यामध्ये शक्ती आहे ती आपण ओळखली पाहिजे. आपल्या शक्तीला आपण खतपाणी घातले पाहिजे आणि पुरुष वर्गाकडुनसुध्दा मी अपेक्षा करेन की, त्यांनी स्त्री वर्गाचा बहुमान, सन्मान केला पाहिजे. त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे या निमित्ताने मला या महापालिकेमध्ये किंवा समाजकारणामध्ये पंचवीस वर्षे पुर्ण करण्याची, लोकांची सेवा करण्याची जी संधी मिळाली ते मी माझ्या आयुष्यातील फलीत समजते कारण जन्माला येऊन किडामुंगीसारखे सगळेच मरतात पण समाजासाठी काहीतरी करुन मरणे हे माझ्यासाठी किंवा सर्वांसाठीच भुषण ठरेल आपण समाजाच्या काही उपयोगी पडलो तर ते नक्कीच आपल्या जीवनाचे सार असेल, आपल्या जीवनाचे फलीत असेल असे मी मानते आणि ह्या निमित्ताने मी माझ्या मतदारांचे सुध्दा आभार मानते, ज्यांनी एकाच वॉर्डमधुन मी माझा वॉर्डही कधी बदलला नाही, एकाच वॉर्डमधुन सलग पाच वेळा मला निवडुन दिले त्यांनी कधीही माझा तिरस्कार केला नाही किंवा माझ्याविषयी त्यांनी नावड निर्माण केली नाही की, किती वेळा या बाईला निवडुन द्यायचे कारण त्यांनी माझ्यावर तो विश्वास दाखवला. आजच्या ह्या सत्कारातून मी त्यांचे देखील आभार मानते, त्यांचेदेखील मी धन्यवाद अदा करते आणि पक्षाने माझ्यावर जो विश्वास ठेवला, त्या पक्षाचे देखील मी आभार मानते. त्याचप्रमाणे मला आणखीन आभार मानायला पाहिजे. नगरपालिका असल्यापासून ते महानगरपालिका असल्यापर्यंत प्रत्येक अधिकाऱ्यांचे आणि कर्मचाऱ्यांचे, मी फक्त नगरसेवक करत नसताना ती सेवापण करत आहे, शाळेत शिक्षिका म्हणून नोकरी करत आहे. जेव्हा जेव्हा मी इथे येऊन काम करु शकले नाही अशा वेळी जर मी कोणत्या अधिकाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्यांना फोन केला तर, साहेब मला सांगायला या गोष्टीचा अभिमान वाटतो की, कोणत्याही अधिकाऱ्यांनी किंवा कर्मचाऱ्यांनी माझे काम थांबवले नाही की, मॅडम आल्या नाहीत. तुम्ही यायला पाहिजे किंवा तुम्ही बसून काम केले पाहिजे असा मला माझ्या २१-२२ वर्षातील असा कोणताही अनुभव नाही तर त्यांनी तातडीने माझी कामे केली आहेत आणि म्हणून त्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे देखील मी खुप-खुप धन्यवाद मानते आणि माझा जो सन्मान आयोजित केला त्याबद्दल पालिका प्रशासनाचे आणि खास करुन मा. महापौरांचे मी आभार मानते की, त्यांनी हा कार्यक्रम, महिला असल्यामुळे त्यांच्या मनात तेवढी सहिष्णुता नक्कीच आहे, तर त्यांनी हा कार्यक्रम आयोजित केला याचा मला अभिमान आहे पुन्हा एकदा सर्वांचे आभार. धन्यवाद।

**गिल्बर्ट मेन्डोंसा (मा. आमदार) :-**

व्यासपीठावर बसलेले या शहराचे मा. महापौर श्रीम. कॅटलीन परेरा, मा. उपमहापौर श्रीम. सय्यद नुरजहाँ नजर हुसैन, मा. आयुक्त साहेब, व्यासपिठावर बसलेले सर्व अधिकारी वर्ग, मा. विरोधी पक्षनेता, मा. सभागृह नेता, इथे उपस्थित असलेले सर्व सन्मा. नगरसेवक-नगरसेविका, महापालिकेचे पदाधिकारी, कर्मचारी आज माझ्या हातून जो सत्कार झाला त्याबद्दल मी फार आनंदी आहे. मी एवढेच सांगेन की, माझ्या या दोन बहीणींनी सलग पाच वेळा निवडुन येऊन ज्या लोकांची विकासाची कामे केली मी आपल्याला सर्वांनासुध्दा सांगतो की, आपणही अशीच विकासाची कामे करा आणि आपला सुध्दा इथे सत्कार झाला पाहिजे, याच्या मी तुम्हाला सर्वांना शुभेच्छा देतो. आपण मला इथे बोलावले, माझा मानसन्मान केला त्याबद्दल मी आपला सर्वांचा आभारी आहे. जय हिंद। जय महाराष्ट्र।

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, आज आपण या ठिकाणी पाच टर्म निवडुन आलेल्या सन्मा. सदस्या श्रीम. ग्रिटा फॅरो व श्रीम. प्रभात ताई पाटील, खरोखर पाच वेळा निवडुन येणे म्हणजे एक चांगले कार्य या शहरासाठी आणि समाजासाठी केले आहे. भारतीय जनता पक्षाच्या वतीने मी दोघांनाही शुभेच्छा देतो पुढील कार्यकाळासाठी आमच्या खुप-खुप शुभेच्छा.

**निलम ढवण :-**

आत्ताच श्रीम. ग्रिटा फॅरो व श्रीम. प्रभात ताई पाटील या महिलांचा जो सन्मान केला गेला त्यासाठी मी शिवसेनेच्या वतीने देखील आपले आभार मानते आणि या महिलांना पाठींबा देऊन, सन्मान करुन त्यांचा उत्साह आणि उत्तेजन वाढवले त्याबद्दल धन्यवाद।

**प्र. नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. सभागृहातील घड्याळात ११ वाजून ५५ मिनिटे झालेली आहेत. प्रश्न क्र.३ श्री. नरेंद्र एल. मेहता यांचा प्रश्न आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. मा. आयुक्त साहेब, मागच्या वेळी चर्चा झालेली त्यावेळी त्यांनी ठामपणे सांगितले होते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेने जो जास्तीचा कर वसुल केलेला आहे. त्या

नागरीकांना आत्तापर्यंत दिले गेलेले नाही. त्यावेळी आपल्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, हे संपूर्ण परत फेड करण्यात आलेली आहे हे आपल्यालासुध्दा माहिती असेल जाणीव असेल साहेब योगायोगाने तुमची बजेटची कॉपी आमच्या हातात आलेली आहे आपण ते बधितले तर याच्यावर दिसुन येते की, आपण हे पैसे परतफेड केलेले नाहीत मला जे उत्तर दिले आहे त्यामध्ये आपण जी रक्कम दाखवलेली आहे आणि याच्यात जी रक्कम दाखवलेली आहे त्यामध्ये आपल्याला दिसुन येईल, घरपट्टी कर २ करोड ३१ लाख, शिक्षण कर १ करोड, मल प्रवाह कर ६ करोड, ही टोटल आपण केली तर साधारण अकरा कोटी रुपये साहेब तुमचे असे म्हणणे आहे की, ३९ कोटी वसुल केले त्यामधुन ११ करोड परत दिले म्हणजे आपली वसुली फक्त २८ करोडच झाली का? २००९-१० ला आमची वसुली ४० करोड झाली होती कोणतीही करवाढ न करता आपण नॅचुरल वाढ धरली तरी १० टक्के नॅचुरल वाढ होते. आपण परत त्याच वर्षी ३९ करोडच दाखवता, तेपण ११ करोड जास्तीची रक्कम वसुल करुन म्हणजे ३९ मधुन मी ११ कोटी मायनस केले तर किती राहतील? २८ कोटी मग तुमचे असे म्हणणे आहे की, २८ कोटी वसुल केलेले. या संपूर्ण फिगर दिशाभुल करण्यासाठी दिलेल्या आहेत. साहेब, यावर्षात बजेटमध्ये कुठेही दाखवले नाही की, आपण किती पैसे परत दिलेले आहेत म्हणजे हे नक्की काय आहे? परत दिले की नाही?

**मा. आयुक्त :-**

मागच्या वेळेस मी स्पष्ट केले होते की, यामध्ये जी डिमांड आहे, त्या डिमांडनुसार मागच्या वर्षी जेव्हा आपण वाढीव कर लावण्याचा निर्णय घेतला. वाढीव कर लावल्यानंतर तो शासनाकडे गेला. शासनाने तो अमान्य केला. पण वाढीव कराप्रमाणेच आपल्या डिमांड नोटीस गेल्या होत्या. त्या डिमांड नोटीस प्रमाणे ज्या लोकांनी पैसे भरले होते त्यापैकी त्यांना पुढच्या वर्षी जेव्हा आपण सुधारीत बिले दिली, तर आपण अशी व्यवस्था केली आपण कॉम्प्युटराईज प्रोग्राम तयार केला. मुळ डिमांडकिती होती, वाढीव डिमांड किती होती, वाढीव डिमांड झालेली रक्कम त्यांच्या पुढच्या बिलामध्ये आम्ही समायोजित केली. उदाहरणादाखल सांगतो, समजा एखाद्याचा कर दहा हजार रुपये असेल वाढीव दराप्रमाणे तो पंधरा हजार झाला असेल आणि पंधरा हजार वसुल करण्यात आला असेल तर पुढच्या वर्षी त्यांची डिमांड पंधरा हजार न धरता दहा हजार, त्यामधुन त्यांनी मागच्या वर्षी जे पाच हजार जास्त भरले होते ते पाच हजार त्यामधुन समायोजित करण्यात आलेले आहेत. यानुसार आत्तापर्यंत आपण १५.११ कोटी म्हणजे आपली २०१०-११ ची डिमांड जर आपण विचारात घेतली, डिमांडनुसार आपल्याला २४ कोटी हे वाढीव करापोटी मिळणार होते. त्यापैकी आपण वाढीव करापोटी १५ कोटी ११ लाख वसुल केले होते. आणि १५ कोटी ११ लाख आपण पुढच्या वर्षामध्ये समायोजित केलेले आहेत. यामध्ये मी मागच्या वेळी सांगितल्याप्रमाणे काही सहकारी गृह निर्माण संस्थांचे एकत्रित बिल आपल्याकडे आलेले होते किंवा आपण एकत्रित बिल वसुल केले होते त्यांचे जे खाते होते ते संस्था आणि संस्थेचे पदाधिकारी यांच्या संयुक्त नावाने असल्यामुळे आणि दरम्यानच्या काळावधीमध्ये काही पदाधिकारी बदल झाल्यामुळे, त्यांच्या निवडणूका झाल्या किंवा कोणी राजीनामा दिला असेल किंवा आणखीन काही घटनामुळे, त्यांचे पैसे आपण परत करु शकलो नव्हतो म्हणून मी असा निर्णय घेतला आणि माझ्या सहकारी अधिकाऱ्यांना सांगितले की, जे कोणी पदाधिकारी त्यांचे आपण बाजुला ठेवून त्या सहकारी संस्थेच्या संस्थेच्या खात्यामध्ये जी ॲक्सेस रक्कम वसुल केलेली होती, तीसुध्दा वळती करा. याप्रमाणे आत्तापर्यंत आपण १५ कोटी ११ लाख वसुल केलेले आहेत २४ कोटींची अतिरीक्त रक्कम झालेली होती.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, पाण्याचा विषय वेगळाच आहे.

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये मी पाण्याचे बील धरत नाही २४ कोटीपैंकी जी १५ कोटी अतिरीक्त वसुली झाली होती ती आम्ही केलेली आहे. आत्ता आणखीन कुठे राहिलेले आहे. मी एक सांगितले की, सहकारी संस्था ज्यांचे पदाधिकारी बदललेले आहेत किंवा ज्यांचे कॉम्प्युटरायजेशन झालेले नाही आणि ज्यांनी मागचे डिमांड नोटीस घेऊन स्वतःहून भरले आहेत तेसुध्दा ती माझ्या माहितीप्रमाणे साधारणतः एक कोटी रक्कम शिल्लक आहे ती रि-व्हेरीफिकेशन करण्याची आवश्यकता आहे पण ती रक्कमसुध्दा या एक महिन्यामध्ये किंवा जास्तीत जास्त मे अखेरपर्यंत या चालु वर्षाच्या बिलामधुन समायोजित करण्यात येईल पाण्याचा प्रश्न वेगळा आहे आपण म्हणत असाल तर त्याचीही माहिती माझ्याकडे आहे पाण्याचे देखील

**नरेंद्र मेहता :-**

ते सेकंड आहे माझा हा पहिला पश्न संपवा.

**मा. आयुक्त :-**

पहिला प्रश्न म्हणजे मी आपल्याला सांगितले की, आपण ज्यांचे वसुल केले होते ज्यांचे कॉम्प्युटराइज आहे त्याचे आपण समायोजित केलेले आहे समायोजित करुन आपण १५ कोटी ११ लाख परत केलेले आहेत. ज्यांचे समायोजित करता आले नाहीत, सहकारी संस्था, त्यांचे आम्ही या बिलामध्ये समायोजित करु किंवा त्यांच्या अकाऊंटमध्ये आम्ही पैसे ट्रान्सफर करु. समजा त्यांनी जर आम्हाला माहिती, मागणी केली नाही किंवा काही केले नाही तर त्यांच्या अकाऊंटमध्ये पैसे ट्रान्सफर करु ज्यांचे मॅन्युअल बिलींग होते आपण जेव्हा प्रॉपर्टी टॅक्स वसुल करतो काही भागांमध्ये, पाच-सहा गावामध्ये मॅन्युअल बिलींग होते. त्या मॅन्युअल बिलांच्या

रिकव्हरीमध्ये तो कॉम्प्युटराइज प्रोग्राम नाही. त्यामध्ये महिना किंवा जास्तीत जास्त मे अखेरपर्यंत त्यांची रक्कम परत करण्यात येईल किंवा ती रक्कम समायोजित करण्यात येईल याप्रकरणी मी आपल्याला ग्वाही देतो.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, आपण बरेच काही सांगितले माझा मुळ प्रश्न आपल्याकडून राहून गेला. २००९-१० ला आमची वसुली ४० करोड होती त्यावेळेला कोणतीही करवाढ झाली नव्हती. २०१०-११ ला करवाढ झाली त्यावेळी तुम्ही ओरीजीनल प्लस करवाढ याप्रमाणे वसुली केली. ती जास्तीची रक्कम तुम्ही इकडे जो फिगर दिला, साधारण ११ कोटी रुपये आहे. म्हणजे घरपट्टी, शिक्षण कर आणि मलप्रवाह कर हे अकरा कोटी रुपये तुम्ही साधारण जास्तीचे वसुल केले. आत्ता तुम्ही त्यावर्षी आम्हाला टोटल रिकव्हरी ३९ करोड दाखवता म्हणजे ११ करोड वाढीव प्लस ओरीजीनल टॅक्स मी अकरा मायनस केले म्हणजे ओरीजीनल बिल तुम्ही २८ करोडच वसुल केले होते का?

**मा. आयुक्त :-**

तसे नाही कारण प्रॉपर्टी टॅक्समध्ये आपल्याला कल्पना असेल की, ज्या ज्या वेळेस प्रॉपर्टी वाढतात, प्रॉपर्टी टॅक्सचे कलेक्शन देखील वाढते प्रॉपर्टी असेसमेंट देखील वाढते नवीन प्रॉपर्टी आल्या की, त्या असेसमेंट होतात जुन्या प्रॉपर्टीमध्ये काही फेरबदल झाले तर त्यामध्ये आपण नवीन आकारणी करतो म्हणून २००९ ला किंवा २०१० ला एक विशिष्ट रक्कम होती म्हणून त्यानंतर तीच रक्कम कायम रहावी असे नाही त्यामध्ये दरवर्षी वाढ होत राहते.

**नरेंद्र मेहता :-**

मी इकडे वाढीचे बोलत नाही तुम्ही २८ केले आहे २००९-१० ला ४० करोड होते तुम्ही हे मायनस केल्यानंतर २८ करोडच राहते तर आमची २०१०-११ ची रिकव्हरी २८ करोड आहे? इकडे तुमची फिगर आहे. साहेब, दोन्ही आकडे आहेत.

**मा. आयुक्त :-**

आपण त्यामध्ये वेळोवेळी जे ॲड करतो, त्यामध्ये सरचार्ज ॲड करतो, वॉटर टॅक्स ॲड करतो, सगळी एकत्रित बिले आहेत म्हणुन कदाचित तो आपला गैरसमज असेल परंतु त्याची आपल्याला 

**नरेंद्र मेहता :-**

मग हा खोटा आहे की हा बरोबर नाही?

**मा. आयुक्त :-**

बरोबरचा प्रश्न नाही प्रॉपर्टी टॅक्स आणि प्रॉपर्टी टॅक्सवर असणारे सरचार्ज, त्यामध्ये होणारे जे दुसरे कर आहेत त्याची एकत्रित मागणी आपण जेव्हा म्हणतो तेव्हा आपण एकत्रित मागणी म्हणतो आपण नागरीकांना प्रत्येक गोष्टींचे वेगवेगळे बिल देत नाही. एकच बिल देतो त्यामुळे कदाचित तो असेल त्याची विगतवारी जर आपल्याला पाहिजे असेल तर तीसुध्दा मी आपल्याला देतो.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, विषय हा होता की, मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये ज्यावेळी करवाढ रद्द झाली. तर पुढच्या वेळी ते पैसे परत द्यायचे होते. हा सिंम्पल विषय होता मागच्या वेळी मिटींगमध्ये सांगितले की, आम्ही १०० टक्के पैसे परत दिलेले आहेत. कोणाचीही बाकी नाही. कॉमन मॅन, याला माहितीच नाही की, सिव्हरेज टॅक्स काय आहे आणि काय कोणते वाढले. १००-१५० वाढले ते भरुन तो घरी बसला आहे त्याला याबद्दल काही माहितीच नाही आत्ता मी उदाहरण सांगतो, मा. आयुक्त महोदय, आत्ता यावर्षी तुम्ही रेग्युलर टॅक्स घेतला आहे? तुम्ही मागच्या वेळी जे काही जास्त घेतले ते यावेळी मायनस करुन दिले असेल? मा. महापौर मॅडम, आत्ता तुम्ही बजेट बघितले तर पाणी वाल्यांनी पाणी लाभकर हे २०१०-११ ला आपण रद्द केले तरी यावर्षी पण त्यांचे पैसे घेतले तुम्ही बजेटमध्ये बघा तुम्ही अजुनही चालु आहे ते पैसे द्यायचे तर लांब राहिले. १ कोटी ८ लाख रुपये पाणी लाभकर आला. २००९-१०, दोन वर्षापूर्वी आपण वाढविले होते. हे तुम्ही रद्द केले नाही. परत दिले नाहीत अजून आत्ताही पैसे घेत आहोत. यावर्षीही तुम्ही दाखवता की. १ करोड रूपये आम्हाला पाणी लाभकराचे आले आहेत. म्हणजे अजूनही तुमची वसुली चालूच आहे, त्या वाढीवची परत दयायचे तर लांब राहिले.

**मा. आयुक्त :-**

आपण जे म्हणता ते वाढीव पाणी लाभकराची रिकव्हरी नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मग १ करोड ८ लाख काय आहे ?

**मा. आयुक्त :-**

त्याची रिकव्हरी नाही.

**नरेंद्र मेहता :-**

पाणी लाभकर आहे.

**मा. आयुक्त :-**

आपण जो पाणी पुरवठा लाभकर ८टक्के केला होता. तो ८ टक्के नव्याने लावला होता. तो आपण रद्द केला आणि त्याचे जवळपास ६ कोटी ६९ लाख रूपये परत सुध्दा केलेले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

ते परत दिलेले पाण्याच्या हेडमध्ये कुठेही दिसत नाहीत.

**मा. आयुक्त :-**

ते परत केलेले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

मग हे एक करोड काय आहे ?

**मा. आयुक्त :-**

हा जो आहे तो ८ टक्के मधला हा भाग नाही.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, हे एक करोड कुठले आहेत ? आत्ता पाणी लाभकर नाही मग ही एक करोड रिकव्हरी कोणती आहे?

**मा. आयुक्त :-**

तो त्याचा भाग नाही. सध्या विषय आहे की, आपण जो अतिरिक्त कर लावलेला होता. तो कर वसुल केला. तो कर वसुल केल्यानंतर त्याची आपण परतफेड केली की नाही.

**नरेंद्र मेहता :-**

एक करोड आठ लाख रुपये पाणी लाभकर हेड खाली तुम्ही यावर्षी घेतलेले आहेत ते कुठून आले?

**मा. आयुक्त :-**

तो याचा भाग नाही.

**नरेंद्र मेहता :-**

काय नाही तुमची पाणी लाभकर वसुली अजुनही चालू आहे एखाद्या व्यक्तीने दोन वर्षापूर्वी टॅक्स भरला नसेल तो आज लाभकरासहीत भरतो आहे तुम्ही पैसे ॲक्सेप्ट केले मला हे सांगा की, पाणी लाभकर काय आहे? हा कुठून आला?

**दिपक सावंत :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो २०१०-११ ला जो वाढीव टॅक्स केला त्यानंतर आपण २०११-१२ मध्ये सर्व बिले रिवाईज करुन दिली त्यानंतर त्याचे समायोजन करुन दिले पण काही व्यक्ती जे सरांनी सांगितले की, घोडबंदर आणि आपण जे मॅन्युअल रिसीट फाडतो ते लोक जुने बिल आणून पैसे भरतात त्यातला तो आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, आत्ता यांचे म्हणणे असे आहे की, २००९-१० ला वाढ केली. २०१०-११ ला आम्ही परत दिले २०१२-१३ मी विचारतो की, १ करोड रुपये कसे आले मा. आयुक्त साहेब बोलतात की, तो विषय नाही आणि ह्यांचे म्हणणे आहे की, जे लोक मॅन्युअल येऊन भरतात त्यांचे पैसे कदाचित आले असतील मी आपल्याला विचारतो की, यावेळी तुम्ही त्यांना या वर्षाचे नविन बिल दिले असेल ना? मग जुन्या वर्षाचा संबंध येतो कुठे? आत्ता येताना असे घेऊन आले का की, ही बिले मिळत नाही दोन वर्षापूर्वीचे बिल घ्या.

**दिपक सावंत :-**

साहेब, मॅन्युअली रिसीट फाडताना जुने बिल आहे, २०१०-११ चे बिल घेऊन आला त्यांला नविन बिल नसते आणि आपले कॉम्प्युटराईजेशन नसल्यामुळे तो विषय झालेला आहे जर कॉम्प्युटरायजेशन आहे तिथे आपण ॲक्सेप्टच करत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, या माणसांकडुन तुम्ही पैसे घेत नाही आत्ता तुमचे सगळीकडे कनेक्शन कापायचे काम चालु आहे. १० टक्के टॅक्स बाकी असेल अजूनही तुम्ही पाणी लाभकर वाढीव रक्कमेचा वसुली करता हे दिसते आहे.

**दिपक सावंत :-**

याच्यामध्ये जुने बिल दिले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही नागरिकांकडून आजपण वाढीव रक्कम घेतली की, नाही ? तो तुमचा विषय आहे, मॅन्युअल असू दया. काही असू दया. नागरिकाकडून आजही, जे २०१० ला रद्द झाले. ते पैसे तुम्ही आजही वसूल करता.

**दिपक सावंत :-**

वसुल करत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मग हे एक करोड कुठून आले ?

**दिपक सावंत :-**

जे जुनी बिले दाखवलेली आहेत, त्याच्यामुळे आलेले आहे. याच्यामध्ये आत्ता जे नविन रिवाइज बिल होईल, मे पर्यंत आम्ही ते सर्व कंम्प्युटरायझेशन करून क्लीअर करून देतो.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, माझा मुळ प्रश्नच तो होता की, पैसे परत दिले गेलेले नाहीत. पैसे परतचे सोडा हे तर अजूनही आले तर घेतात. म्हणजे कोणी आले तर कोणीही सांगत नाहीत.............

**मा. महापौर :-**

मी पण त्यादिवशी त्यांना सांगितले कारण माझ्याकडे, मा. उपमहापौर मॅडमकडे सेम कम्प्लेंट घेऊन लोक येतात.

**नरेंद्र मेहता :-**

टील दे आर नॉट ॲक्सेप्टींग त्यांनी एका लाईनमध्ये उत्तर दिले पाहिजे की, श्री. मेहता साहेब ज्यांचे बाकी आहेत, जसे मा. आयुक्त साहेब त्यावेळी सांगितले की, पाण्याचे कनेक्शनचे आहे. आम्ही यावेळी चेक देऊन डिपॉझीट करु विषय संपला हे अजुनही ॲक्सेप्ट करत नाहीत आमच्याकडे काही बिल आहेत ज्यांचे तुम्ही पैसे घेतले रिफन्ड केले नाहीत त्यावेळी चॅलेंज केले की, आम्ही दिलेलेच आहे. या सभेत योगायोगाने हा बजेट आला याच्यामध्ये स्पष्ट आले. तुमची अजुनही वसुली चालु आहे. म्हणजे एखादे कोणाचे त्या वर्षाचे सिव्हरेज टॅक्स आले तर अजुनही पैसे घेता. हाऊ द कॉमन मॅन विल क्नो. यांचे म्हणणे आहे की, ती बिले जुनी आहेत म्हणुन माहिती पडत नाही. आमचे तेच म्हणणे आहे की हे त्या अधिकाऱ्याचे काम आहे की, हे पैसे घ्यायचे नाहीत.

**मा. महापौर :-**

मी श्री. दिपक सावंत साहेबांना सांगितले होते की, यु टेल युअर स्टाफ ते घेताना थोडेसे दुरुस्त करुन त्या हिशोबाने घ्यायचे आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, आत्ता साहेबांनी जी माहिती दिली की, हे सगळे मॅन्युअल बिल असेल. आय कॅन चॅलेंज यु की, हे सगळे मॅन्युअल बिलाचे १०० टक्के पैसे नाहीत. जे कॉम्प्युटराईज बिल आहे त्याचे ही पैसे घेतलेले आहेत. तुम्ही मला १ करोड ८ लाखाची यादी द्यावी. मी तुम्हाला ते पुढच्या वेळी क्लीअर करतो. साहेब, आत्ता आपण पाणी पुरवठाचे घ्या. पाणी कनेक्शनमध्ये आपण दहा हजार एक्स्ट्रा घेतलेले २०१०-११ मध्ये आपले कलेक्शन ३७.५ करोड आहे. त्यावेळी आपले ३५ हजार रुपये रेट होते म्हणजे आपण साधारण १२०० कनेक्शन नविन दिले. त्यामध्ये १५००० वालेपण असतील तर ती संख्या जास्त जाईल. मी मॅक्झीमम साईडला जातो. ३५ हजार रेट होते. ३.७५ म्हणजे आपण १२०० कनेक्शन दिले एका कनेक्शनमध्ये दहा हजार परत द्यायचे. म्हणजे साधारण एक ते दिड करोड रुपये तुम्हाला परत द्यायचे आहेत. तर त्याचे तुम्ही मागच्या मिटींगमध्ये उत्तर दिले होते की, आम्ही सर्वांना चेक देऊ. आत्ता या बजेटमध्ये पण नाही आणि पुढच्या येणाऱ्या बजेटमध्येपण ती प्रोव्हीजनच नाही की, पैसे आपण कुठुन देणार आहात, कोणत्या खात्यामधुन देणार आहात आणि कधी देणार आहात. साधारण १ करोड २० लाख अंदाजित रक्कम असेल आपण ही माहिती द्यावी की, त्या नागरीकांना कधीपर्यंत परत मिळतील.

**मा. आयुक्त :-**

मागे सांगितल्याप्रमाणे एकतर त्या नागरीकांच्या चालु बिलामधुन आत्ता आम्ही असे ठरवलेले आहे की, एप्रिल महिन्यामध्येच आपण नविन बिल रेज करावे. त्या चालु बिलामधुन ती रक्कम वळती करण्यात येईल त्यांचा जो काही पाणी कर असेल, पाणीपट्टी असेल, त्यातुन ती वजा करुन देण्यात येईल समजा, एखाद्या वेळेस एखाद्याची डिमांड रेज होत नसेल तर त्या बद्दल आमच्याकडे त्यांचे जे पैसे जमा आहेत ते त्यांना परतफेड करण्याची कार्यवाही येत्या मे अखेरपर्यंत करण्यात येईल.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, लोकांना माहितीच नाही की, आम्हाला हे पैसे परत घ्यायचे आहेत. या सभागृहामध्ये जे नविन आहेत, त्यांनापण माहिती नाही की, कोणते पैसे परत घ्यायचे आहेत कॉमन मॅनची तर गोष्ट वेगळी आहे.

**मा. आयुक्त :-**

त्यांना जरी माहिती नसले तरी मी आत्ता सुचना दिलेल्या आहेत की, मे अखेरीस ज्यांचे एक्स्ट्रा पैसे जमा झालेले आहेत ते चुकीच्या बिलामुळे असो, मॅन्युअल सिस्टममुळे असो किंवा डिपॉझीटच्या स्वरुपात असो, त्या सगळ्यांचे पैसे मे अखेरपर्यंत परत करण्यात येतील.

**नरेंद्र मेहता :-**

मे पर्यंत मार्चपर्यंत नाही?

**मा. आयुक्त :-**

आत्ता मार्च संपत आलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मी यासाठी सांगितले की, यावेळी तुम्ही केले असते तर बजेटला प्रोव्हीजन लागली नसती कारण तुम्ही आत्ता जे बजेट सादर केले, त्यामध्ये ती प्रोव्हीजनच नाही त्यासाठी विचारले साहेब, तसेच सेम आपले पाण्याचे बिल आपण सात रुपये हजार लिटर ने पाणी देत होतो त्यावेळी आपण दहा रुपये हजार लिटरने पाण्याचे बिल त्यांना दिले. अपटू नाईन्थ मन्थ दे हॅव्ह पेड आणि पाण्याचे बिल आपल्या फायनान्शिअल इअरप्रमाणे चालत नाही. ३१ मार्चपर्यंत नाही ते जानेवारी ते डिसेंबरपर्यंत आपला टॅक्स रद्दचा आदेश जानेवारीमध्ये आला म्हणजे ऑलमोस्ट सगळ्यांनी ते डिसेंबरपर्यंतचे वर्षाचे पैसे भरलेले आहेत. आत्ता हे फिगर आपण कुठेपण बघितले, मा. आयुक्त साहेब बोलायला काही उत्तर देतात यांचे म्हणणे आहे की, आम्ही आठ करोड रुपये एक्स्ट्रा वसुल केले आणि आठ करोड रुपये परत दिले. आत्ता मी बघतो तर कुठेही दिलेली अमाऊंट दिसतच नाही यांचे स्पष्ट उत्तर आहे की, देणे-घेणे आम्ही ॲडजस्टमेंट केले. बिल १०० द्यायचे होते, २० कापले आणि ८० घेतले तसे जरी बघितले २००९-१० मध्ये, विदाऊट इन्क्रीजींग टॅक्स, २६ करोड इन्कम होती आठ करोड एक्स्ट्रा घेतल्यानंतर २०१०-११ मध्ये याची इन्कम २९ करोड म्हणजे तीन करोड रुपये वाढ झाली. पण तीन करोड रुपये ही नॅचुरल वाढ होती हे आठ करोड इकडे मायनस केले तर २१ करोड वसुली त्यावेळी झाली होती का? ते कुठे बॅलेन्सच होत नाही. एक दोन करोड इकडे-तिकडे ठिक आहे. पाच-सहा करोडचा फरक येतो. आठ करोड जास्तीचे वसुल केले ते आणि आमचे जे रुटीन बिल एक वर्षापुर्वी होते ते २७ करोडचे होते. ते बॅलेन्सच होत नाही मग ही जी फिगर दिली आहे, ती यासाठी की, काहीतरी प्रश्न विचारलेला आहे तुम्हाला वाटते की, या लोकांनी जे चार लाख कनेक्शन असतील त्या सगळ्यांची बिले काढुन मला ही फिगर दिली असेल ते फेकले आहे. ईट इज अ फॅक्ट की, हे आले. हे द्यायचे तेव्हा दिले. दिले, दिले नाही कोणालाही काही माहिती नाही. जनरली हेड असतो. एवढी रिकव्हरी झाली आणि एवढे पैसे परत देण्यात आले. इकडे परत देण्याबाबत म्हटलेच नाही. डायरेक्ट म्हणतात, ते कमी जास्त करुन घेतले. इट इज नॉट प्रायव्हेट लिमिटेड फर्म, की दहा रुपये होते, दोन कापुन आठ घेतले, विषय संपला इट इज नो व्हेअर शोईंग की, आम्ही हे रिफंड केलेले आहे. तुम्ही मला बॅलन्स टॅली तर करुन द्या. कुठेही टॅली होत नाही. सभागृहामधील सदस्यांनी मला सांगा की, किती लोकांना सातचे दहा झाले होते ते माहिती आहे? बऱ्याचशा लोकांना माहिती नाही. कॉमन मॅनला कसे माहिती असेल हाऊस टॅक्स वाढ झाली हे गावाला माहिती आहे. पाण्यामध्ये पण वाढ झाली हे अजुन अर्ध्या लोकांना माहिती नाही. साहेब, यु गीव्ह मी आयदर डिटेल फिगर, या घरातुन एवढे पैसे आलेले, एवढे दिले. तुम्ही ते द्या. असेच फिगर देऊन आयदर तुम्ही मला बॅलन्सींग करुन तरी दाखवा. मेहता साहेब, जुने अठ्ठावीस आणि आपण वाढ केलेले आठ, म्हणजे छत्तीस झाले ते कुठेही बॅलन्सच होत नाही.

**मा. आयुक्त :-**

यामध्ये आपण २०१०-११ चा ताळमेळ जर घेतला. २०१०-११ मध्ये आपण दोन फॅक्टर विचारात घ्यायला पाहिजे एक तर मागील थकबाकी किती होती? चालु डिमांड किती होती?

**मा. महापौर :-**

सर्वांना विनंती आहे की, आपसात बोलू नये.

**मा. आयुक्त :-**

आपण चालु डिमांड पैकी थकबाकीचा विषय ॲड ऑन होतच राहील त्यामध्ये वाढीवचा प्रश्न येत नाही चालु पैकी २०१०-११ मध्ये आपण एकुण २८ कोटी ९९ लाख वसुल केले होते आणि यामध्ये दोन्ही दरांमधील जो फरक होता, तो ७.६९ कोटीचा होता. पुढच्या वर्षी जेव्हा आपली डिमांड झाली, तर आपण चालु डिमांड ३२ कोटी ऐवजी २९ कोटी घेतले. ३२ कोटीच्या ऐवजी आपली डिमांड कमी केली. ३२.६९ कोटीच्या ऐवजी आपली डिमांड २९.८० कोटी झाली.

**नरेंद्र मेहता :-**

ॲक्चुअल किती वसुल झाले?

**मा. आयुक्त :-**

त्यापैकी ॲक्चुअल २०.५० कोटी वसुल झाले.

**नरेंद्र मेहता :-**

नाही ॲक्चुअल २४ कोटी वसुल झाले.

**मा. आयुक्त :-**

२०११-१२ मध्ये मी फक्त चालु मागणी बोलतो मी एरीअर्सबद्दल बोलत नाही. चालु मागणी मध्ये आपली २०१०-११ ची डिमांड २९ कोटी ८० लाख होती. त्यापैकी ३२ कोटीचे २९ कोटी झाले म्हणजे जे वाढीव दर होते, ते वाढीव दराने आपला प्रस्ताव अमान्य झाला म्हणुन आपण ते कमी केले. आपली डिमांड कमी झाली साधारण ३ कोटीने आपली डिमांड कमी झाली त्यापैकी आपण २०.५० कोटी वसुल केले आणि ७.६९ कोटी समायोजन केले तरीपण २०११-१२ मध्ये आपली थकबाकी १.६१ कोटी राहीली आणि आपला जो मुद्दा आहे, मागील थकबाकी मागील थकबाकीमध्ये देखील दोन फॅक्टर आहेत एकतर जी रुटीन थकबाकी

होती ती आणि एक वाढीव झालेली थकबाकी होती ती. ती रुटीन कराची थकबाकी होती त्यापैकी ३ कोटी वसुल झाले म्हणुन आपल्याला २४ कोटींचा आकडा दिसतो आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, या बजेटमध्ये बारा वर्षे झाली माझा एक सिंम्पल प्रश्न आहे. मा. महापौर मॅडमना पण समजले. आपली पाण्याची २०१०-११ ची वसुली साधारण २७ करोड आहे. दरवर्षी दोन-तीन करोड नॅच्युरल वाढ होते. आत्ता तुम्ही नॅच्युरल वाढ करुन २९ कोटी, याच्यामध्ये जे ७ करोड एक्स्ट्रा टॅक्स वाढलेला आहे. तोपण याच्यात आहे ते कमी केले तर २२ कोटी वसुली झाली. मी गृहीत धरतो की, आपले पाण्याचे बिल २२ कोटीचे आहे मग परत तुम्ही २०११-१२ मध्ये २४ कोटी दाखवता. मग तुम्ही २४ कोटी दाखवले तर याच्यामध्ये तुम्ही परत सात करोड दिले. २४ प्लस ७ झाले ३१ कोटी वसुल झाले असतील. मायनस करुन तुमच्याकडे २४ कोटी आली.

**मा. आयुक्त :-**

२०११-१२ मध्ये आपली चालु डिमांड २९ कोटी होती.

**नरेंद्र मेहता :-**

डिमांड जाऊ द्या. वसुली सांगा.

**मा. आयुक्त :-**

चालु डिमांडपैकी २०.५० कोटी वसुली आणि ५.१७ कोटी मागील थकबाकी होती त्यापैकी ४.३० कोटी वसुली झाली असे मिळुन २४.८१ कोटी म्हणुन मी सांगितले की, ३२ कोटी टोटल डिमांडपैकी २४ कोटी वसुल झाले. ७.६९ कोटी समायोजन केले आणि २.४८ कोटी म्हणजे थकबाकी आणि चालु डिमांड मिळून, २.४८ कोटी आपली थकबाकी शिल्लक राहीलेली आहे. त्या २.४८ मध्ये आपण जे वाढीव दराने वसुल केले होते ते परत केलेले आहेत. किंवा जे परत करायचे राहीलेले आहेत याचासुध्दा विचार करण्यात आलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, टोटली मिसगाईडींग आन्सर. मा. आयुक्त साहेबांना मागची पार्श्वभुमी कदाचित कमी माहीती असेल म्हणुन त्यांचे हे उत्तर बरोबर आहे. माझा सिंम्पल प्रश्न होता की, तुमचे हे फिगर कुठेही बॅलन्स होत नाहीत. कुठेही मॅच होत नाहीत. मला तुम्ही आयदर लेखी द्या की, या सर्वांचे शहरातील नागरीकांना पैसे परत दिले गेलेले आहेत. राहीलेले असेल तर हे त्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर काय कार्यवाही करणार?

**मा. आयुक्त :-**

मे अखेरपर्यंत ते परत करण्याची जबाबदारी संबंधीत खाते प्रमुखावर टाकण्यात येईल आणि त्या दरम्यान जर त्यांनी केले नाही तर त्यांच्यावर निश्चितपणे कार्यवाही केली जाईल.

**नरेंद्र मेहता :-**

आत्ता तुम्ही जे वसुल केले त्याचे काय करायचे तुमची वसुली अजुन चालु आहे.

**मा. आयुक्त :-**

मे अखेरपर्यंत सर्व टेबल निल होईल.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, आपला जो कॉमन कर्मचारी आहे टॅक्समध्ये शिपाई वगैरे आपली सगळी माणसे वसुलीसाठी लागतात. त्यांना कितीही आर्ग्युमेंट केले, कोणीही ऐकायला तयार नाही. सोसायटीवाल्यांनी त्यांना सांगितले की, आमची ३० घ्यायचे बाकी आहेत. तु कनेक्शन कशाला कापतो. तरीही ते ऐकत नाहीत हे तुम्हालाही माहिती आहे. तुमच्याकडेपण अनेक तक्रारी आल्या असतील. मा. उपमहापौरांकडे सर्व नगरसेवकांकडे तक्रारी आल्या असतील की, कनेक्शन कापतात. त्याचे दहा हजार बाकी असतील तर आपण कनेक्शन कापून येतो. त्यांचे वीस हजार घ्यायचे आहेत. त्यांनी कितीही दाखवले तरी ते ऐकत नाहीत. तुम्ही तुमच्या अधिकाऱ्यांना इन्स्ट्रक्शन करा, ज्यांचे बाकी असतील, ते बॅलन्स ठेवून त्यांचे म्हणणे ऐका. तुम्ही ३१ मार्चनंतर त्यांना बोलवा. कुठेतरी बॅलन्स करुन द्या. तुम्ही डायरेक्ट बोलता की, पैसे भरा आम्हाला काही माहिति नाही. आत्ता उदाहरण सांगतो, काल श्री. राठोड साहेब कनेक्शन कापायला गेलेले त्यांना मी बोललो की, मला यातले काही माहिती नाही. श्री. वाकोडे साहेब, जे बोलतील ते तुम्ही करा. वाकोडे साहेबांचा फोन सकाळपासुन बंद, शेवटी ते कनेक्शन कापले की नाही हे मला माहीती नाही. मी त्यांना बोलतो की, पैसे बाकी आहेत, मी कॉर्पोरेशनमध्ये येतो. त्यांनी ऐकले नाही. आत्ता श्री. राठोड साहेब म्हणजे एक उच्च अधिकारी आहेत त्यांनीसुध्दा ऐकले नाही मग शिपायाचे कोण ऐकेल तुम्हाला वाटते की, शिपाई किंवा कर्मचारी आमचे ऐकतील?

**मा. आयुक्त :-**

त्यामध्ये असे करता येईल की, जर ९० टक्के रिकव्हरी झाली असेल तर १० टक्के त्यांचे पाणी कनेक्शन कापता येणार नाही.

**नरेंद्र मेहता :-**

प्लस-मायनस करुन मला घ्यायचे येतात तरी तुम्ही कापता, त्याचे काय?

**मा. आयुक्त :-**

जे कॉम्प्युटराईज बिल आहेत त्यामध्ये समायोजन करण्यात आलेले आहे आणि जे राहीले असतील त्याचे आम्ही मे अखेरपर्यंत करु.

**नरेंद्र मेहता :-**

मग त्याचे ऐका ना तो बोलतो मला वीस घ्यायचे आहेत तरी तुम्ही कुठेही ऐकत नाहीत. कोण ऐकतो? श्री. वाकोडे साहेबांना तो व्यक्तीगत जाऊन भेटला तर विषय वेगळा आहे पण जिकडे जागेवर जातात, सर्व कामावर गेलेले असतात. जागेवर कोणाकडे बिल नसतात आपण दिवसाचे जातो. कनेक्शन कापून येतात चॅप्टर क्लोज नंतर आपण परत कनेक्शन लावायचे. त्याच्यावर महापालिका खर्च करते गरज काय आहे? तर आपण अधिकाऱ्यांना सांगा की, ज्या ठिकाणी अशी तक्रार असेल, त्यांचे ऐकून घ्या त्यांना संधी द्या. तुम्ही संधीपण देत नाहीत. डायरेक्ट कापता मा. आयुक्त महोदय, ओव्हर ऑल आय एम नॉट सॅटीसस्फायड विथ युअर आन्सर. पण हे गृहीत धरतो की, मे पर्यंत तुम्ही सर्वांची जास्तीची रक्कम परत देणार अशी आशा व्यक्त करतो.

**मा. आयुक्त :-**

निश्चितपणे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, दुसरा प्रश्न आहे. मा. आयुक्त महोदय, मौजे नवघर, आपल्याकडे असतीलच त्यामध्ये आरक्षण म्हणजे हे सर्व महापालिकेचे आहे आणि महापालिका हे निर्णय घेत असते की, आयदर बिल्डरने डेव्हलप करायचे की, महापालिकेने डेव्हलप करायचे जोपर्यंत निर्णय होत नाही, ते सर्व निर्णय महापालिकेचे यामध्ये एक आरक्षण नॉन-सी आर झेड होते. म्हणजे आपण डेव्हलप करायला फ्री. त्याला लागुन आर झोन जागा होती, ती सी.आर.झेड मध्ये टाकले आणि जागेला आर झोन करुन त्याला परवानगी दिली. आरक्षण हे सर्व डी.पी. रस्त्यावर असतात. हे आरक्षण तुम्ही इंटरनल त्या कॉम्प्लेक्सच्या रोडवर टाकले. रोज त्या कॉम्प्लेक्स वाल्यांबरोबर कोण भांडण करणार? व्हॉट इज द रिजन? आपले आरक्षण सीआरझेड मध्ये टाकायचे आणि त्यांचे आर झोन नॉन सीआरझेड मध्ये आणायचे रिलोकेनशनची गरज काय होती?

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौर महोदयांच्या परवानगीने बोलतो, आपण मागे दि.४ जानेवारी २०१३ ला प्रश्न विचारला होता. या प्रश्नामध्ये जे सात मुद्दे उपस्थित केले होते, त्या प्रत्येक मुद्दयाचे आपल्याला डिटेल रिप्लाय दिलेला आहे आणि महापालिकेने जी काही कार्यवाही केलेली आहे ती नियमाच्या आणि तरतुदीच्या अधिन राहून केलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मी तुम्हाला प्रश्न विचारलेला नाही. मी मा. आयुक्त साहेबांना विचारले आहे मा. आयुक्त महोदयांनी मला खुलासा करावा. तुम्ही सांगा की, उत्तर दिलेले आहे मग सभागृहात अर्धा तास देण्याची काही आवश्यकताच नाही. हे उत्तर झाले का? तुम्हाला सभागृहात विचारलेले आहे सभागृहात उत्तर द्या. आम्हाला हे दाखवू नका की, काय लिहून दिले आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

सभागृहातच उत्तर देतो आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आपण काय सांगितले की, आपल्याला उत्तर दिलेले आहे. मी मा. आयुक्त महोदयांना विचारले की, आपली जागा सीआरझेड मध्ये टाकायची. आपले डीपी रस्त्यावर आरक्षण होते ते आरक्षण तुम्ही इंटरनल रोडवर टाकले याची गरज काय आहे?

**सत्यवान धनेगावे :-**

गरज काय होती म्हणजे त्या डेव्हलपरची होल्डींग मोठी आहे. त्यातला बहुतांश भाग सीआरझेड ने बाधित होत होता, बिल्डेबल एरीया मिळत नव्हता म्हणून केलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

पण आमचे आरक्षण सीआरझेड मध्ये का? उद्या आम्हाला डेव्हलप करायचे असेल तर?

**सत्यवान धनेगावे :-**

तुमच्या आरक्षणाचा एरीया कमी झालेला नाही. महापालिकेचे कोणतेही नुकसान झालेले नाही.

**नरेंद्र मेहता :-**

आत्ता सीआरझेड आहे, त्याच्यामध्ये महापालिकेला परवानगी देणार का?

**सत्यवान धनेगावे :-**

रितसर परवानगी देणारच.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, उद्या महापालिकेने ठरवले की, ते आरक्षण विकसीत करायचे आहे तर तुम्ही करु शकता का? यांना करायचे असेल तर मी अजुन एक उदाहरण सांगतो. या इमारतीला पाच माळ्यांची

परवानगी आहे. चार माळे बांधले आहेत. पाचव्या माळ्याची सी.सी. आहे आपण गेल्या आठ वर्षापासुन गव्हर्नमेंटकडे परवानगी मागतो की, पाचवा माळा बांधायची परवानगी द्या. गव्हर्नमेंट परवानगी देत नाही, ही वस्तुस्थिती आहे आणि हे मला सांगतात की, स्कुल रिझर्व्हेशन सीआरझेड मध्ये परवानगी देऊ कोणत्या आधारे सांगता?

**सत्यवान धनेगावे :-**

परवानगी देऊन रितसनर एमसीझेड कडे प्रपोझल देऊ. परवानगीनुसार सगळे करु.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, आपल्या कामासाठी आपण सेंट्रल गव्हर्नमेंट, हे जे म्हणतात, आठ वर्षापासुन या बिल्डींगला पाचव्या माळ्यासाठी परवानगी मिळाली नाही. जमिनीवर कोण परवानगी देणार आहेत? आणि आत्तापर्यंत मिरा भाईंदरमध्ये एकाही सीआरझेड ला परवानगी मिळालेली नाही. मा. आयुक्त महोदय, आपण याचा खुलासा करावा तुम्ही उत्तर दिले ते आम्हाला पटले, समजले पण मा मा. आयुक्त साहेबांना विचारायचे आहे की, प्रशासनाला करायची गरज काय होती?

**सत्यवान धनेगावे :-**

मी जे उत्तर देतो आहे, ते ऑन रेकॉर्ड देतो आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, तुमचे असे म्हणणे आहे की, यापुढे कोणीही आले आणि सांगितले की, तुमचे आरक्षण सीआरझेड मध्ये टाका आणि आमची नॉन सी.आर.झेड. मध्ये आणा. तर तुम्ही करणार का?

**सत्यवान धनेगावे :-**

ज्या एक्झीस्टींग डेव्हलपमेंट आहेत, त्या सुध्दा सी.आर.झेड ने बाधीत झालेल्या आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

एक्झीस्टींग डेव्हलपमेंट आहेत. पण मा. आयुक्तांनी मला उत्तर द्यावे की, मी करणार. तुम्ही उद्या असे प्रप्रोजल पाठवा. आम्ही करु.

**सत्यवान धनेगावे :-**

प्रस्ताव सबमीट करा.

**मा. महापौर :-**

ते काय सांगतात. ते तुम्ही ऐका तरी. यू आर नॉट रेडी टू लिसन टू हिंम. तुम्ही बोलत चालले आहात.

**नरेंद्र मेहता :-**

माय कम्पलेंट इज अगेन्स्ट हिम. मी या सभागृहात का आलो? मला तिकडे न्याय मिळाला नाही म्हणून. करणारे हेच अधिकारी आहेत. आता यांच्याकडून समाधान झाले नाही म्हणून मी सभागृहात आलो. मला हेच उत्तर देतील तर याला लॉजीक काय आहे?

**मा. महापौर :-**

ते ठिक आहे. त्यांना पहिले बोलू द्या. मग मा. आयुक्त साहेब बोलतील.

**सत्यवान धनेगावे :-**

जे फॅक्ट ऑन रेकॉर्ड आहे, त्या बेसीसवर उत्तर देतो आहे. माझी कम्प्लेंट तुमच्या विरोधात, तुमची कम्प्लेंट माझ्या विरोधात असे काही कारण नाही.

**नरेंद्र मेहता :-**

कम्प्लेंटचा विषय नाही. मला एखादे वाटले की, तुमचे उत्तर मला पटले नाही म्हणून मी हायर बॉडीकडे आलो.

**सत्यवान धनेगावे :-**

जी काही कार्यवाही कलेली आहे. ती नियमाच्या अधीन राहून, त्या-त्या वेळी त्या-त्या परिस्थितीत घेतलेले निर्णय आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, आपण सांगा.

**मा. आयुक्त :-**

यामध्ये जे निर्णय घेतलेले आहेत, आता निर्णय घेताना त्यावेळेचे जे अधिकार होते किंवा नव्हते. अधिकार असतील तर त्याचा वापर त्यांनी केला कशामुळे केला, जी काही रेकॉर्डवर माहिती उपलब्ध आहे, कारण हा निर्णय आता झालेला नाही. माझ्या माहितीप्रमाणे हा निर्णय २०१० मध्ये झालेला आहे. त्या निर्णयाचे जे-जे रेकॉर्ड उपलब्ध आहेत त्यानुसार ते माहिती देत आहेत. आता राहिला प्रश्न की, यापुढे आपण ती कार्यवाही करणार का? तर प्रत्येक प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार यापुढील प्रकरणांवर उचित निर्णय घेण्यात येईल. असे मी माझ्या अधिकारामध्ये आपल्याला सांगू इच्छितो.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, मी पूर्वीपण याची तक्रार केली होती. आता विषय माझ्या वॉर्डमधील आहे. माझ्या वॉर्डमध्ये तुम्ही ते आरक्षण बदल केले आहे. महापालिकेचे आरक्षण सी.आर.झेड मध्ये, ज्याचा विकास कधी होऊच शकत नाही. जोपर्यंत तो सी.आर.झेड. निघत नाही. बारा वर्षे गेली, अजूनपर्यंत सी.आर.झेड. निघाले नाही. त्या लोकांची अनेक घरे रिडेव्हलपमेंट, त्यांचा प्रॉब्लेम अजून सॉल्व झाला नाही. आणि तुम्ही मला आरक्षणाचे बोलता. कसे होईल ते मला सांगा.

**सत्यवान धनेगावे :-**

सी.आर.झेड. रिलोकेशन केलेले आहेत. तिकडे गार्डनचें रिझर्व्हेशन सी.आर.झेड. एरियामध्ये आहे. त्याची परवानगी मिळू शकते. त्यामध्ये लॉस काय झाला?

**नरेंद्र मेहता :-**

स्कुलचे केले आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

बिल्डेबल एरिया हा नॉन-सी.आर.झेड. आहे आणि नॉन बिल्डेबल हा सी.आर.झेड. मध्ये आहे.

**प्र. नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

**सुहास रकवी :-**

मा. महापौर मॅडम, मला एक मिनिट विचारायचे आहे. जसे आता श्री. धनेगावे साहेबांनी सी.आर.झेड. सांगितले. श्री. मेहता साहेब बरोबर म्हणाले, आरक्षण बदली करण्याचा अधिकार कोणाचा आहे? कारण आमच्या इकडेसुध्दा समाजाची एक वास्तु आहे. गेली वीस वर्षे झाली, ती सी.आर.झेड. बाधीत आहे. त्याची परवानगी होत नाही आणि आरक्षण चेंज होत असेल तर त्याच्यावर आम्हाला सुध्दा चेंजेस करुन द्यावे. आम्ही मागणी करतो की, जसा यांनी तिकडे बदल केला आहे, श्री. मेहता साहेबांनी सांगितले की, तिकडे सी.आर.झेड. दुसऱ्या ठिकाणी दिलेला आहे. तर त्याप्रमाणे आमच्या समाजाकरिता सुध्दा तुम्ही मान्यता द्यावी.

**सत्यवान धनेगावे :-**

समाजाची जागा ही खाजगी स्वरुपाची आहे. ते आरक्षण नाही.

**सुहास रकवी :-**

पण बदली करण्याचा अधिकार कोणाला आहे?

**सत्यवान धनेगावे :-**

एका लँड ओनरची होल्डींग असेल तर ते करता येते.

**सुहास रकवी :-**

आता श्री. मेहता साहेबांनी सार्वजनिक जागेचे सांगितले की, इथे पाचवा माळा चढवायचा आहे. तर आपल्याला परवानगी मिळत नाही. ही तर सार्वजनिक जागा झाली.

**सत्यवान धनेगावे :-**

रितसर परवानगीचा अर्ज केला तर मिळते.

**सुहास रकवी :-**

त्यांच्या म्हणण्यानुसार जर आपल्याला मिळत नसेल तर इतर बदली करण्याचा अधिकार कोणाकडे आहे. त्यांनी लवकरात लवकर पाठपुरावा करावा, असे मी म्हणतो आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

महापालिकेकडून पाठपुरावा चालू आहे.

**सुहास रकवी :-**

आमच्या समाजाकरीता किती वर्षे झाली. त्याच्याकरीता काहीच केलेले नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

सी.आर.झेड चा रिक्लासिफिकेशनचा सर्वे झालेला आहे.

**सुहास रकवी :-**

तो साधारण किती दिवसात होईल? किती महिन्यात होईल?

**सत्यवान धनेगावे :-**

साधारण चार महिन्यांमध्ये आपल्याकडे त्याचा ड्राफ्ट प्लान येऊ शकेल.

**मा. महापौर :-**

लक्षवेधी घ्या.

**प्र. नगरसचिव :-**

आजच्या सभेसाठी दोन लक्षवेधी आलेल्या आहेत. एक लक्षवेधी सौ. सरस्वती रजनीकांत मयेकर यांची आहे. आणि दुसरी लक्षवेधी श्री. लियाकत गफ्फार शेख यांची आहे. दोन्ही लक्षवेधी मी मा. महापौरांकडे सादर करतो.

**मा. महापौर :-**

आजच्या सभेकरीता दोन लक्षवेधी आलेल्या आहेत. पहिली लक्षवेधी सौ. सरस्वती रजनीकांत मयेकर यांची व दुसरी लक्षवेधी श्री. लियाकत गफ्फार शेख यांची आहे. श्री. लियाकत गफ्फार शेख यांची लक्षवेधी मी स्विकारत आहे. व श्री. सौ. सरस्वती रजनीकांत मयेकर यांची लक्षवेधी मी फेटाळत आहे.

**लियाकत शेख :-**

मॅडम, थॅंक यू व्हेरी मच. मॅडम, नगररचना विभागाकडून दि. २५/११/२०११ रोजी रिलायन्स एनर्जी कंपनीला एक पत्र देण्यात आलेले आहे. त्या पत्राच्या अनुषंगाने, त्याच्यामध्ये विषय लिहिलेला आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात झोपडपट्टी, चाळी, औद्योगिक गाळे, इमारती यांना नगररचना विभागाचे नाहरकत पत्र असल्या शिवाय नवीन विद्युत पुरवठा न करणेबाबत. याबाबत मी १४/०३/२०१३ रोजी एक खुलासा मागितलेला आहे. त्या पत्रामध्ये मी स्पष्टपणे म्हटलेले आहे, आजच्या युगात वीज ही भौतिक गरज नसून मुलभूत गरज झालेली आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीस विद्युत पुरवठा मिळणे अत्यावश्यक आहे व त्यासाठी विद्युत पुरवठा अधिनियम २००३ चे कलम ४३ नुसार विज मिळविण्याचा मुलभूत हक्क त्यांना प्राप्त झालेला आहे. दॅट इज बाईंडींग. आपण संदर्भांकित पत्रान्वये कोणत्या कायद्या अंतर्गत, शासन परिपत्रक किंवा कोणत्या मा. न्यायालयाचे आदेश किंवा निर्देशानुसार विद्युत पुरवठा बंद करण्याचे संदर्भांकित पत्र आपण रिलायन्स एनर्जी कंपनीला दिलेले आहे. त्याबाबत लेखी माहिती तातडीने कळविण्यात यावी. असा खुलासा मी मागितला होता. मॅडम, आजच्या युगात माणसाच्या दोन गरजा आहेत. एक मुलभूत गरज, एक भौतिक गरज. मुलभूत गरज म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा. भौतिक गरज म्हटले तर एखादी गाडी, नवीन बंगला, दागदागिने. निवारा म्हटले तर पाणी, आरोग्य विभाग आला. शिक्षणाची व्यवस्था आली. लाईटची व्यवस्था आली. या सर्व गोष्टी बघितल्या. तर सर्वप्रथम लाईट ही आजची भौतिक गरज राहिलेली नाही. तर ती मुलभूत गरज झालेली आहे आणि कोणत्या कायद्याच्या आधारे त्यांनी हे परिपत्रक काढलेले आहे? त्याचा खुलासा अजून त्यांनी केलेला नाही. तरी मला माणुसकीच्या दृष्टीकोनातून असे वाटते आणि सर्व प्रीन्सीपल ऑफ नॅचरल जस्टीस, त्यांनाही वीज पुरवठा मिळणे तेवढेच गरजेचे आहे. जेणेकरुन त्यांच्या मुलांना तिथे शिक्षण घेता येईल. झोपडपट्टीत जे लोक राहतात. त्यांना जर लाईटच नसेल तर ते शिक्षण काय घेतील? तर याच्यावर विशेष लक्ष देऊन आपण प्रशासनाला योग्य ते निर्देश द्यावे हि विनंती. धन्यवाद.

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौर महोदयांच्या परवानगीने बोलतो. मिरा भाईंदर महानगरपालिका २००२ पासून अस्तित्वात आलेली आहे. या महापालिकेमध्ये १९ गावांचा समावेश आहे. त्यापैकी पाच गाव एम.एम.आर.डी.ए. मध्ये आहेत. महापालिका क्षेत्रात जे नव्याने बांधकाम झालेले आहेत त्या बांधकामाच्या बाबतीत सर्वे केल्यानंतर असे लक्षात आले की, विदाऊट ओ.सी. बिल्डींगची ऑक्युपन्सी होत आहे. विदाऊट ओ.सी. इंडस्ट्रीअल गाळे असतील, कमर्शिअल असतील, त्यांनी ऑक्युपन्सी होत आहे. म्हणून मागच्या वर्षी आम्ही तत्कालीन मा. आयुक्त साहेबांकडे मिटींग घेऊन त्यात डिसीजन घेतला होता की, ओ.सी. घेतल्याशिवाय वैयक्तिक वीज पुरवठा करु नये. तसेच ही कार्यवाही करत असताना ०१/०१/१९९५ पूर्वीचे जे झोपडपट्टीधारक, गाळेधारक आहेत त्यांच्या कागदपत्रांची तपासणी करुन आपण त्यांना एन.ओ.सी. देतो आहे. शासनाच्या निर्णयाप्रमाणे जे प्रोटेक्टेड आहेत, त्यांना आपण वीज पुरवठा देत आहोत.

**लियाकत शेख :-**

श्री. धनेगावे साहेब, आपण म्हणता की, १९९५ पूर्वीचे जे आहेत त्यांना आपण देतो. दॅट इज ऑफिशिअली. नो डाऊट ॲट ऑल. परंतु आता जे नवीन बांधकाम करतात त्यांच्यावर अडीज पट शास्ती लावून तुम्ही कर आकारणी करता ना? तुमच्याकडे तसे परिपत्रक आहे ना?

**सत्यवान धनेगावे :-**

आहे.

**लियाकत शेख :-**

जर त्या परिपत्रकानुसार अडिज पट शास्ती लावून त्यांच्याकडून टॅक्स घेता. तर कमीत कमी वीज पुरवठा हा त्यांचा तेवढा मुलभूत हक्क नाही का? आपण त्यांच्याकडून अडीज पट घेऊन त्यांना अधिकृत देतो का? नाही ना. त्याच धर्तीवर, त्याच अटीवर कमीत कमी माणुसकीच्या दृष्टीकोनातून त्यांना वीज पुरवठा देण्यास आपल्याला काय हरकत आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

अडीज पट शास्ती ही यासाठी आहे की, अनधिकृत बांधकामाच्या संख्येत वाढ होऊ नये. अनधिकृत बांधकामावर नियंत्रण राहावे हा सर्व त्यामागचा उद्देश आहे.

**लियाकत शेख :-**

साहेब, तुमचे इंटेशन क्लीअर आहे की, यामुळे अन ऑथोराइज कन्स्ट्रक्शनला पाठिंबा मिळतो. तरी त्याच्यामध्ये तुम्ही तर वेगळया दृष्टीकोनातून विचार केला तर तुम्हाला नक्की जाणीव होईल की, याच्यात आपण एकदा अडीज पट शास्ती घेतो. त्यात लोकांचा कुठेतरी भर येतो की, अडीज पट शास्तीच भरायची. तर ती शास्ती घेताना त्यांना कमीत कमी तेवढी तरी लिबर्टी द्या की, त्यांना विद्युत पुरवठा मिळेल. तुम्हाला

जेव्हा डिमॉलीश करायचे असेल, यू कॅन डिमॉलीश. तुम्हाला जेव्हा कार्यवाही करायची असेल तेव्हा तुम्ही कार्यवाही करा.

**मा. महापौर :-**

साहेब, आपण इलिगल घरांना टॅक्स लावतो, असेस करतो. आपल्या रुल्समध्ये जे आहे ते आपण करतो. मग इलेक्ट्रीसीटीचे कनेक्शन द्यायला काय प्रॉब्लेम आहे. ज्या दिवशी आपण इलिगल बांधकाम तोडणार त्या दिवशी तुम्ही कट करा.

**सत्यवान धनेगावे :-**

एकीकडे आपण टॅक्स आकारणी करतो. दुसरीकडे अनधिकृत बांधकाम विभाग त्यांना अनधिकृत बांधकामाची नोटीस देते. हे दोन्ही रेकॉर्ड घेऊन लोक कोर्टात जातात.

**लियाकत शेख :-**

मॅडम, इलेक्ट्रीसीटी ॲक्ट २००३, सेक्शन ४३ तुम्हाला क्लीअर कट म्हणते आहे की, इट्स अ बाईंडींग ड्युटी. कोणत्याही वीज कंपनीने एक महिन्याच्या आत जर त्यांना वीज पुरवठा दिला नाही तर त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. दॅट्स मीन दे हॅव गॉट फंडामेंटल राइट ऑफ देर ओन. तर अशा परिस्थितीत तुम्ही त्यांना देणार नाही का? नियम आपण तयार केला आहे काय? केंद्र शासनाचा नियम आहे की, त्यांना हे द्यायचे आहे. तर हे परिपत्रक कोणत्या आदेशान्वये आहे? मा. हायकोर्टाकडे काही आहे का? मा. हायकोर्टाने सांगितले आहे?

**सत्यवान धनेगावे :-**

आम्ही जो निर्णय घेतला आहे तो अनधिकृत बांधकामावर कंट्रोल आणि पुढे संख्या नाही वाढली पाहिजे हा एकमेव उद्देश त्याच्यामध्ये आहे.

**लियाकत शेख :-**

साहेब, आम्हाला याचा संपूर्णपणे जाणीव आहे. याचे इंटेन्शन क्लीअर आहे. अनधिकृत बांधकामांना पाठिंबा मिळू नये हा यामागचा उद्देश आहे. परंतु, मी हा जो मुद्दा मांडत आहे, इलेक्ट्रीसीटीच्या बाबतीत, हा एक माणुसकीच्या दृष्टीकोनातून तुम्हाला जेव्हा डिमॉलीश करायचे असेल, यु कॅन डिमॉलीश इट. पण तुम्हाला जोपर्यंत घर आहे, तोपर्यंत त्याला लाईट देण्यासाठी काय हरकत आहे?

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, अनधिकृत बांधकाम या शहरासाठी कर्करोग आहे हे आम्हाला सगळयांनाच मान्य आहे. शास्ती लावण्याआधी २००७ मध्ये हा विषय मा. महासभेसमोर आला होता. अनधिकृत बांधकामाला शास्ती लावायची याकरिता मा. महासभेने ठराव करुन दिलेला आहे. वीज पुरवठा करु नये हा निर्णय, ९५ च्या आधीचे जेवढे बांधकाम आहेत. त्यांना आपण संरक्षण देत आहोत. ९५ नंतरच्या बांधकामांना वीज पुरवठा करणार नाही किंवा नवीन जे काही अनधिकृत बांधकाम असतील त्यांना वीज पुरवठा होऊ शकत नाही किंवा केला जाणार नाही, हा निर्णय घेताना तुम्हाला मा. महासभेच्या परवानगीची किंवा जो धोरणात्मक निर्णय होता त्याकरीता तुम्हाला मा. महासभेच्या परवानगीची गरज वाटलीच नाही का? तुम्ही तुमच्या स्तरावर त्याचा निर्णय कसा दिला?

**लियाकत शेख :-**

तुमच्या स्तरावर परस्पर दिलेला आहे. मा. महासभेची साधी मंजूरी नाही. तुम्ही मा. महासभेला कॉन्फीडन्समध्ये घ्यायला पाहिजे होते की, आपल्याला असे-असे करावे लागेल. पण आमच्या या एका प्रश्नाला कसलेच उत्तर देण्यात आलेले नाही. कचऱ्याची टोपली दाखविण्यांत आलेली आहे.

**हेलन गोविंद :-**

सन्मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते. श्री. लियाकत शेख साहेब जे बोलले, त्यांच्या मताशी मी सहमत आहे. कारण संपूर्ण उत्तन, पाली, डोंगरी, चौक हा गाव तिथे स्थानिक लोक बऱ्याच वर्षापासून आहेत. तर तिथे लोकवस्तीमध्ये पिढ्या-न्-पिढ्या लोक राहात असल्यामुळे लोकांना राहण्यासाठी घरे कमी पडतात. तर लोक त्याच जागेवर दोन-तीन मजले बांधतात किंवा नवीन घर बांधतात. कारण पूर्वीची जुनी घरे रेतीची होती. तर आता सहाजिकच, सरकारी जागा कोणाची की, सातबारा उतारा असल्यामुळे त्या लोकांना आता पध्दतशीर वीज पुरवठा मिळत नाही. आता संपूर्ण मिरा भाईंदरमध्ये एखादी बिल्डींग बांधली की, ते चार पाच माळे अनधिकृत असतात, त्यांना पाइपलाईन जाणार, तिकडे लाईट बसणार, स्ट्रीट लाईट बसणार. आजपर्यंत बरेच वर्षे झाली, उत्तन परिसरामध्ये स्ट्रीट लाईट सुध्दा नाहीत. पाईपलाईन सुध्दा नाहीत. मिरा भाईंदरमध्ये एखादी बिल्डींग बांधल्यानंतर तिकडे ताबडतोब त्या बिल्डरना पाईपलाइन मिळणार, तिकडे लाईट बसवणार, संपूर्ण सुविधा पुरवणार. मग आजपर्यंत आमच्या उत्तन परिसरामध्ये भरपुर अन्याय झालेला आहे. लोक नवीन घर बांधतात ते अंधारामध्ये कसे राहणार. म्हणून तुम्ही काहीतरी खुलासा करा आणि स्ट्रीट लाईटचीसुध्दा आवश्यकता आहे.

**मा. महापौर :-**

सर्वांनी बसून घ्या.

**लियाकत शेख :-**

उत्तन व आसपासच्या परिसरामध्ये ख्रिश्चन, मुस्लिम, हिंदू अशी संमिश्र लोकवस्ती आहे. त्यामध्ये मच्छीमारी करणारे, शेती करणारे, व्यापारी, नोकरदार इत्यादी वर्गांचा समावेश आहे. मच्छीमारी हा उत्तन व आसपासच्या परिसरातील प्रमुख व्यवसाय असल्यामुळे समुद्रकिनाऱ्यावर अनेक कोळीवाडे वसलेले आहेत. परंतु, सातत्याने कुटुंबामध्ये नैसर्गिकरित्या जनसंख्या वाढत असल्यामुळे ती राहात असलेली जागा त्यांना अपुरी पडू लागली. त्यानंतर जागेच्या अभावामुळे ते त्यांच्या शेतातील जमिनित घरे बांधू लागले. मग अशा ठिकाणी स्वतःच्याच जागेत घरे बांधत असताना त्यांच्या अज्ञानीपणामुळे, तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका अथवा एम.एम.आर.डी.ए. च्या परवानगी त्यांना मिळत नसल्यामुळे, किंवा त्या प्रक्रियेची त्यांना योग्य माहिती नसल्यामुळे त्याकडे अनावधानाने दुर्लक्ष करुन अशी घरे उभी राहू लागलेली आहेत. त्याचबरोबर सुज्ञ नागरिकांनी बांधकामासाठी किंवा नवीन घर बांधण्यासाठी शासकीय परवानगी घेण्यासाठी शासकीय मुल्य भरुन त्यांना अधिकृत बांधकाम करण्याची इच्छासुध्दा आहे. असे काही लोक आहेत की, त्यांना ऑफिशिअली परवानगी पाहिजे आहे. परंतु, एका ठिकाणी एम.एम.आर.डी.ए. चे नियोजन आणि दुसऱ्या ठिकाणी एम.बी.एम.सी. चे व्यवस्थापन, आमची परिस्थिती खूपच दुहेरी कात्रीत सापडलेली आहे. तर याबाबतीत, मा. महापौर मॅडम, तुम्ही प्रत्यक्षात जातीने लक्ष घालून कार्यवाही करावी.

**मा. महापौर :-**

द इलेक्ट्रीसीटी ॲक्ट २००३ च्या कलम ४३ नुसार जर एखाद्या व्यक्तीने स्वतःच्या मालकी जमिनित अथवा झोपडपट्टयांमधील बांधलेल्या स्वतःच्या घरांमध्ये जर कोणी विजेची मागणी केली तर एका महिन्यामध्ये विजेची पूर्तता करुन देणे बंधनकारक आहे. आणि हा कायदा केंद्र शासनाने केलेला आहे. करीता या कायद्यानुसार मा. आयुक्तांनी कारवाई करावी.

**सरस्वती मयेकर :-**

मा. महापौर मॅडम, मी आपल्या परवानगीने विचारु इच्छिते की, माझा विषयसुध्दा महत्वाचा होता. तो फेटाळयाचे कारण काय आहे?

**मा. महापौर :-**

तुमचा विषय एवढा महत्वाचा नव्हता जेवढा हा महत्वाचा होता. कारण हे विजेसाठी लोक रोज येतात. तुमचा वाटल्यास आम्ही दुसऱ्या ..........................

**लियाकत शेख :-**

मॅडम, त्याच्यामध्ये लक्षवेधी घेण्यासारखे महत्वाचे नाही.

**मा. महापौर :-**

श्री. शेख साहेब, तुम्ही बसा. लक्षवेधी घ्यायची की नाही ते माझ्यावर आहे आणि मला जो विषय महत्वाचा वाटला तो मी घेतलेला आहे. तो माझा अधिकार आहे. आणि मला वाटले की, ते लोकांना जास्त गरजेचे होते म्हणून मी घेतलेला आहे.

**शरद पाटील :-**

मॅडम, तो अधिकार नक्कीच आपला आहे. तरीसुध्दा जेव्हा तीन दिवस साफसफाईचे काम बंद झाल्यानंतर या शहरामध्ये जे पिशव्यांचे साम्राज्य दिसत होते आणि पूर्ण शहरामध्ये त्या पिशव्या दिसत होत्या आणि या शहराचे नाव बदलण्यासारखे आले होते की, पिशवी शहर ठेवावे असे लोक बोलत होते.

**मा. महापौर :-**

तरीसुध्दा तुम्हाला वाटते की, लोकांनी अंधारात रहावे?

**शरद पाटील :-**

मॅडम, तो तुमचा अधिकार आहे. तुम्ही दिला. पण आम्ही त्याच्याबद्दल आमची मते तुमच्यासमोर मांडतो. नंतर तुम्ही त्याच्यावरपण निर्णय घ्या. किंवा एक विषय घ्या. याबाबत विषयपटलावर सविस्तर रितसर विषय घ्या. आणि इकडच्या प्लास्टीकच्या पिशव्या आणि प्लास्टिक बंद करावे अशा या शहराला सुचना देऊन ठेवा.

**मा. महापौर :-**

ऑलरेडी जी.आर. आलेला आहे. आणि आपण ते घेऊ.

**शरद पाटील :-**

मॅडम, त्याच्यावर कारवाई होत नाही.

**मा. महापौर :-**

मी कारवाई करायला सांगते.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५२, दि. १५/०१/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहाचे कामकाज चालू करण्यापूर्वी एक आपल्या निदर्शनास आणून देतो. मा. आयुक्त महोदय, स्टँडींग कमिटीने आपले बजेट फायनल केलेले आहे आणि आपण अंतिम मान्यतेला

मा. महासभेपूढे सादर केलेले आहे. आता २१ तारखेला आपण आर्थिक व प्रशासकीय विषयाची सभा बोलवली आहे. कोणत्याही नियमात ही सभा बसू शकत नाही. तुम्ही एकदा बजेट लॉक केल्यानंतर त्यामध्ये तुम्हाला परत बदल करता येणार नाहीत. या अधिकाऱ्यांनी ही सभा कशी लावली याचा सभागृहाला खुलासा करावा. मा. महासभेच्या अगोदर मा. स्थायी समितीमध्ये बजेट फायनल झालेले आहे. आपण त्या दिवशी सगळे अमाऊंट लॉक केले. आता तुम्ही स्टँडींगमध्ये, बजेट हे मधल्या काळाचे आहे, स्टॅडींग आणि मा. महासभेत तुम्ही त्याच्यामध्ये बदल करता. तुम्ही हे उद्या स्टँडींगमध्ये मंजूर केले तर तुम्ही आम्हाला जो बजेट दिला आहे तो पण बदल होईल. पन्नास-पन्नास लाखाचे विषय आहेत. करोडो रुपयांचे विषय आहेत. आतापर्यंत एकदा स्टँडींगने लॉक केल्यानंतर आर्थिक व प्रशासकीय विषय होत नाहीत. आपण कोणत्या कायद्याखाली आणले? आपल्याला हे पण जाणीव करुन द्यावे लागेल का? मला ऑडीटरने सांगावे. तुम्ही आम्हाला सगळे फिगर दिले, ही इन्कम, ही लॉस. दुसरे महत्वाचे, पूर्ण वर्षाचे बजेट फायनल केले आणि त्रैमासिक खर्च आता दाखवतात. आता दाखवून काय करणार? हे कोणत्या कायद्याखाली आहे ते मला सांगावे. तुम्ही ते केले तर फिगरमध्ये नक्कीच फरक पडणार? मा. आयुक्त महोदय, एवढे आपल्याला तरी माहिती असेल. आर्थिक व प्रशासकीय विषय, बाकी ठिक आहे, तुमचे जनरल विषय असतील, ज्यामध्ये आर्थिक काही फरक पडत नाही, ते निर्णय तुम्ही घ्या. आर्थिक व प्रशासकीय विषय होऊ शकत नाहीत. तर सन्मा. सभागृहाला माझी विनंती आहे की, त्यांना निर्देश द्या, जे काही आर्थिक विषय असतील ते मागे घेण्यात यावे. तुमचा बजेट फायनल झाल्यानंतर तुम्ही एक तारखेला करा. आता तुम्हाला ते करता येणार नाही. तसेच याच्यातपण झालेले आहे.

**शरद बेलवटे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. तुमचा विषय बरोबर आहे. परंतु, मी संबंधित विभागप्रमुखांना सांगितलेले आहे की, आर्थिक व प्रशासकीय मंजूरी जरी गेले असेल, परंतु निविदा प्रक्रिया ही पुढील बजेटमधूनच करावी लागेल. तोपर्यंत ते पेंडींग राहील.

**नरेंद्र मेहता :-**

निविदा प्रक्रियेचा विषय नाही. एक समजून घ्या. बजेट हा लॉक झालेला आहे. त्यामुळे तुम्हाला आर्थिक व प्रशासकीय ठेवायला काही बदल करता येणार नाही. हाव यू कॅन assume की, आम्ही मा. महासभेला हेच करणार आहोत. तुम्हाला आता तो करता येणार नाही. तुम्हाला तो विषय मागे घ्यावा लागेल. मला कोणावर आरोप करायचा नाही. एखादी चुक झाली असेल, तो आर्थिक विषय तुम्हाला मागेच घ्यावा लागेल.

**शरद बेलवटे :-**

मा. महासभेच्या मंजूरीच्या अधीन राहून ..................

**नरेंद्र मेहता :-**

मा. महासभेची मंजूरी सोडा. तुम्ही स्टँडींगमध्ये विषय मंजूर करणार आहात. मा. महासभेचा काय संबंध आहे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, त्यांनी फक्त आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मागितलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आत्ता तुमच्याकडे फंड शिल्लकच नाही तर आर्थिक देणार कसे? त्यांनी लॉक करुन फंड तुम्हाला पाठवला. आत्ता तुम्ही कुठून देणार? कोणत्या हेडखाली फंड मंजुर करणार? हे होऊच शकत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. बेलवटे साहेब, आत्ताच्या बजेटमध्ये त्याची तरतुद आहे?

**शरद बेलवटे :-**

त्याचे प्रोव्हीजन आहे, परंतु फक्त ठराव करताना...........

**नरेंद्र मेहता :-**

प्लस मायनस लॉक केलेले आहे. तुम्ही हे केल्यानंतर चॅलेंजची गोष्ट होईल. निविदा काढत रहा. कधी मंजुर होणार नाही. तुम्हाला टेक्नीकलीपण पुढच्या वर्षात हे सगळे डिफीकल्टी होईल. ही वस्तुस्थिती आहे. तुम्ही बजेट दिले नसते तर ठिक आहे. तुम्ही जेवढे आहे ते संपवा. तुम्ही बजेट लॉक केले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, त्यांनी फक्त आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मागितलेली आहे. निविदा काढण्याचे त्यांनी मागितलेले नाही त्यामुळे आपण ते करु शकतो.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, निविदा काढायला माझा काही प्रॉब्लेमच नव्हता. निविदेचा विषय असता तर मी आरोप पण केला नसता साहेब, आर्थिक व प्रशासकीय आहे, अमाऊंट लॉक केल्यानंतर हे कोणत्या फंडातुन मंजुर करणार?

**शरद बेलवटे :-**

सर, तो अपडेशन आणि मेंन्टेनन्सचा विषय आहे. तरीदेखील तुमच्या विनंतीला मान देऊन जो ठराव होईल तो मा. महासभेच्या मंजूरीच्या अधीन राहून असा होईल त्यानंतरच..

**नरेंद्र मेहता :-**

काहीतरी काय बोलता, तुम्ही पन्नास लाखासाठी मा. महासभेमध्ये कशाला येणार? आणि मा. महासभेमध्ये तुम्ही येणार तर कधी येणार? बजेट नंतरच येणार ना? मग तुम्ही बजेटनंतर डायरेक्ट या तुम्हाला उलटी प्रोसेस करायची गरज काय आहे? मा. आयुक्त महोदय, हा विषय तुम्हालाही समजला हे होऊ शकत नाही.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, मा. स्थायी समितीमध्ये जे विषय दिलेले आहेत, एकतर फायबरची झाकणे लावायची की नाही, याचा निर्णय घ्यायचा आहे. आर्थिक व प्रशासकीय मंजुरीचा अर्थ हा झाला की, हे काम पुढे करुन घ्यायचे की नाही. त्याला एक आर्थिक व प्रशासकीय मंजुरी लागते. मला तरी वाटत नाही की, आपण उद्या निविदा काढायला निघालो आहे. निविदा काढा हा विषय नाही.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, निविदा काढायला तुम्हाला अडचण नाही.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, दरवर्षी एक हेड निर्माण केलेले आहे. हेडमध्ये आपण उल्लेख करत नाही की, त्याच्यातुन कोणती कामे करुन घ्यायची एक हेड निर्माण केलेला आहे त्या हेडमधुन तो खर्च वजा केला जातो.

**नरेंद्र मेहता :-**

मग आत्ता कुठून वजा करणार?

**जुबेर इनामदार :-**

हेड निर्माण केलेला आहे. हेड आहे त्याच्यामधुन करणार त्याच्यामध्ये नविन कामे प्रस्तावित नसतात.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, प्लस मायनस अमाऊंट लॉक करुन मा. महासभेला पाठवले आहे.

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र मेहताजी, तुम्ही दिशाभुल करता. लेखाशिर्षामध्ये आपण कधी सांगतो की, इथुन इथपर्यंत पाईपलाईन टाकायची आहे किंवा ही कामे करायची आहेत. एक लेखाशिर्ष निर्माण केले जाते. त्यातुन लागणारी कामे करुन घेतली जातात. आर्थिक व प्रशासकीय मंजुरी घेतल्यानंतर.............

**मा. आयुक्त :-**

यामध्ये जी प्रक्रीया पुर्ण करण्याची आहे आणि प्रकिया पुर्ण करताना मा. महासभेच्या मंजुरी नंतरच, म्हणजे मा. महासभेची बजेटला मंजुरी प्राप्त झाल्यानंतरच त्याच्याबद्दलची पुढची कार्यवाही करण्यात येईल. ही फक्त प्रक्रिया पूर्ण करण्याची स्थिती आहे. यामध्ये समजा मा. महासभेने उद्या असा निर्णय घेतला की, आपल्याला या बजेट हेडमध्ये तरतुद ठेवायची नाही किंवा तरतुद कमी करायची आहे, तर आपोआप मा. स्थायी समितीने जो ठराव केलेला आहे तो व्यपगत होईल. जर व्यपगत झाला नाही तर त्यांना परत मागे घेण्यासाठी विनंती करण्यात येईल.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, असे असते तर तुम्ही शंभर करोड दुसरे काही प्रस्ताव असतील तर आत्ताच मंजुर करुन घेतले असते. आत्ता तुम्ही आम्हाला पत्र देता की, बजेटमध्ये तरतुद नाही म्हणून चांगली चांगली पत्र बांधकाम विभागाकडुन येतात. मग तुम्ही करुन घ्या पुढच्या बजेटमध्ये होईल झाले नाही तर ऑटोमॅटीक कॅन्सल होईल तुम्ही कामे करता का?

**मा. आयुक्त :-**

हा जो विषय ठेवण्यात आलेला आहे तो ऑपरेशन ॲन्ड मेन्टेनन्सचा विषय आहे आणि जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तो विषय आवश्यक आहे. त्यामध्ये कालाव्यपय होऊ नये, प्रक्रिया पुर्ण व्हावी आणि मा. महासभेने बजेटला मंजुरी दिल्यानंतरच त्याच्यावर अंमलबजावणी व्हावी ही भुमिका आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, ऑडीटर पण आहेत, त्या सर्वांशी माझी चर्चा झाली. तज्ञ लोकांशी चर्चा झाली. तुम्ही बजेट लॉक केलेले आहे. आत्ता याला आर्थिक व प्रशासकीय मान्यता द्यायला कोणत्या हेडखाली? तुम्हाला आत्ता त्या हेडला टच करता येणार नाही. तुम्ही त्याला टच केले तर गडबड होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

याच्यामध्ये एमर्जन्सी होती म्हणुन हा विषय घेतलेला आहे मा. आयुक्त साहेबांनी खुलासा केलेला आहे, त्यामुळे आणखीन वाद करण्यात काही मतलब नाही.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, कितीही एमर्जन्सी असले तरी तुम्ही जाऊन एक करोडचा रस्ता करु शकता का? तुम्हाला मान्यता घ्यावी लागेल. किती एमर्जन्सी असेल तरी तुम्हाला प्रोसेस फॉलो करावी लागेल ना? आणि एवढी एमर्जन्सी होती तर दहा दिवसांपूर्वी का मंजुर केले नाही?

**मा. आयुक्त :-**

हा एमर्जन्सीचा विषय आहे. आणि मा. महासभेच्या मान्यतेनंतरच त्याच्यावर अंमलबजावणी होईल.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही मा. महासभेला परत विषय सादर करणार का?

**मा. आयुक्त :-**

मा. महासभेने बजेटला मान्यता दिल्यानंतर मा. स्थायी समितीने जे केलेले आहे त्याची मान्यता मिळाल्यानंतरच अंमलबजावणी होईल.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, लिस्टन टू मी इज दॅट नॉट पॉसीबल मा. आयुक्त साहेब, आपण काहीतरी उत्तर देऊ नका. प्रत्येक गोष्टीला आम्हाला तक्रार करावी लागते. हे होतच नाही. तुम्ही ऑडीटरना विचारा आर्थिक व प्रशासकीय होऊ शकते का? आजच्या मा. महासभेमध्ये जे आर्थिक व प्रशासकीय केलेले आहे, आत्ता वी हॅव द झीरो फंड टू युज. ते सगळे फिगर लॉक झालेले आहेत. आर्थिक व प्रशासकीय विषय तुम्हाला बजेट नंतरच करता येतील. तुम्ही कसे करणार? मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

**मा. महापौर :-**

ते बोलले की, त्यांनी एमर्जन्सीमध्ये घेतलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

गोल-गोल उत्तर देतात क्लीअर करावे.

**भागवत मुरकुटे (मा. मुख्य लेखापरिक्षक) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. साहेब, ही जी आर्थिक व प्रशासकीय मान्यता घेतलेली आहे, आपला २०१२-१३ चा जो अर्थसंकल्प मंजुर झालेला आहे, मा. महासभेने मंजुर केला होता. त्याची तरतुद शिल्लक आहे. त्यातुनच आपण ते प्रस्तावित करत आहोत. ही आर्थिक व प्रशासकीय मान्यता झाल्यानंतर जी निविदा प्रक्रिया होणार आहे, ती २०१३-१४ या आर्थिक वर्षात होणार आहे. आपण ज्या प्रशासकीय मान्यता घेतो त्या पाच वर्षाकरीता कार्यान्वीत असतात. म्हणजे पाच वर्षात आपल्याला ते काम कधीही हातात घेता येते. आत्ता आपण ती फक्त तातडीची बाब असल्यामुळे..........

**नरेंद्र मेहता :-**

पाच वर्षे काय बोलले?

**भागवत मुरकुटे (मा. मुख्य लेखापरिक्षक) :-**

कोणत्याही प्रशासकीय मान्यता पाच वर्षे ॲक्टीव्ह असतात तर आपण आत्ता ज्या आर्थिक व प्रशासकीय मान्यता घेतो ते फक्त कामाची निकड बघुन घेत आहोत आणि मागच्या वर्षाची जी मंजुर तरतुद आहे त्यात तरतुद शिल्लक आहे त्यातुनच आपण ती घेत आहोत ते आत्ता खर्च पडणार नाही म्हणजे ते पैसे पुढे कॅरी फॉरवर्ड होणारच आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

मग मी असे गृहीत धरु का की, तुम्ही हा जो काही खर्च आहे तो पुढच्या बजेटमध्ये टाकणार? तुम्ही ॲडव्हान्समध्ये करत आहात.

**भागवत मुरकुटे (मा. मुख्य लेखापरिक्षक) :-**

आपण आर्थिक व प्रशासकीय मान्यता घेतो आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मग ते ॲडव्हान्सच झाले ना? खर्च पुढच्या वर्षी टाकणार आहात, त्या बजेटच्या अनुषंगाने?

**मा. महापौर :-**

ते पुढचे बोलत नाही ते सांगतात की, गेल्या बजेटमध्ये जे ऑलरेडी सॅक्शन झालेले आहे त्याच्यासाठी ते मागत आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

ते तसे बोलत असतील तर माझे त्याच्या मध्ये असे उत्तर आहे की, मी एखादे ओपन लॅन्ड टॅक्स सांगतो. तुम्ही पुढच्या वर्षी दहा करोड दाखवलेले आहे. आत्ता तुम्ही मला दहा करोड कुठली फिगर दिली. जी बाकी आहे तेच दिले. दहा करोड त्या वर्षात येणार आहेत का तर नाही. तुम्ही आम्हाला ते सगळे पुढच्या याच्यात दाखवले तुम्ही सगळे ॲड ऑन करुन आम्हाला नविन फिगर दिली आत्ता तुम्हाला जुन्यामध्ये कसे वापरता येईल आयदर तुम्ही असे सांगा की, आत्ता आम्ही जे मंजुर करतो, तो खर्च पुढचे बजेट जे काही मा. महासभेमध्ये मान्य होईल त्यामधुन तो खर्च कमी होईल. उद्या तुम्ही स्टँडींग मध्ये जो काही मान्य करणार, २६ ला बजेट झाल्यानंतर तो खर्च पडेल असे तुमचे म्हणणे आहे का?

**भागवत मुरकुटे (मा. मुख्य लेखापरिक्षक) :-**

त्यानंतरच खर्च पडणार आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तसे मी आत्ता मम्मीजींना आठवण करुन देतो, श्री. दिपक खांबित इकडे बसलेले आहेत. ऑक्टोबर नोव्हेंबर महिन्यात नाल्याचा विषय होता. आम्ही सांगितलेले की, हा खर्च पडत नाही निविदा काढा आणि त्यानंतर मार्चला काम चालु होईल ठराव मांडला होता की, निलंबीत करा. अधिकाऱ्यांनी दिशाभुल कशी केली? बजेटमध्ये तरतुद नसताना विषय कसा दिला? प्रोसिडींग काढा आणि बघा. तुम्ही डॉक्टरला निलंबित केले. मा. महापौर मॅडम, तुम्हालाही आठवण असेल आपण दोन दिवस सभा तहकुब ठेवली होती यासाठी की आम्ही एक भावना आणली होती की, आत्ता आपण प्रोसेस केली तर एप्रिलला नाल्याचे काम सुरु होईल. पावसापर्यंत कम्प्लीट होईल सभागृहाने तसा ठरावच केला की, निलंबीत करा.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम तेव्हा तो लेखाशिर्षकच निर्माण केला नव्हता. मला एकच विचारायचे आहे. ऑडीटर साहेब, मला एक सांगा, लेखाशिर्ष लॉक झाला. आपण एका लेखाशिर्षाखाली आठ-दहा कोटी एकदा ठेवल्या नंतर तो लॉक झाला. विषय आर्थिक व प्रशासकीय मंजुरीचा असतो. त्या लेखाशिर्षाअंतर्गत कोणती कामे होणार आहेत याचा उल्लेख कधी आपण अर्थसंकल्पामध्ये केला आहे का?

**भागवत मुरकुटे (मा. मुख्य लेखापरिक्षक) :-**

नाही.

**जुबेर इनामदार :-**

करत नाही. तिथे तुमचा विषय संपला. साहेब, सन्मा. सदस्य फक्त दिशाभुल करत आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

कसली दिशाभुल आम्हाला मा. आयुक्तांनी लेखी द्यावे की, स्टँडींगला बजेट झाल्यानंतर आर्थिक व प्रशासकीय मान्यता होईल.

**मा. महापौर :-**

तुम्ही जे बोलता त्याच्यावरच बोलून संपवा. तुम्ही दिड-दोन तास याच्यावर बोलणार का?

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, महत्वाचा विषय आहे जो आज सभागृहात बेकायदेशीर ठरणार.

**मा. महापौर :-**

एवढा महत्वाचा होता तर तुम्ही काल येऊन मा. आयुक्तांच्या निदर्शनास आणायला पाहिजे होते.

**नरेंद्र मेहता :-**

मी स्टँडीगचा सदस्य नाही. मला कालच संध्याकाळी हा स्टँडीगचा अजेंडा मिळाला आपण विरोधी पक्षनेता दालनामध्ये दिला होता. मला काल आला त्यावेळी हे आश्चर्य वाटले. मी इतर ठिकाणी माहिती जमा केली. आपल्या अधिकाऱ्यांशी बोललो की, साहेब असे करता येत नाही. आजपर्यंत महापालिकेच्या इतिहासामध्ये कधी असे झालेले नाही.

**मा. महापौर :-**

तुम्ही अधिकाऱ्यांकडुनच माहिती गोळा केली ना? मग ज्यांनी सांगितले त्यांना बोलायला सांगा की, इथे होत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मी महापालिकेच्या अधिकाऱ्यांवर राहत नाही. ठाणे सचिव, जे स्वराज्य संस्थेचे लोक आहेत, त्यांच्याकडून मी माहिती घेतली आणि तद्नंतर बोलतो. मा. आयुक्त महोदय, आजपण सभागृहामध्ये आर्थिक व प्रशासकीय विषय आहे. आत्ता मला सांगा, तुम्ही हे कसे करणार? तुम्ही ऑलरेडी बजेट लॉक केले आहे. बजेटची मिटींग लावली आहे. मग आत्ता मध्ये जाऊन तुम्ही फंड कसे काढून घेणार? हाऊ ईट ईज पॉसीबल? तुम्ही बाकी पॉलीसी डिसीजन, ठराव, निविदा घ्या. आर्थिक व प्रशासकीय मान्यता देता येणार नाही.

**मा. आयुक्त :-**

मी स्पष्ट केलेले आहे की, मा. महासभेने बजेट मंजुर केल्याच्या अधीन राहूनच हे निर्णय घ्यावे लागतील. कालपव्यय होणार नाही आणि पुढे जेव्हा बजेट मंजुर होईल त्या बजेट हेडमध्ये जी तरतुद असेल त्याच्या मर्यादेमध्ये तो खर्च करण्यात येईल. त्यामध्ये जर रिॲप्रोप्रिएशन करायचे असेल तर आपल्याला परत रिॲप्रोप्रिएशनची प्रक्रिया पूर्णपणे दक्षता घेण्यात येईल आणि समजा बजेट हेडमध्ये आपण तरतुद ठेवली नाही असा निर्णय घेतला तर तो ठराव मागे घेण्यासाठी मा. स्थायी समितीला सुचित करण्यात येईल.

**नरेंद्र मेहता :-**

आत्ता मा. महासभेचे काय करणार आहात? आज आर्थिक व प्रशासकीय मान्यतेचा विषय मा. महासभेतपण आहे. आत्ता तुमचे बजेटचे फिगर लॉक आहेत हे कोणत्या हेडमध्ये देणार? हे पण पुढच्या वर्षी?

**भागवत मुरकुटे (मा. मुख्य लेखापरिक्षक) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. साहेब, बजेटमध्ये आपण जे प्रोव्हीजन केलेले आहेत. त्यापैकी अद्याप ही रक्कम अखर्चित आहे जी आपण आत्ता घेतलेले फिगर्स आहेत, त्यामध्ये रक्कम अखर्चित आहे त्यातुनच आपण हे प्रस्तावित केलेले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

म्हणून मी तुम्हाला उदाहरणही दिले. तुम्ही दहा करोड रुपये ओपन लॅन्ड टॅक्सचे दाखवलेले आहेत. हे तुम्ही आम्हाला येणाऱ्या वर्षात दाखवलेले आहेत. ते कुठले दाखवले? या वर्षाचे बाकी आहेत म्हणून दाखवले ना? तर आत्ता ते साडेनऊ करणार का?

**भागवत मुरकुटे (मा. मुख्य लेखापरिक्षक) :-**

नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मग कसे होईल?

**जुबेर इनामदार :-**

या मा. महासभेत आर्थिक व प्रशासकीय मंजुरीचा विषय कुठे आहे?

**नरेद्र मेहता :-**

आहे, शौचालायाचा एक विषय आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठराव होण्यापूर्वी तुम्हाला कसे माहिती की, आम्ही करणार? प्रशासनाने विषय दिला असेल त्याच्यामध्ये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी कुठे आहे?

**नरेंद्र मेहता :-**

तसे तर मी पहिलेच सांगितले की, आपण मागे घेतला तर माझे काही म्हणणे नाही.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम हे दिशाभुल करतात.

**(सभागृहात गोंधळ)**

**मा. महापौर :-**

तुम्हाला अजुन काही प्रॉब्लेम असेल तर त्यांच्या दालनात जाऊन तुम्ही सॅटीसफॅक्टरी आन्सर घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. महापौर मॅडम, के परमिशन से बोलता हूँ। श्री. ध्रुवकिशोर पाटील साहेब ने बोला की, एमर्जन्सी है और सत्तापक्ष ने स्विकार किया। यह एमर्जन्सी का विषय कैसा है यह मै बताता हूँ। यह १५ फरवरी का मुंबई मिरर मे न्युज है की, टु गर्लस फॉल इन ओपन मेनहॉल यह १५ फरवरी का विषय था। बच्ची नाले मे गिरकर मर गयी। आज २० मार्च है। फरवरी और २० मार्च मे एमर्जन्सी ऐसी होती है? यह विषय अगर एमर्जन्सी का है तो उस टाईम लाना चाहीए था। यह विषय असल मे ऐसा है की, स्टँडींग मे चर्चा हुई थी की, घटीया क्वालीटी के गटर के ढक्कन। इसिलिए चर्चा हुई थी की, फायबर लाने चाहीए। कहने का मतलब यह प्रस्ताव, स्टँडींग कमिटी की जो मिटींग लॉक हुई,उसके अनुसार ही है तो स्टँडींग कमिटी की जो मिटींग हुई उसको मा. महासभा मे प्रस्ताव पारित हो जाए और बाद मे लाना चाहीए।

(सभागृहात गोंधळ)

**प्र. नगरसचिव :-**

दि.१५/०१/२०१३ रोजीचे इतिवृत्तांत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब, पान क्र.२३ व २४ मध्ये अनुक्रमांक ६६ व ६८ मध्ये अनावधनाने शैक्षणिक पात्रता चुकीची छपाई झाली असुन सदर ठिकाणी खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे अशी माझी सुचना आहे आणि हे दुरुस्ती पत्रक आहे. हे याच्यामध्ये ॲड करुन घ्यावे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो. पान क्र.५६ मध्ये आम्ही मागे विषय काढला होता की, अंडरग्राऊंड ड्रेनेजचे काम करायचे होते. त्यावेळेला मा. आयुक्त श्री. विक्रमकुमार साहेबांनी सांगितले होते की, मार्च पासुन मे पर्यंत पुर्वेकडील पट्टा चालु करायचा होता पण आज मार्चची २० तारीख झाली. त्याच्यामध्ये कशाचा पत्ता नाही.

**मा. महापौर :-**

ते नंतर बोलु पहिले हे इतिवृत्तांत कायम करु द्या.

**ध्रुवक्रिशोर पाटील :-**

दि. १५/०१/२०१३ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मागच्या मा. महासभेत जो विषय झाला होता, आपण जे लक्षवेधी ठराव करतो त्याची माहिती द्यायची असते. त्याची माहिती प्रशासनाकडुन अजून मिळतच नाही. अनुपालन अहवालाची.

**प्र. नगरसचिव :-**

अनुपालन अहवालाची तीन विभागांची माहिती माझ्याकडे प्राप्त झालेली आहे. काल संध्याकाळी उशिरा प्राप्त झाली. तुम्हाला लंच हवर्समध्ये त्याच्या झेरॉक्स देणार.

**मा. महापौर :-**

ठराव दुरुस्तीसह कायम करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ५२ :-**

दि. १५/०१/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ६१ :-**

दि. १५/०१/२०१३ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५३, महिला व बालकल्याण समिती अंतर्गत प्रशिक्षण करणेकामी आलेल्या निविदा मंजूरी बाबत. (मा. महिला व बालकल्याण समिती सभा दि. १४/०२/२०१३, ठराव क्र.५)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महिला व बालकल्याण योजने अंतर्गत विविध व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याबाबत वर्तमान पत्रामध्ये ऑन लाईन जाहिरातीनुसार एकुण सहा निविदा आल्या आहेत.

तरी बालाजी प्रसार ॲण्ड समाजकल्याण संस्था यांचे दर कमी आहेत पण बालाजी प्रसार ॲण्ड समाजकल्याण संस्थेच्या अध्यक्ष्या व वैभवलक्ष्मी महिला व बालके विकास गटाच्या अध्यक्षा या स्नेहल पवार आहेत. शिक्षण विभागाने वैभवलक्ष्मी महिला व बालके विकास गटाला काळया यादीत टाकलेले आहे. तसेच त्याच्या कामाबद्दल बऱ्याचश्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्या अन्वये सदर बालाजी प्रसार ॲण्ड समाजकल्याण संस्थेच्या निविदा फेटाळण्यात येत आहे.

तरी शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २००५ प्र.क्र.१५६/०५/नवि२० दिनांक ३० डिसेंबर २००६ मंत्रालय मुंबई याअन्वये मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी शासकिय व अशासकिय संस्थामार्फत प्रशिक्षण देण्याचे नमुद आहे.

तसेच यापुढे महिला व बालकल्याण समिती अंतर्गत पुढीलप्रमाणे प्रशिक्षणासाठी ब्युटीपार्लर,टायपिंग, शिवणकाम, वाहनचालक प्रशिक्षण (महिला/पुरूष), एम.एस.सी.आय.टी. (MS-CIT) इत्यादी प्रशिक्षण देणेबाबतचा दोन वर्षाचा अनुभव असलेल्या शासकिय व निमशासकिय मान्यताप्राप्त संस्थेमार्फत कागदपत्रासह अर्ज मागविण्यास व महिला बालकल्याण समितीच्या स्तरावर कार्यवाही करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

निविदा मान्यतेला स्थायी समितीपूढे जाते. हा पहिला विषय असा आहे जो महिला बालकल्याण मधून निविदेचा विषय गेला आहे. अस होते का? त्याचा आपण खुलासा करावा, हा विषय इकडे कसा आणला ते मला माहित नाही. कारण निविदा मागवल्यानंतर हा स्टॅन्डिंगपूढे जायला पाहिजे. हे मान्यच झाले नाही. तुम्ही निविदा काढून मोकळे झाले. हा विषय बॉडीने ॲप्रूव्ह केला नाही. आपण निविदा पण काढली आणि ती महिला बालकल्याणमध्ये मांडली. मला सांगा हे स्टॅन्डिंगमध्ये जायला पाहिजे की महिला बालकल्याण समिती निर्णय घेईल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, निविदा मागवून आर्थिक, प्रशासकीय मंजूरीसाठी महिला बालकल्याण समितीपूढे विषय ठेवलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

निविदा मागवली की नाही?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

निविदा मागवली होती.

**नरेंद्र मेहता :-**

निविदा कोणाच्या ह्याच्याने मागवली.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. आयुक्तांच्या अधिकारात मागवली होती. माहितीसाठी मंजूरी घेणार होतो.

**नरेंद्र मेहता :-**

निविदा ओपन केली नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ओपन केली होती.

**नरेंद्र मेहता :-**

कूठे ओपन केली.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आम्ही ओपन केली. स्टॅन्डिंगची मंजूरी घेणार होतो. मध्यंतरी महिला बालकल्याण समितीची आर्थिक, प्रशासकीय मंजूरी घेऊन महासभेने अधिकार न दिल्यामूळे महिला बालकल्याण समितीला फक्त अवलोकन करुन तो विषय महासभेत ठेवला होता.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय ह्या विषयाची निविदा ओपन केली गेली. महिला बालकल्याण समितीला मान्यतेला ठेवली त्यावेळी आमच्या ही लोकांनी विरोध केला. त्यांनाही ते पटले की, हे चूकीचे झाले आहे. अशाच प्रकारचे कामकाज चालवायचे का? निविदा ओपन करुन स्टॅन्डिंगपूढे जायला पाहिजे. महिला बालकल्याण समितीपूढे नाही. ती ओपन का केली आणि ओपन करुन पूटअप केली आणि आता बोलता आर्थिक प्रशासकीय मान्यता, म्हणजे निविदा प्रोसेस पूर्ण केली आणि आता बोलता आर्थिक, प्रशासकीय मान्यता द्या. मा. आयुक्त साहेब, काय कार्यभार चालला आहे ते समजत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मध्यंतरी इलेक्शन चालू होती. तेव्हाची निविदा आहे. आताची नाही. निविदा २१/०५/२०१२ ची निविदा आहे.

**जुबेर इनामदार :-**

पानपट्टे साहेब, आर्थिक, प्रशासकीय मंजूरी कुठे एक तर त्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकतो त्याचा उल्लेख आहे. दुसरे त्याच्यामध्ये धोरणात्मक निर्णय घ्यायचा जी.आर. प्रमाणे कारवाई करावी. काही सूचना आहेत. त्या ठरावामध्ये केले आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

महिला बालकल्याण समितीला ह्या सगळ्या गोष्टी निदर्शनास आणून दिल्या.

(सभागृहात गोंधळ)

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

महिला बालकल्याण समितीला धोरणात्मक निर्णय घ्यायचे अधिकार दिले नव्हते.

**नरेंद्र मेहता :-**

सन्मा. जुबेर इनामदार हे महिला बालकल्याण समितीला मान्यतेला पूट अप केली होती. महिला बालकल्याण समितीने तो निर्णय घ्यायचा कार्यादेश टाकायचा जे काही करायचे असेल. तुम्ही त्यांच्याकडे पूटअपच कशी केली.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्यांना माहितीसाठी ........................

**नरेंद्र मेहता :-**

निविदा ओपन करुन पूटअप करायची असते का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्यांच्या मार्फत जाणार होते. त्यांना ते अधिकार नाहीत.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, निविदा ओपन करुन पूटअप करायची असते का? त्यांनी कशी काय पूटअप केली.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

स्टॅन्डिंग आणि महासभेला त्याच्यामार्फत जाणार होती.

**नरेंद्र मेहता :-**

स्टॅन्डिंगच्या निविदा डायरेक्ट जातात. त्याच्याशिवाय ओपन होत नाही. प्रभाग समितीच्या निविदा कधी पाठवली आहे. जेवढे अध्यक्ष आहेत त्यांना विचारा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

महिला बालकल्याण समितीच्या नॉलेजमध्ये साहेब त्यांनी पाठवले.

**नरेंद्र मेहता :-**

त्याच्यापेक्षा प्रभाग समितीची बजेटमध्ये तरतूद मोठी आहे. त्याच्याकडे कधी निविदा पाठवली का? की तुम्ही मान्य करा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

महिला बालकल्याणमध्ये कोणते प्रशिक्षण आहे त्याच्या माहितीसाठी आपण पाठवतो.

**नरेंद्र मेहता :-**

ज्या-ज्या वेळी आपण निविदा मागवतो. कूठलीही असू द्या. ते स्टॅन्डिंगपूढे जाऊन त्याचे निर्णय होतात. स्टॅन्डिंगला अधिकार आहे. महासभेपूढे शिफारस करायची. महिला बालकल्याणची निविदा मागवली त्याला आर्थिक, प्रशासकीय मान्यता नसताना हे बोलतात इलेक्शनच्या काळात आचार संहिता असताना निविदा मागवायची गरज काय होती. आणि इलेक्शन होऊन आठ महिने झाले आठ महिन्यात तुम्ही मागवू शकत नाही का? मा. आयुक्त महोदय, ह्यावर आपण काय निर्णय देणार. दरवेळेला अशा प्रकारचेच कामकाज चालू आहे. अधिकारी अशाप्रकारे कामकाज करणार तर चालवून घेणार का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, ह्याच्यात ५० लाखाची तरतूद होती. ती काहीच खर्च झाली नव्हती. ती मा. आयुक्तांच्या अधिकारात खर्च करण्यासाठी...............

**नरेंद्र मेहता :-**

असे बरेच हेड आहेत ज्याच्यात काहीच खर्च झाले नाहीत. म्हणून निविदा काढायची का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मध्यंतरी महिला बालकल्याण समिती स्थापन झाली नव्हती. म्हणून हा विषय घेतला होता.

**सुमन कोठारी :-**

महिला बालकल्याण समिती के मिटींग में हम लोगो ने ऑब्जेक्शन किया था। जब तक स्थायी समिती में पास नही होता आप लोगो ने निविदा कैसे निकाली। हम लोगो ने विरोध किया था।.

**नरेंद्र मेहता :-**

महिला बालकल्याण समिती स्थापनच झाली नाही आणि ह्या लोकांनी निविदा काढली.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, मा. आयुक्तांच्या अधिकारात निविदा काढली.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्हाला अधिकार होता का?

**प्रभात पाटील :-**

तुम्ही कायदेशीर मुद्याने बोलता ती गोष्ट बरोबर आहे. पण मला एक सांगा ती महिला समिती महिलांसाठी काम करते. त्याच्यासाठी काम करते. जर एक मोठा इश्यू तिथे दिसतो आणि तो प्रशासनाने पटलावर आणला सदरच्या निविदा आल्या आहेत त्यांनाच काळ्या यादीत टाकले आहे. तर त्यांनी निर्णय घेतला तो योग्य आहे ना.

**नरेंद्र मेहता :-**

मी कुठे विरोध करतो.

**प्रभात पाटील :-**

कशासाठी विरोध करायचा.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, माझ्या निर्णयाचा विषय नाही. तुम्ही कोणत्याही यादीत टाका माझे काही म्हणणे नाही. मी म्हणतो ह्या निविदा ओपन करुन महिला बालकल्याण समितीपूढे सादर केले.

**प्रभात पाटील :-**

ते चांगल झाल ना.

**नरेंद्र मेहता :-**

तिकडे ओपन का केले, स्टॅन्डिंग आहे ना?

**प्रभात पाटील :-**

जे झाले ते चूकीचे आहे ते मी मान्य करते. पण जे झाले ते चांगल्यासाठीच झाले. त्यामुळे कोण काळे आहेत, कोण गोरे आहेत ते कळले ना. हे स्पष्ट झाल्यामुळे आपल्याला निविदा प्रक्रिया थांबवण्यात येईल.

**नरेंद्र मेहता :-**

माझी अशी विनंती राहील ह्यापूढे सगळेच विषय इकडे आणा. म्हणजे आपल्याला गोरे आणि काळे कोण आहेत ते माहित पडेल.

**प्रभात पाटील :-**

मी असेपण म्हणते, तुम्ही म्हणता ते अतिशय चांगले आहे. मी महिला बालकल्याणमध्ये नाही म्हणून तिकडची प्रोसीजर माहितच पडू नये असे होणार नाही. सगळे महासभेत येऊ दे. चांगली गोष्ट आहे. सगळ्यांना माहित पडेल.

**नरेंद्र मेहता :-**

महिला बालकल्याण समितीला विशेष अधिकार आहे. तो त्यांच्याकडेच राहावा. त्यांनी निर्णय घ्यावा कुठे खर्च करायचा. त्यांना संपूर्ण अधिकार आहे. तो आमचा अधिकार नाही. आम्ही फंड दिला आहे. त्यांना संपूर्ण अधिकार आहे. त्यांनी निर्णय घ्यावा पण मान्यतेसाठी स्टॅन्डिंग महिला बालकल्याण समितीत पूटअप अधिकाऱ्याने का केल.

**प्रभात पाटील :-**

मेहता साहेब, ह्या देशाचा इतिहास की, महिलांसाठी जेवढे कायदे झाले, आणि ज्या सुधारणा झाल्या त्या सगळ्या पुरुष वर्गानी केल्या. तुमच्याकडे प्रस्ताव आला. हो म्हणा. तुम्हाला चांगली ओपॉच्यूनिटी आहे. हो म्हणा. उगीच विरोध करु नका. मागच्या वेळेला तेच केले.

**नरेंद्र मेहता :-**

मी कुठे विरोध करतो. मी तर बोलतो इझी झाले असते.

**ग्रिटा फॅरो :-**

त्यावेळेला तुम्ही अधिकार दिला असता तर इझी झाले असते.

**नरेंद्र मेहता :-**

मग गडबड झाली असती.

**ग्रिटा फॅरो :-**

आम्ही निर्णय घेतला असता. मा. आयुक्तांनी ह्या निविदा काढल्या आहेत.

**मा. आयुक्त :-**

ह्याच्यामध्ये एकच मुद्दा आहे, आर्थिक प्रशासकीय मान्यता घेऊन निविदा काढणे हा प्रोसीजरचा भाग होता. त्याचे पालन झाले किंवा नाही किंवा ज्या काही निविदा काढण्यात आल्या त्या ज्यांच्या मान्यतेने काढलेल्या होत्या त्यांना अधिकार आहे किंवा नाही हे तपासले जाईल आणि आवश्यक त्या प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

**नरेंद्र मेहता :-**

ते ठीक आहे. ज्या अधिकाऱ्यांनी स्टॅन्डिंगपूढे सादर केले त्या अधिकाऱ्यावर कारवाई करा. सभागृहाची दिशाभूल करण्याचे काम चालू आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ५३ :-**

महिला व बालकल्याण समिती अंतर्गत प्रशिक्षण करणेकामी आलेल्या निविदा मंजूरी बाबत. (मा. महिला व बालकल्याण समिती सभा दि. १४/०२/२०१३, ठराव क्र.५)

**ठराव क्र. ६२ :-**

महिला व बालकल्याण योजने अंतर्गत विविध व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याबाबत वर्तमान पत्रामध्ये ऑन लाईन जाहिरातीनुसार एकुण सहा निविदा आल्या आहेत.

तरी बालाजी प्रसार ॲण्ड समाजकल्याण संस्था यांचे दर कमी आहेत पण बालाजी प्रसार ॲण्ड समाजकल्याण संस्थेच्या अध्यक्ष्या व वैभवलक्ष्मी महिला व बालके विकास गटाच्या अध्यक्षा या स्नेहल पवार आहेत. शिक्षण विभागाने वैभवलक्ष्मी महिला व बालके विकास गटाला काळया यादीत टाकलेले आहे. तसेच त्याच्या कामाबद्दल बऱ्याचश्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्या अन्वये सदर बालाजी प्रसार ॲण्ड समाजकल्याण संस्थेच्या निविदा फेटाळण्यात येत आहे.

तरी शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २००५ प्र.क्र.१५६/०५/नवि२० दिनांक ३० डिसेंबर २००६ मंत्रालय मुंबई याअन्वये मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी शासकिय व अशासकिय संस्थामार्फत प्रशिक्षण देण्याचे नमुद आहे.

तसेच यापुढे महिला व बालकल्याण समिती अंतर्गत पुढीलप्रमाणे प्रशिक्षणासाठी ब्युटीपार्लर,टायपिंग, शिवणकाम, वाहनचालक प्रशिक्षण (महिला/पुरूष), एम.एस.सी.आय.टी. (MS-CIT) इत्यादी प्रशिक्षण

देणेबाबतचा दोन वर्षाचा अनुभव असलेल्या शासकिय व निमशासकिय मान्यताप्राप्त संस्थेमार्फत कागदपत्रासह अर्ज मागविण्यास व महिला बालकल्याण समितीच्या स्तरावर कार्यवाही करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५४, मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील स्वच्छतागृहाचे संचलन, देखभाल व दुरुस्ती करणाऱ्या वस्ती पातळीवरील संस्था (सीबीओ) व महानगरपालिकेने नियुक्त केलेले ठेकेदार यांना ठराविक रक्कम अदा करणेस मान्यता देणे. (दि. ०७/०३/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले प्रकरण क्र. ४३)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जी स्वच्छतागृहे एम.एम.आर.डी.ए च्या निधितून बांधण्यात आलेली आहेत, अशी स्वच्छतागृहाची उर्वरीत कामे व दुरुस्ती कामे संबंधित ठेकेदाराकडून एका महिन्यात पूर्ण करुन घेण्यात यावीत. तद्नंतर त्यांचे देयके प्रदान करण्यात यावीत. जर ठेकेदारांनी एका महिन्याच्या आत स्वखर्चाने स्वच्छता गृहाची दुरुस्ती न केल्यास त्यांच्या रक्कमेतून मनपा मार्फत सदर दुरुस्ती कामे करुन घेण्यात यावीत. दुरुस्ती कामे पूर्ण होईपर्यंत सदर ठेकेदारांना देयक प्रदान करु नये. ज्या झोपडपट्टीत मनपाची स्वतः ची शौचालये आहेत त्याची साफसफाई करणाऱ्या संस्थाना देखिल अनुदान देण्यात यावे. निर्मल अभियान व इतर स्वच्छतागृहाचे देखभाल व दुरुस्ती करीता सदर संस्थानी रु. ३५/- प्रति कुटुंब दर आकारावेत. मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०३/२०१३ ठराव क्र. ३९ नुसार कार्यवाही करण्यास ही सभा अंतिम मंजूरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर

**नरेंद्र मेहता :-**

एम.एम.आर.डी.ने शौचालय बांधण्यासाठी आपल्याला जी ग्रॅन्ड दिली होती आणि त्या अनुशंगाने जेवढी संस्था त्यांनी बांधली त्यामध्ये त्यांनी तिकडेच राहायचे त्यासाठी त्यांना वरती घरसुध्दा दिली. त्यांनी हे मेन्टेन करायचे आणि तिकडून ३५ रु. किंवा पर व्यक्ति आपण ठरवतो. त्याप्रमाणे पैसे वसूल करुन ते चालवायचे आहे. नो प्रॉफिट नो लॉस वर. ही देखभाल दुरुस्ती बरोबर होत नाही म्हणून हा विषय आपण सादर केलेला आहे. चेंजेस करायला साहेब महासभेमध्ये ह्यावर मूळ ठराव झालेला होता की, एम.एम.आर.डी.ए. कडून असे ग्रॅन्ड येणार आहेत तर ह्या कंडीशनवर संस्थेला चालवायला द्यायचे १५० रु. प्रति सीट म्हटलेल आहे. मी ठराव नीट ऐकलेला नाही. पण एका ठिकाणी १५० रु. दिले तरी साफ होऊ शकत नाही. अशी परिस्थिती आहे आणि काही ठिकाणी नाही दिले तरी होऊ शकतात. इट्स द नंबर ऑफ वॉल्यूम. आता नयना मॅडमनी सांगितले त्याच्याकडे एट सिटींगचे आहे. त्याला तुम्ही १२०० रु. द्या. काय हिशोबाने ते अजून चालूच झाले नाही बंद पडले आहे. १२०० रुपयाला कोणी जाणारच नाही. माझे असे म्हणणे राहील की इन्डीव्यूजवली जेवढी आपली तुम्ही द्या आमची काही हरकत नाही. कारण साफसफाई झाली पाहिजे. नागरिकांना सुविधा भेटली पाहिजे. तुम्ही इन्डीव्युजवल कॉल केला तर तुम्हाला व्यवस्थित रिपोर्ट भेटेल. कोण-कोण हे करायला इच्छूक आहेत. काही ठिकाणी १२०० च्या जागेवर १८०० द्यायला लागेल ना. आठ सिटींगचे १२०० होतात. तुम्ही २००० दिले तरी आमची हरकत नाही. पण काही ठिकाणी कमी पण होईल. विनंती अशी राहील की, इन्डीव्यूजवली तपास करा. ह्या कॉमन फॅक्टरमध्ये परत तोच प्रॉब्लेम होणार आहे की व्यवस्थित साफसफाई होणार नाही. मा. महापौर मॅडम हा विषय महासभेने मंजूर केल्यानंतर आपण त्यामध्ये अमेन्ट करतो आहे की १५० रु. प्रती सीट द्यावे. मा. आयुक्त महोदय हा ही स्टॅन्डिंगमध्ये मान्यतेला पाठवला होता. त्यावेळेला आम्ही विरोध केला नसता तर मंजूर झाला असता दर वेळेला असे दिसून येते की, स्टॅन्डिंगला बी.जे.पी. वाले विरोध करतात. हा विषय महासभेचा होता. तुम्ही स्टॅन्डिंगकडे पाठवला. त्यानंतर खांबित साहेब बोलले आमच्याकडून हे चूकले आम्ही महासभेला शिफारस करु. मग आमचे सदस्य तिकडे बोलले तर तुम्हाला वाटते हे विरोधच करतात. ह्या गोष्टी तुमच्या नजरेत येत नाहीत. ही पॉलिसी डिसीजन आहे. त्याच्यामध्ये फेरबदल करा. तुम्ही कुठलाही विषय कुठेही पाठवता. मग इकडे वाटते आम्ही काही न काही काढत असतो. आम्हाला प्रत्येक विषयाला विरोध करावा लागतो.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर मॅडम ह्या विषयावर बोलायचे आहे. हे जे शौचालय आपण देतो सध्या हे शौचालय कोण चालवते. सी.बी.ओ. की कॉन्ट्रॅक्टर चालवतात.

**मा. महापौर :-**

दोघे पण चालवतात.

**दिपक खांबित :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो. एम.एम.आर.डी.ए. मार्फत आपल्या हद्दीमध्ये १४६ ठिकाणी शौचालय बांधली आहेत. जवळ-जवळ तीन हजार सीटची शौचालये आहेत. सदर शौचालये सी.बी.ओ. ने चालवायची आहेत आणि त्यांना जो खर्च होईल तो वापरणाऱ्याकडून त्यांनी वसूल करायचा होता असे होते. दरम्यानच्या काळात काही सी.बी.ओ. मार्फत व्यवस्थित साफसफाई होत नव्हती. आम्ही सी.बी.ओ. ला नोटीस काढल्या पण ते बोलले की, वापरणारे लोक आम्हाला पैसेच देत नाहीत. मीटर बंद झाले अशा ठिकाणी मग आम्ही टेंडर काढले. टेंडर कॉल केले. विक्रम कुमार साहेब असताना आणि तो ही प्रयोग करुन बघितला. जवळ-जवळ ६० शौचालय ठेकेदारांना दिली पण त्यांची ही तीच परिस्थिती, त्यांचे म्हणणे होते की, आम्हाला लोकांकडून पैसे मिळत नाही. त्यामुळे आम्हाला साफसफाई जमत नाही. दरम्यानच्या काळात आम्ही एम.एम.आर.डी.ए. कडे प्रस्ताव पाठवला की ह्याच्याबाबतीत काय करायचे. एम.एम.आर.डी.ए. ने असे सांगितले की तुम्ही निर्णय घ्यावा. महानगरपालिकेने निर्णय घ्यावा. ह्याच्या बाबतीत ठाणे महानगरपालिकेने एक निर्णय घेतला आहे. त्यांनी अंमलबजावणी करुन प्रायोगिक तत्वावर बघितले. ठाणे महानगरपालिकेने पण अशाप्रकारे त्याच्याकडची शौचालय आहेत. १५० प्रती सीट म्हणजे १० सीटचे शौचालय असेल तर १५००/- रुपये याप्रमाणे त्यांनी सुरु केले आहे. गेल्या दोन तीन महिन्यामध्ये आढावा घेतला तर रिस्पॉन्स चांगला मिळाला आहे. त्यामुळे हा ही एक प्रयत्न करुन बघूया, ठाण्यासारखे आपण करुन बघू या. आपल्याकडे चालतील कमीत कमी पाणी बिल, लाईट बिल ते सी.बी.ओ. ला भरता येईल. दोन गोष्टी तरी आपल्या शौचालय मधून बंद होणार नाहीत असा विचार करुन हा प्रस्ताव महासभेपूढे ठेवला आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

सी.बी.ओ. रद्द करुन कॉन्ट्रॅक्टरला टेंडर कधी देण्यात आले?

**दिपक खांबित :-**

४-५ महिने झाले.

**मदन उदितनारायण सिंह :-**

महासभा आणि स्टॅन्डिंगमध्ये तो विषय का आणला नाही? कॉन्ट्रॅक्टरला तो टेंडर परस्पर देण्यात आला. महासभेत तो विषय आणला गेला नव्हता.

**दिपक खांबित :-**

देखभाल दुरुस्ती सी.बी.ओ. मार्फत की, ठेकेदारामार्फत एवढाच तो विषय होता. त्याच्यामध्ये आपला काहीच खर्च होणार नव्हता.

**मदन उदितनारायण सिंह :-**

पण आता आपला खर्च होणार आहे ना?

**दिपक खांबित :-**

आपला होणार म्हणून स्थायी मार्फत आपल्याकडे विषय घेऊन आलो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आपल्या जेव्हा कॉन्ट्रॅक्टरला ते टेंडर द्यायचे होते. नगरसेवकाना विचारायची काय गरज नव्हती का?

**दिपक खांबित :-**

आर्थिक खर्च होणार त्याच्यामध्ये म्हणून तो प्रयोग त्या वेळेला करुन बघितला. सगळ्याच महानगरपालिकेने केला. एम.एम.आर.डी. च्या गाईडलाईननुसार किंवा त्यांच्या सुचनेनुसार.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आता मुंबई महानगरपालिकेत नगरसेवकाचे मानधन २५.०००/- आहे. आपण द्याल का? सगळ्या महापालिकेने केले म्हणून आपण करायचे का?

**दिपक खांबित :-**

आपण ठाणे महानगरपालिकेचे उदा. घेऊनच हे करतो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

माझे असे मत आहे की, आपण जेव्हा कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक केली. त्याच्या आधी सी.बी.ओ. जेवढी होती. त्यांच्या शौचालयाचे संचालन व्यवस्थित होते. कोणाचीही काही तक्रार नव्हती. माझ्या वॉर्डात दोन शौचालय होती. सगळे व्यवस्थित चालले होते. जेव्हा आपण ह्या कॉन्ट्रॅक्टरला कॉन्ट्रक्ट दिले. त्यांनी काय केले. ह्या कॉन्ट्रॅक्टरनी आजपर्यंत काहीच केले नाही. जो सी.बी.ओ. माणूस चालवत होता त्याच्याकडून वसूली केली. आपण ज्या कॉन्ट्रॅक्टरला दिलेले आहे. तो कॉन्ट्रॅक्टर प्रत्येक सी.बी.ओ. कडून १५०० ते ३००० वसूली करतो. त्याच्यावर आपण ही ५० लाख द्यायचे. मी असे म्हणतो कॉन्ट्रॅक्टरला काही पैसे द्यायची गरज नाही.

कॉन्ट्रॅक्टरला कॉन्ट्रॅक्ट द्यायची गरज नाही. आपल्या शहरात अशा बऱ्याच सी.बी.ओ. आहेत. तुम्ही त्यांना चालवायला द्या ते महापालिकेला पैसे देतील. आपण फक्त कॉन्ट्रॅक्टरला पोसण्याकरता घेतले आहे असे माझे मत आहे.

**दिपक खांबित :-**

ज्या-ज्या सी.बी.ओ. ना आपण ओरीजनल काम दिली आहेत. त्यांना आपण पहिल्यांदा बोलावणार आहोत की, आता आम्ही असा ठराव केलेला आहे. त्याप्रमाणे तुम्हाला मदत करणार आहोत. तर तुम्ही पहिले घ्या जर ते तयार झाले तर त्यांना देऊ या.

**मदन उदितनारायण सिंह :-**

माझी स्वतःची एक सी.बी.ओ. होती. माझी स्वतःची होती म्हणून मी बोलत नाही. प्रत्येक शौचालय स्थानिक सी.बी.ओ. ची होती. त्यांना कसलीही विचारणा करण्यात आली नाही. त्यांना रद्द करुन त्यांच्या डोक्यावर कॉन्ट्रॅक्टर बसवण्यात आला. आणि तो कॉन्ट्रॅक्टर सी.बी.ओ. वाल्याकडून पैसे वसूल करतो. तुम्ही माझ्या वॉर्डात येऊन बघा. जेव्हा सी.बी.ओ. चालवत होते. तेव्हा शौचालयच स्थिती व्यवस्थित होती आणि जेव्हा कॉन्ट्रॅक्टर आला. कॉन्ट्रॅक्टर त्यांच्याकडून १५०० ते ३००० महिन्यांची वसूली करतो. त्यामुळे सी.बी.ओ.ची लोक लक्ष कमी द्यायला लागले. आणि ६० ते ७० रु. कुटुंबामागे वसूल करतात. म्हणजे आपण कॉन्ट्रॅक्टरला पोसतो. पैसे पण देतो आणि लोकांना असुविधा पण होणार आहे. हे तुम्ही चुकीचा पायंडा पाडता.

**दिपक खांबित :-**

अशाप्रकारे काही तक्रारी आल्या नाहीत. ज्या-ज्या स्वच्छता गृहाच्या बाबतीत साफसफाईच्या तक्रारी आल्या तिथेच आपण ठेकेदारांची नेमणूक केली होती.

**मदन उदितनारायण सिंह :-**

माझ्या वॉर्डात कूठलीही तक्रार नव्हती.

**दिपक खांबित :-**

त्या सी.बी.ओ. ला आपण २-३ नोटिस दिल्या. मी तुम्हाला दाखवू शकतो. आपण डायरेक्ट कुठलेही दिलेले नाही. प्रत्येक स्वच्छता गृहाच्या द्या ठिकाणी तक्रारी आलेल्या आहेत. त्याच्यावर देखभाल दुरुस्ती, संचलन व्यवस्थित होत नाही. त्या सी.बी.ओ. २ ते ३ वेळा नोटिस दिल्या. त्यांना बोलवून समजावले तरी त्यांनी कामे केलेली नाही तिकडेच आपण ठेकेदाराला सांगितले की, इकडे तू अमूक अमूक कर.

**मदन उदितनारायण सिंह :-**

हे तुमचे म्हणणे चुकीचे आहे. तुम्ही शौचालय संचालनचे ओपन टेंडर तर सी.बी.ओ. लोक महापालिकेला पैसे देतील. त्यांना पैसे द्यायची गरजच नाही. तुम्ही टेंडर काढा. घेतील लोक. बरेच सी.बी.ओ. आहेत ते महापालिकेला पैसे देतील. इथे आपण त्यांना देत बसतो.

**मा. महापौर :-**

ठीक आहे. मतदन सिंग तुम्ही बसून घ्या. दुसऱ्या सदस्यांना बोलू द्या.

**मदन उदितनारायण सिंह :-**

ह्याच्यावर रुलींग द्या.

**मा. महापौर :-**

तुम्ही बसा. लास्टला रुलिंग देते.

**बर्नड डिमेलो :-**

मा. आयुक्त साहेब, आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या माध्यमातून आपण बरेचसे शौचालय बांधले. नागरिकांना वापरण्यासाठी खुले ठेवले. परंतु त्याची दशा-दुर्दशा काय झाली ते आपणा सर्वांना माहित आहे. आज एम.एम.आर.डी.ए. च्या माध्यमातून त्या योजनेतून आपल्याला महाराष्ट्रामध्ये त्यांनी ती शौचालय बांधलेली आहेत. त्याचा वापर चांगला व्हावा. पे ॲन्ड यूज ह्या पध्दतीने असले तरी मला वाटत नाही. जास्त महागडे आहे. पण त्याच्यात पाण्याचा उपद्रव करतात. लाईट चालू ठेवणे, ह्या नागरिकाकडून होणाऱ्या चुका आहेत. बऱ्याच संस्थांना परवडले नाही बील भरले नाही म्हणून मीटर काढून नेले. पाण्याची पाईपलाईन बंद झाली. पाणी टॅंकरने मागवावे लागले. आणि महाराष्ट्र शासनाने उघड्यावर शौचास बसू नये असा जी.आर. काढलेला आहे. आपल्या महापालिकेने उघड्यावर शौचास बसणाऱ्यास ५०० रु. दंड आकारला पाहिजे. तो न आकारता १५० रु. त्याच्यावर खर्च केले. पर सीट मला वाटत नाही महापालिकेला आणि शहराला मोठे नुकसान होणार आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करत आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर मॅडम, हे जे अनुदान देता ते डायरेक्ट सी.बी.ओ. ना द्या. कॉन्ट्रॅक्टरना द्यायची काय गरज आहे.

**प्रकरण क्र. ५४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्वच्छतागृहाचे संचलन, देखभाल व दुरुस्ती करणाऱ्या वस्ती पातळीवरील संस्था (सीबीओ) व महानगरपालिकेने नियुक्त केलेले ठेकेदार यांना ठराविक रक्कम अदा करणेस मान्यता देणे. (दि. ०७/०३/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले प्रकरण क्र. ४३)

**ठराव क्र. ६३ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जी स्वच्छतागृहे एम.एम.आर.डी.ए च्या निधितून बांधण्यात आलेली आहेत, अशी स्वच्छतागृहाची उर्वरीत कामे व दुरुस्ती कामे संबंधित ठेकेदाराकडून एका महिन्यात पूर्ण करुन घेण्यात यावीत. तद्नंतर त्यांचे देयके प्रदान करण्यात यावीत. जर ठेकेदारांनी एका महिन्याच्या आत स्वखर्चाने स्वच्छता गृहाची दुरुस्ती न केल्यास त्यांच्या रक्कमेतून मनपा मार्फत सदर दुरुस्ती कामे करुन घेण्यात यावीत. दुरुस्ती कामे पूर्ण होईपर्यंत सदर ठेकेदारांना देयक प्रदान करु नये. ज्या झोपडपट्टीत मनपाची स्वतः ची शौचालये आहेत त्याची साफसफाई करणाऱ्या संस्थाना देखिल अनुदान देण्यात यावे. निर्मल अभियान व इतर स्वच्छतागृहाचे देखभाल व दुरुस्ती करीता सदर संस्थानी रु. ३५/- प्रति कुटुंब दर आकारावेत. मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०३/२०१३ ठराव क्र. ३९ नुसार कार्यवाही करण्यास ही सभा अंतिम मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५५, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९(अ) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत सहा प्रभाग समित्या स्थापन करणेबाबत. (भौगोलिक रचनेस मान्यता देणे.)

**गिता जैन :-**

मॅडम तुम्ही आमचे म्हणणे ऐकूनच घेत नाही. आणि म्हणता सर्वानुमते मंजूर करते.

**मा. महापौर :-**

तुम्हाला ठराव करायचा तर ठराव करा. ऐकून काय घेत नाही. म्हणजे काय हे ते बोलतात.

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, त्यांना चर्चा करायची तर करु द्या. त्यांनी पत्र दिले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मॅडम स्टॅन्डिंग में जवाब नहीं मिला। इसलिए यहाँ पूछना पडता है।

**दिपिका अरोरा :-**

मॅडम ह्या विषयावर पत्र दिले आहे. आम्हाला बाजूच कधी मांडू देत नाही.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

५० लाख देने के बाद भी गॅरेन्टी क्या है, की शौचालय साफ रहेंगे।

**मा. महापौर :-**

आपको ठराव करने का है तो ठराव करो।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

शौचालय की सफाई नही हूई तो ५० लाख पानी में जाएंगे। उसके लिए ठेकेदारो से सेक्यूरिटी डिपॉजिट ली जाएगी क्या दंडात्मक प्रावधान है। क्योंकी पहले भी ठेकेदारो को सी.बी.ओ. काम दिए गए थे। तब भी दंडात्मक कारवाई का प्रावधान था। तब भी सफाई नहीं हूई थी।

**शरद पाटील :-**

मॅडम, ह्याच्यातून आमचा अधिकार छीनता.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९(अ) मधील तरतुदीनुसार महापालिकेच्या हद्दीत प्रशासकीय अधिकारांचे विकेंद्रीकरण व्हावे व लोकप्रतिनिधीत्व करणारे पदाधिकारी व नगरसेवक यांच्या लोकाभिमुख ध्येय धोरणानुसार प्रभागांचा विकास व्हावा म्हणून महानगरपालिकेने उपरोक्त कायदेशीर तरतुदीनुसार प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे.

कलम २९(अ) अन्वये प्रभाग समित्याची रचना करणेविषयी असलेल्या तरतुदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेची सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ८.१४ लाख असल्याने महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण सहा प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे. सदर प्रभाग समिती रचना प्रस्तावित करताना प्रामुख्याने भौगोलिक रचना, नैसर्गिक हद्दी, मुख्य रस्ते ह्यांचा विचार करुन करण्यात आल्या आहेत. मिरा भाईंदर शहराचे पश्चिम रेल्वे उपनगरीय सेवेमुळे दोन भागात विभाजन झालेले आहे. भाईंदर (प.) भागात दोन प्रभाग समित्या व भाईंदर (पू.) व मिरारोड भागातील भौगोलिक क्षेत्र व नैसर्गिक हद्द यांचा विचार करुन चार प्रभाग समित्याची रचना प्रस्तावित करण्यात आलेली आहे. निवडणूक प्रभागाची हद्द आणि क्षेत्र संलग्नता विचारात घेऊन खालील प्रमाणे प्रभाग समित्या स्थापन करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | प्रभाग समिती क्रमांक | प्रभाग समिती क्षेत्रात समाविष्ट निवडणूक प्रभाग | एकूण प्रभाग |
|---|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) १ | १, २३, २४, २५, २६, २७, २८ | ७ |
| २ | भाईंदर (प.) २ | २, १८, १९, २०, २१, २२, २९ | ७ |
| ३ | भाईंदर (पू.) ३ | ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १२ | ८ |
| ४ | भाईंदर (पू.) ४ | १०, ११, १३, १४, १५, १६, १७, | ७ |
| ५ | मिरारोड (पू.) ५ | ३०, ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९ | ९ |
| ६ | मिरारोड (पू.) ६ | ३१, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ४७ | ९ |
| **एकूण** | **६** | **४७** | **४७** |

वरील प्रमाणे प्रभाग समित्यांच्या भौगोलिक रचनेस ही मा. महासभा मान्यता देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

चार प्रभागाचे सहा झाले. सचिव साहेब कुठल्या नियमाने केले त्याचा खुलासा करा.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण २९ "अ" मध्ये प्रभाग समित्याचे रचित स्थापना ह्याच्यामध्ये दिलेले आहे. प्रत्येक शहरात पुढील तक्त्यानुसार महापालिका ठरवील तसे लागू नसलेले निवडणूक प्रभागाचा समावेश असलेल्या प्रभाग समित्यांची रचना करण्यात येईल. त्याच्यामध्ये चार्ट दिलेला आहे. त्याच्यात लोकसंख्या आहे साडे चार लाखापेक्षा अधिक १२ लाखापर्यंत प्रभाग समित्यांची किमान संख्या चार आहे. अतिरिक्त लोकसंख्येसाठी असेल तर प्रभाग समिती दीड लाखासाठी एक प्रभाग समिती असे आहे. आणि प्रभाग समित्यांची कमाल संख्या नऊ आहे. ह्यानुसार दिलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, दीड लाखासाठी एक प्रभाग समिती. प्रभाग समिती चार बघीतले तर ३१ नंबर एक वॉर्ड त्याची सेन्सेक्सप्रमाणे माहिती घेतली तर ६० हजार त्याच्यातच आहे. मग हे तुमचे कुठे टॅली आणि बॅलेन्स होते. २००१ मध्ये सेन्सेक्स प्रमाण महानगरपालिकेच्या निवडणूका झाल्या. आता हे सेन्सेक्स मंजूर झाले का?

**प्र. नगरसचिव :-**

२०११ ची टोटल लोकसंख्या आहे ती प्रसिध्द झाली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सेन्सेक्स प्रमाणे आपल्या महानगरपालिकेची काम चालू असतात. आपण ते वर्बली वाटले म्हणून घेतले असे आहे का? त्याचा खुलासा करावा.

**मा. आयुक्त :-**

वर्बली वाटले म्हणून घेतले अशातला भाग नाही. आपल्या महानगरपालिकेची लोकसंख्या २०११ च्या सेन्सेक्सप्रमाणे ८ लाख १४ हजार आहे. आणि २९ "अ" मध्ये जी तरतूद आहे त्याच्यात असे म्हटले आहे की, साडेचार लाख (शहराची लोकसंख्या) लोकसंख्या असेल. साडेचार ते बारा लाख लोकसंख्या असेल तर त्यामध्ये किमान चार आणि साडेचार लाखाच्यावर प्रत्येक दीड लाखाला एक याप्रमाणे प्रभाग रचना असावी. आणि साडेचार लाख ते बारा लाख दरम्यान लोकसंख्या असेल तर जास्तीत जास्त नऊ प्रभाग समित्या आपल्याला नेमता येतील. आपण बसतो ८ लाख १४ हजार आहे म्हणून आपण साडेचार लाखाला साडेचार लाखाच्या वरचे एक याप्रमाणे आपण केले. म्हणजे साडेचार ते सहा लाखाला एक ॲड केले. ६ लाख ते ७.५० लाख एक ॲड केले. आणि पूढचे दीड लाखाची पूर्तता होत नाही म्हणून तो अपूर्णांक होता म्हणून सोडला. त्या अनुषंगाने सहा प्रभाग समित्या येतात. ह्यामध्ये वॉर्ड निहाय लोकसंख्या हा मुद्दा नाही. ह्यामध्ये नैसर्गिक बाऊंड्री आपल्या प्रभागाच्या आहेत. आपण मिरा भाईंदरचा पूर्व भाग आणि पश्चिम भाग अशी रचना केली.

आणि आम्ही जो नकाशा सोबत दिलेला आहे. त्या नकाशाचे अवलोकन केले तर रेल्वे लाईनच्या अलीकडे दोन भाग आणि रेल्वे लाईनच्या पलीकडे चार भाग असे केलेले आहे. ह्यामध्ये नैसर्गिक बाऊन्ड्री ज्या आहेत त्या आहेत तशा राहतील तसा आपण प्रयत्न केलेला आहे. आता आपण लोकसंख्येचा किंवा मतदाराचा विचार केला तर थोडाफार फरक इकडे तिकडे होऊ शकतो.

**नरेंद्र मेहता :-**

मी मतदाराचे बोलत नाही. माझे स्पष्ट आहे. आता लोकसंख्या किती आहे.

**मा. आयुक्त :-**

८ लाख १४ हजार.

**नरेंद्र मेहता :-**

कुठे म्हटले आहे आणि कोणी म्हटले आहे. ८ लाख १४ हजार आहे मला सांगा. कॉपी दाखवा.

**मा. आयुक्त :-**

जनगणना जेव्हा झाली. जनगणनेचा निकाल प्रसिध्द झाले त्यावेळेस जनगणनेने आपल्याला कळवलेले आहे. शासनाला कळवले आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची लोकसंख्या ८ लाख १४ हजार आहे.

**नरेंद्र मेहता :-**

हे इलेक्शनच्या अगोदर कळवले होते केल का आपण ८-१४ प्रमाणे. आपण ते धरले २००१ चे मला अथॉन्टिक कागद दाखवा. ८ लाख १४ हजार आहे मी बोलतो ९.५० लाख आहे. मला अथॉन्टिक दाखवा. तुम्ही बोलले म्हणून ८ लाख १४ हजार का?

**मा. आयुक्त :-**

निश्चितपणे आपल्याला दाखवण्यात येईल.

**नरेंद्र मेहता :-**

दाखवा. सभागृहाचा निर्णय आहे तो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, विषय असा आहे की, लोकसंख्येच्या हिशोबाने मिरा भाईंदर महानगरपालिका ठरवेल अशा लागून असलेल्या निवडणूक प्रभागात समावेश असलेल्या प्रभाग समितीची रचना करण्यात येईल. अस ऑलरेडी २९ "अ" मध्ये आहे. आणि आपण सभागृहाने हा निर्णय घेतलेला आहे. आम्ही हा ठराव पूटअप केलेला आहे. जर तुम्हाला ह्याच्यात काही अडचण असेल सजेशन असेल तर तुम्ही ठराव मांडा.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, इकडे विषय अडचणीचा किंवा ठरावाचा नाही. तुम्ही जे ८ लाख १४ हजार केले. मला काही तरी कागद दाखवा. कोण ठरवले ८.१४. मला ते सेन्सेक्सवाले घरी बोलुन गेले १० लाख २० हजार आहे. तुम्ही मानणार का?

**मा. आयुक्त :-**

८ लाख १४ हजार ऑफिशियली कतमट केलेली फिगर आहे.

**नरेंद्र मेहता :-**

जिथपर्यंत सेन्सेक्स मंजूर होत नाही. तिथपर्यंत मान्य होत नाही. हायकोर्टात देखील वॉर्डरचना बदलावी ८-१४ जे काय असेल त्याप्रमाणे इलेक्शन व्हावे. सेन्सेक्स मंजूर होत नाही तिथपर्यंत इम्प्लीमेंट करता येत नाही. तुम्ही त्यावेळेला उदा. दिली. अनेकदा चर्चा झाली सेन्सेक्स मान्य झाले म्हणून गृहीत धरता येणार नाही. ८-१४ कोणत्या हिशोबाने गृहीत धरले तो पहिला मुद्दा. आता ध्रुवकिशोरजीना १० नं. वॉर्ड तिकडे टाकला. वॉर्ड आता वेगळा झाला. ८-१४ मोजता तुम्ही ९ प्रभाग केले. त्याची लोकसंख्या बघा किती आहे. इट मोर दॅन २.५ लॅक्स.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यात प्रभाग समितीच्या लोकसंख्येचा विचार करण्यात आलेला नाही. कारण आपण पूर्णपणे शहराच्या लोकसंख्येवर आधारित किती प्रभाग समित्या असाव्या आणि त्याचा भौगोलिक आणि नैसर्गिक रचना विचारात घेऊन ह्या प्रभाग समित्या केल्या आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

८-१४ होऊ शकत नाही. तुम्ही ज्यावेळेला ८-१४ करता म्हणजे नविन सेन्सेक्स गृहित धरल तर तुम्हाला प्रस्तावित करताना दीड-दीड लाखाच्या हिशोबानी करायला पाहिजे. ते ही केले नाही. आणि आज अथॉन्टिक फिगर होत नाही तिथपर्यंत करता येत नाही. सचिवांनी सांगावे करता येईल.

**मा. आयुक्त :-**

नियमाप्रमाणे जी कारवाई करण्यात आलेली आहे ती नियमाप्रमाणे करण्यात आलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब दरवेळेला असे बोलून सुटू शकत नाही. मला कागद दाखवायला प्रॉब्लेम काय आहे.

**मा. आयुक्त :-**

दाखवतो ना. सभागृहात लोकसंख्या मी सांगितली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही सांगून तसे नाही. यू आर नॉट द सेन्सेस ऑफिसर.

**बर्नड डिमेलो :-**

मा. महापौर मॅडम ठरावाला विरोध असेल तर ठराव करा.

**मा. महापौर :-**

तुम्हाला त्या विषयावर प्रॉब्लेम आहे तर ठराव करा.

**नरेंद्र मेहता :-**

कागद दाखवा.

**डॉ. आसिफ शेख :-**

ह्या ठिकाणी सन्मा. आयुक्तांनी, सन्मा. महापौरानी खुलासा केलेला आहे. सभागृह नेत्यांनी ठराव मांडलेला आहे. आपण जे निवडून आलो ते २०११ च्या सेन्सेक्सप्रमाणे निवडून आलो. प्रभागाची रचना जी झालेली आहे ती ८ लाख १४ हजार ६९५ प्रमाणे झालेली आहे. निवडूनच त्या हिशोबाने आलो तर प्रभाग रचनेला तुम्ही विरोध का करता. निवडणूकीच्या पूर्वी जर विरोध केला असता तर चांगले झाले असते. आता निवडून आले. आपल्याला सत्तेचे विकेंद्रीकरण करायचे आहे. ७४ घटना दुरुस्तीनुसार प्रभाग समितीवर सर्वांना अधिकार मिळाले पाहिजेत. त्यानुसार चांगला विषय सभागृहात आला. आणि आपण त्याला विरोध करता. तुम्हाला सत्तेचे विकेंद्रीकरण करायचे नाही का?

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, हा आमचा अधिकार आहे. आपल्याला सेन्सेक्सची कॉपी द्यायला लागेल. सभागृहाचा विषय आहे असे बोलुन चालणार नाही नंतर घ्या. मला द्या ना ऑथन्टिक उत्तर. तुम्हाला उत्तर द्यायला काय प्रॉब्लेम आहे.

**मा. महापौर :-**

साहेबांनी सांगितले ना जे कायद्यात बसते तेच केले.

**नरेंद्र मेहता :-**

नियम कुठे आहे. बोलुन चालणार का ऑफिसमध्ये पडला आहे नियम. मा. आयुक्त महोदय कामकाज चालले आहे ते चुकीचे आहे.

**मा.आयुक्तः-**

नियमाप्रमाणे कामकाज चालू आहे.

**मा.. महापौर :-**

तुम्ही हर विषयावर सांगता हे बेकायदेशीर चालले आहे. मग आम्ही काय असेच बसले आहेत का? (सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

प्रत्येक वेळेला आपण काय विषय परत घ्या त्याचे काय स्पष्टीकरणच देत नसाल तस कसे होईल मग महासभेत आम्हाला बोलवता कशाला.

**मा. महापौर :-**

तुमचा हर विषय बेकायदेशीर.

**शरद पाटील :-**

आम्ही मागतो त्याचे उत्तर द्यावे त्यांनी लेखी उत्तर द्यावे.

**डॉ. आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, त्यांना वाटत असेल आपण बेकायदेशीर करतो. तर त्यांनी शासनाकडे दाद मागावी.

(सभागृहात गोंधळ)

**प्रभात पाटील :-**

सचिव साहेब,फक्त एका प्रश्नाचे उत्तर द्या.

**मा महापौर :-**

प्रभात मॅडम त्यांनी त्यादिवशी काय सांगितले मा. कमिशनरचा अधिकार आहे. कमिशनर साहेबांनी सांगितले नियमात बसले ते आम्ही घेतलेले आहे. अजून त्यांना ते बेकायदेशीर वाटते.

**प्र. नगरसचिव :-**

२०१२ च्या ज्या सार्वत्रिक निवडणूका झाल्या त्या पूर्वीची प्रभाग संख्या ७९ होती ती ५लाख २० हजार नूसार होती. आणि राज्य निवडणूक आयोगानी आपल्याला पत्रानी कळवले आहे की, मिरा भाईदर *महानगरपालिकेची लोकसंख्या ८लाख १४ हजार आहे.*

**प्रभात पाटील :-**

आयोगाचे पत्र आहे.

**प्र. नगरसचिव :-**

त्या लोकसंख्येनूसार ९४ लोकांना दिले.

**नरेंद्र मेहता :-**

पत्राची कॉपी द्या. आमचे समाधान झाले ना.

**प्र. नगरसचिव :-**

कॉपी मी देतो..

**प्रकरण क्र. ५५ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९(अ) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत सहा प्रभाग समित्या स्थापन करणेबाबत. (भौगोलिक रचनेस मान्यता देणे.)

**ठराव क्र. ६४ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९(अ) मधील तरतुदीनुसार महापालिकेच्या हद्दीत प्रशासकीय अधिकारांचे विकेंद्रीकरण व्हावे व लोकप्रतिनिधीत्व करणारे पदाधिकारी व नगरसेवक यांच्या लोकाभिमुख ध्येय धोरणानुसार प्रभागांचा विकास व्हावा म्हणून महानगरपालिकेने उपरोक्त कायदेशीर तरतुदीनुसार प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे.

कलम २९(अ) अन्वये प्रभाग समित्याची रचना करणेविषयी असलेल्या तरतुदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेची सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ८.१४ लाख असल्याने महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण सहा प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे. सदर प्रभाग समिती रचना प्रस्तावित करताना प्रामुख्याने भौगोलिक रचना, नैसर्गिक हद्दी, मुख्य रस्ते ह्यांचा विचार करुन करण्यात आल्या आहेत. मिरा भाईंदर शहराचे पश्चिम रेल्वे उपनगरीय सेवेमुळे दोन भागात विभाजन झालेले आहे. भाईंदर (प.) भागात दोन प्रभाग समित्या व भाईंदर (पू.) व मिरारोड भागातील भौगोलिक क्षेत्र व नैसर्गिक हद्द यांचा विचार करुन चार प्रभाग समित्याची रचना प्रस्तावित करण्यात आलेली आहे. निवडणूक प्रभागाची हद्द आणि क्षेत्र संलग्नता विचारात घेऊन खालील प्रमाणे प्रभाग समित्या स्थापन करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | प्रभाग समिती क्रमांक | प्रभाग समिती क्षेत्रात समाविष्ट निवडणूक प्रभाग | एकूण प्रभाग |
|---|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) १ | १, २३, २४, २५, २६, २७, २८ | ७ |
| २ | भाईंदर (प.) २ | २, १८, १९, २०, २१, २२, २९ | ७ |
| ३ | भाईंदर (पू.) ३ | ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १२ | ८ |
| ४ | भाईंदर (पू.) ४ | १०, ११, १३, १४, १५, १६, १७, | ७ |
| ५ | मिरारोड (पू.) ५ | ३०, ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९ | ९ |
| ६ | मिरारोड (पू.) ६ | ३१, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ४७ | ९ |
| **एकूण** | **६** | **४७** | **४७** |

वरील प्रमाणे प्रभाग समित्यांच्या भौगोलिक रचनेस ही मा. महासभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५६, भाईंदर (पश्चिम) नेहरु नगर, शास्त्रीनगर, गणेशदेवल नगर, क्रांतीनगर भागात जाण्यासाठी १८.०० मीटर रुंदीचा रस्ता विकास आराखड्यात दर्शविण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करण्यास मान्यता देणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पश्चिम) येथे प्रभाग समिती क्र. १ कार्यालयामागे "शास्त्रीनगर" व "नेहरूनगर", "गणेशदेवल नगर" व "क्रांतीनगर" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वस्ता आहेत. सदर वस्त्याकडे जाण्यासाठी कॉक्रीटच्या ३.०० मीटर रूंदीपर्यंतच्या पायवाटा आहे. सदर पायवाट अरुंद असल्याने तेथे तिन चाकी व चार चाकी वाहने जाऊ शकत नाही. त्यामुळे आजारी, वृध्द इत्यादी व्यक्तिंना तसेच स्थानिकांना लागणाऱ्या दैनंदिन वापराच्या साहित्यासह १ ते १.५० कि. मीटर पर्यंत चालत जावे लागते, त्यामुळे त्यांची गैरसोय होते.

सबब, भाईंदर (प.) मोतीनगर येथे चर्च मागून १८.०० मीटर रुंदीचा रस्ता प्रस्तावित करण्यात येत आहे. सर्व्हे क्र. ३४२ (जुना सर्व्हे क्र. ७२२), सर्व्हे क्रमांक ३२८ (जुना सर्व्हे क्र. ७२३) सर्व्हे क्रमांक ३७८ (जुना

सर्व्हे क्र. ७६४) या जागेतुन जाणारा सदर प्रस्तावित रस्ता विकास आराखड्यात दर्शविल्यास व आवश्यक प्रक्रिया पुर्ण करुन तयार केल्यास त्याभागातील रहिवाशांची गैरसोय दूर होणार आहे.

सबब सदर १८.०० मीटर रूंदीचा विकास रस्ता विकास आराखड्यात दर्शविण्यासाठी व मंजूर विकास योजनेची अंमलबजावणी सहजपणे व कालमर्यादेत होण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये आवश्यक असलेली सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून अंतिम प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी सादर करण्याचे अधिकार मा. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना देण्यास ही महासभा मंजूरी देत आहे.

**अशोक तिवारी :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, हा विषय जो आपण सादर केलेला आहे. त्यामध्ये कुठून कुठे रस्ता दाखवला आहे ते काहीही कुठे ह्याच्यात दिसत नाही. म्हणजे नक्की नेमक कुठून कुठे करणार आहेत. ही जागा माझ्या माहितीप्रमाणे सी.आर.झेड ने बाधीत होते. माझ्या माहितीप्रमाणे हा विषय ज्यांना द्यायचा आहे त्यांनी न देऊन बांधकाम विभागाने दिलेला आहे. हा नगररचनेचा विषय आहे. मी ज्यावेळेला त्याच्याकडून माहिती मागितली तेव्हा त्याच्याकडे माहिती नव्हती. कारण हा विषय त्याच्याकडून आलेला नाही. बांधकामाने ३७ चे विषय करायचे का? संपूर्ण १०० टक्के जागा सी.आर.झेड मध्ये आहे. सी.आर. झेड मध्ये अनेक रस्त्याची निविदा काढली अजून गव्हरमेन्टने आपल्याला मान्यता दिलेली नाही. ह्याला लागून डी.पी.रोड जो आहे तो साधारण ३० ते ६० मीटरचा तो रोड आहे. भाईंदर स्टेशन पासून सुभाषचंद्र मैदान पर्यंत. सी.आर.झेड मध्ये रस्ता होणार आहे का? नगररचनाने कुठल्याही प्रकारचे प्लान दिलेला नाही की ह्या ठिकाणी ह्या पासून आम्ही तो रस्ता तयार करणार आहोत. हा बांधकाम विभागाचा विषय आहे की नगररचनेचा विषय आहे. त्याचा खुलासा करावा.

**मा. आयुक्त :-**

ह्यामध्ये सी.आर.झेड मध्ये आहे ही वस्तूस्थिती आहे. परंतु त्या भागामध्ये फक्त तीन मीटरचा रस्ता अस्तित्वात आहे. त्या रस्त्यावरून कुठलेही वाहन किंवा तीन चाकी, चार चाकी जाऊ शकत नाही. म्हणून हा जो रस्ता अस्तित्वात आहे. त्या रस्त्याच्या रुंदीकरणाचा प्रस्ताव आहे. त्या रस्त्याच्या रुंदीकरणासाठी जेव्हा आपण आपले नकाशे तपासले त्यावेळेचा अस्त्विात असलेले रस्ते सुध्दा नकाशात नव्हता. म्हणून तो रस्ता पूर्णपणे आपल्याला करायचा असेल. सी.आर.झेडमध्ये असेल तर पहिली अट आहे. त्याची की आपल्या डेव्हलपमेन्ट प्लानमध्ये असले पाहिजे हा एक भाग. दुसरे ह्यामध्ये रस्त्याखाली जी नविन आहे. ती सर्व सॉल्ट प्लान्टची जमीन आहे. थोडी फार जमीन खाजगी मालकीची आहे. तर सॉल्ट प्लॅन्टच्या जमिनीसाठी आपण जमिन मागायला जातो त्यावेळेस डेव्हलपमेंट प्लानमध्ये रस्त्यासाठी आरक्षित असेल तर ती जमिन मिळण्यासाठी आपल्याला जास्तीत जास्त परिश्रम करायला लागत नाही, ती जमिन विनासायास मिळते. त्यामध्ये जे दर आकारले जातात ते देखील कमी आहेत. तिसरा सी.आर.झेडमध्ये असल्यामुळे आपण एम.सी.झेड. एम.ए. ची परवानगी घेऊन हे काम करणार आहोत. एम.सी.झेड.एम.ए. परवानगी घेतल्याशिवाय आपण काय करणार नाहीत. ह्याच्या पूर्वी जे आपले सी.आर.झेड मध्ये रस्ते होते त्या रस्त्यांना एम.सी.झेड.एम.ए. ने काही अटीशर्ती लावून आपल्याला परवानगी दिलेली आहे. आणि त्या पध्दतीची कारवाई सुरु आहे. काही ठिकाणी असे म्हटले आहे की मी जे प्रोसिडींग पाहिले एम.सी.झेड.एम.ए. ची आपल्या मिरा भाईंदरच्या प्रस्तावासाठी त्यामध्ये काही ठिकाणी असे म्हटलेले आहे की, काही ठिकाणी हायकोर्टाची परवानगी घ्यायला लागेल. ती प्रक्रिया चालू आहे. काही ठिकाणी मॅंग्रोज जर बाधीत होत असतील तर पर्यायी मॅंग्रोज आपल्याला करता येतील का? त्यासाठी सुध्दा ह्या बजेटमध्ये आपण तरतूद केलेली आहे की पर्यायी ठिकाणी मॅंग्रोज करुन त्या प्लान्टेशन केले तर तो फायदा होऊ शकेल. ही परवानगी घेतल्यानंतरच आपल्याला हे बांधकाम करावे लागणार आहे. कारण दिज इज द फस्ट स्टेज टू स्टार्ट द प्रोसिजर. म्हणून आपण प्रोसिजर स्टार्ट करण्यासाठी हे केलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सी.आर.झेडमध्ये कुठल्या रस्त्याची आपल्याला परवानगी मिळाली आहे.

**मा. आयुक्त :-**

सी.आर.झेड. मध्ये तीन रस्ते जे होते.

**नरेंद्र मेहता :-**

कुठले कुठले.

**दिपक खांबित :-**

दहिसर लिंक रस्ता जो रस्ता, ३० मीटरचा डी.पी. रोड आहे. दुसरा स्टेडियमपासून रेल्वे स्टेशनपर्यंत जातो तो रस्ता आणि तीसरा उत्तनचा रस्ता जो ३० मीटरचा आहे. मोरव्यापासून पूर्ण सी.आर.झेड मध्ये आहे.

तीन रस्त्यांना एम.सी.झेड.एम.ए. ने परवानगी दिलेली आहे. फक्त हायकोर्टामध्ये आपल्याला ॲप्लीकेशन करायचे आहे. परवानगी घ्यायची आहे आणि जिथे मॅग्रोज आहेत तिथे आपल्याला स्टिल्ट करायचे आहे. म्हणजे ते मॅग्रोज न तोडता स्टिल्टचे प्रकरण करुन सेन्ट्रल गव्हरमेन्टला सादर करुन परमिशन घेऊन करायचे आहे. महाराष्ट्र गव्हरमेन्टने सगळे क्लिअर केलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

नवघरपासून हायवेपर्यंत.

**दिपक खांबित :-**

तो सुध्दा आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तो झाला मंजूर.

**दिपक खांबित :-**

हो. जेसल पार्कपासून ३० मीटरचा तोही मंजूर झाला. त्याला हीच कंन्डीशन ठेवली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आपल्याला हायकोर्टामध्ये अपील करायचे आहे.

**दिपक खांबित :-**

अपिल नाही ॲप्लीकेशन करुन परवानगी घ्यावी लागते.

**प्रकरण क्र. ५६ :-**

भाईंदर (पश्चिम) नेहरु नगर, शास्त्रीनगर, गणेशदेवल नगर, क्रांतीनगर भागात जाण्यासाठी १८.०० मीटर रुंदीचा रस्ता विकास आराखड्यात दर्शविण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करण्यास मान्यता देणे.

**ठराव क्र. ६५ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पश्चिम) येथे प्रभाग समिती क्र. १ कार्यालयामागे "शास्त्रीनगर" व "नेहरूनगर", "गणेशदेवल नगर" व "क्रांतीनगर" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वस्ता आहेत. सदर वस्त्याकडे जाण्यासाठी कॉंक्रीटच्या ३.०० मीटर रूंदीपर्यंतच्या पायवाटा आहे. सदर पायवाट अरुंद असल्याने तेथे तिन चाकी व चार चाकी वाहने जाऊ शकत नाही. त्यामुळे आजारी, वृध्द इत्यादी व्यक्तिंना तसेच स्थानिकांना लागणाऱ्या दैनंदिन वापराच्या साहित्यासह १ ते १.५० कि. मीटर पर्यंत चालत जावे लागते, त्यामुळे त्यांची गैरसोय होते.

सबब, भाईंदर (प.) मोतीनगर येथे चर्च मागून १८.०० मीटर रुंदीचा रस्ता प्रस्तावित करण्यात येत आहे. सर्व्हे क्र. ३४२ (जुना सर्व्हे क्र. ७२२), सर्व्हे क्रमांक ३२८ (जुना सर्व्हे क्र. ७२३) सर्व्हे क्रमांक ३७८ (जुना सर्व्हे क्र. ७६४) या जागेतुन जाणारा सदर प्रस्तावित रस्ता विकास आराखड्यात दर्शविल्यास व आवश्यक प्रक्रिया पुर्ण करुन तयार केल्यास त्याभागातील रहिवाशांची गैरसोय दूर होणार आहे.

सबब सदर १८.०० मीटर रुंदीचा विकास रस्ता विकास आराखड्यात दर्शविण्यासाठी व मंजूर विकास योजनेची अंमलबजावणी सहजपणे व कालमर्यादेत होण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये आवश्यक असलेली सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून अंतिम प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी सादर करण्याचे अधिकार मा. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना देण्यास ही महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. अशोक तिवारी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५७, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर रस्त्यालगत वापरात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मिरा भाईंदर शहरासाठी मंजूर विकास योजनेतील मौजे घोडबंदर, स.क्र. १८७/१,२पै.,८पै.,९, १९३/४१,४५पै. ही जागा नाविकास विभाग, (डोंगराळ भाग) ने सामाविष्ट असून ६०.०० मी. रुंद राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ने भागशः बाधीत होत आहे. प्राप्त सि.आर.झेड. नकाशानुसार प्रस्तावित जागा सि.आर.झेड. ने बाधीत होत नाही.

मिरा भाईंदर शहरासाठी मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत नाविकास क्षेत्रात वाणिज्य वापर व आय.टी. पार्क वापरासाठी तरतूद नाही. सदर जागेमध्ये वाणिज्य वापर / आय.टी. पार्कच्या बांधकामासाठी वाढीव चटईक्षेत्रासह परवानगी मिळणेबाबत मे. रचना डिझाईन कन्सलटंट यांचेमार्फत दि.१६/०१/२००८ अन्वये प्रस्ताव सादर केलेला होता. तथापि, मिरा भाईंदर शहरासाठी मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत वाणिज्य वापर व आय.टी. पार्क वापर वाढीव चटईक्षेत्रासह अनुज्ञेय नसल्याने सदरचा प्रस्ताव मा. शासनाची मान्यता / मार्गदर्शन मिळणेसाठी पत्र क्र. मनपा/नर/४४०१/२००७-०८, दि.२७/०२/२००८ अन्वये सादर केलेला होता. तथापि, मा. शासनाने सदरचा प्रस्ताव पत्र क्र. टिपीएस-१२०८/४६९/प्र.क्र.३/०९/नवि-१२, दि.३०/०१/२००९ अन्वये मंजूर विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे अर्जदारांची विनंती मान्य करता येणार नाही. मात्र परिसरातील विकास क्षमतेनुसार महानगरपालिकेस विभाग बदलाबाबत कार्यवाही केल्यास निर्णय घेता येईल, असे कळविलेले आहे.

**प्रस्तावित जागेचे ७/१२ उताऱ्यानुसार खालील प्रमाणे क्षेत्र आहे.**

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक | ७/१२ धारक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| १ | १८७/१ | मे. थायो फार्मा व कमलाबाई कैलास दाधिया | ५१०.०० |
| २ | १९३/४५ | मे. थायो फार्मा व कमलाबाई कैलास दाधिया | १५२.०० |
| ३ | १९३/४१ | मे. थायो फार्मा व कमलाबाई कैलास दाधिया | ११११६.०० |
| ४ | १८७/२अ | जॉन बावनीस कैसर नरीस | ३८०.०० |
| ५ | १८७/२ब | थायो फार्मा चे भागीदार | ६८०.०० |
| ६ | १८७/८अे | थायो फार्मा चे भागीदार | ५७०.०० |
| ७ | १८७/९अ | थायो फार्मा चे भागीदार | ३९०.०० |
| ८ | १९३/४५क | नॅशनल हायवे | ३००.०० |
| ९ | १८७/८ब | नॅशनल हायवे | ५४०.०० |

वरील प्रमाणे ४६३८ चौ. साठी जागा प्रस्तावित केलेली असून त्यापैकी ८४०.०० चौ. मी. जागा ७/१२ उता-यावर **"नॅशनल हायवे"** नोंद आहे. उर्वरित ३७९८.०० चौ.मी. खाजगी मालकीची आहे.

मे. थायो फार्मा, मुंबई यांनी दि.१०/०३/२०११ अन्वयेच्या पत्रान्वये मा. शासनाच्या निर्देशानुसार सदर जागेबाबत महानगरपालिकेने पुढील कार्यवाही करण्याची विनंती केलेली आहे. तद्अनुषंगाने सदरच्या विषयास मा. महासभेने प्रकरण क्र. २७, ठराव क्र. २८, दि.३०/०५/२०११ (दि.०३/०९/२०१२) अन्वये मंजूरी दिलेली आहे.

तद्अनुषंगाने प्रस्तावित फेरबदलाबाबत हरकती वजा सूचना मागविणेकरिता अधिसूचना दैनिक लोकसत्ता (मराठी) व दैनिक फ्रि प्रेस जरर्नल (इंग्रजी) या वृत्तपत्रात दि.१२/०९/२०१२ रोजी प्रसिध्द करणेत आली असून मा. राजपत्रात गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर ११-१७, २०१२ याप्रमाणे प्रसिध्द करणेत आलेली आहे. प्रसिध्द अधिसूचनेच्या अनुषंगाने महानगरपालिकेस कोणतेही हरकत वजा सूचना प्राप्त झालेली नाही.

दि.३०/०५/२०११, ठराव क्र. २८, प्रकरण क्र. २७ नुसार वरीलप्रमाणेच्या फेरबदलाबाबत मा. महासभेने मंजूरी दिलेली आहे. सुचना हरकती निरंक आहेत. त्यामुळे प्रस्तावित फेरबदल प्रस्तावास ही महासभा अंतिम मंजूरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ५७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर रस्त्यालगत वापरात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करणेबाबत.

**ठराव क्र. ६६ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मिरा भाईंदर शहरासाठी मंजूर विकास योजनेतील मौजे घोडबंदर, स.क्र. १८७/१,२पै.,८पै.,९, १९३/४१,४५पै. ही जागा नाविकास विभाग, (डोंगराळ भाग) ने सामाविष्ट असून ६०.०० मी. रुंद राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ने भागशः बाधीत होत आहे. प्राप्त सि.आर.झेड. नकाशानुसार प्रस्तावित जागा सि.आर.झेड. ने बाधीत होत नाही.

मिरा भाईंदर शहरासाठी मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत नाविकास क्षेत्रात वाणिज्य वापर व आय.टी. पार्क वापरासाठी तरतूद नाही. सदर जागेमध्ये वाणिज्य वापर / आय.टी. पार्कच्या बांधकामासाठी वाढीव चटईक्षेत्रासह परवानगी मिळणेबाबत मे. रचना डिझाईन कन्सलटंट यांचेमार्फत दि.१६/०१/२००८ अन्वये प्रस्ताव सादर केलेला होता. तथापि, मिरा भाईंदर शहरासाठी मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत वाणिज्य वापर व आय.टी. पार्क वापर वाढीव चटईक्षेत्रासह अनुज्ञेय नसल्याने सदरचा प्रस्ताव मा. शासनाची मान्यता / मार्गदर्शन मिळणेसाठी पत्र क्र. मनपा/नर/४४०१/२००७-०८, दि.२७/०२/२००८ अन्वये सादर केलेला होता. तथापि, मा. शासनाने सदरचा प्रस्ताव पत्र क्र. टिपीएस-१२०८/४६९/प्र.क्र.३/०९/नवि-१२, दि.३०/०१/२००९ अन्वये मंजूर विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे अर्जदारांची विनंती मान्य करता येणार नाही. मात्र परिसरातील विकास क्षमतेनुसार महानगरपालिकेस विभाग बदलाबाबत कार्यवाही केल्यास निर्णय घेता येईल, असे कळविलेले आहे.

**प्रस्तावित जागेचे ७/१२ उताऱ्यानुसार खालील प्रमाणे क्षेत्र आहे.**

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक | ७/१२ धारक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| १ | १८७/१ | मे. थायो फार्मा व कमलाबाई कैलास दाधिया | ५१०.०० |
| २ | १९३/४५ | मे. थायो फार्मा व कमलाबाई कैलास दाधिया | १५२.०० |
| ३ | १९३/४१ | मे. थायो फार्मा व कमलाबाई कैलास दाधिया | १११६.०० |
| ४ | १८७/२अ | जॉन बावनीस कैसर नरीस | ३८०.०० |
| ५ | १८७/२ब | थायो फार्मा चे भागीदार | ६८०.०० |
| ६ | १८७/८अे | थायो फार्मा चे भागीदार | ५७०.०० |
| ७ | १८७/९अ | थायो फार्मा चे भागीदार | ३९०.०० |
| ८ | १९३/४५क | नॅशनल हायवे | ३००.०० |
| ९ | १८७/८ब | नॅशनल हायवे | ५४०.०० |

वरील प्रमाणे ४६३८ चौ. साठी जागा प्रस्तावित केलेली असून त्यापैकी ८४०.०० चौ. मी. जागा ७/१२ उता-यावर **"नॅशनल हायवे"** नोंद आहे. उर्वरित ३७९८.०० चौ.मी. खाजगी मालकीची आहे.

मे. थायो फार्मा, मुंबई यांनी दि.१०/०३/२०११ अन्वयेच्या पत्रान्वये मा. शासनाच्या निर्देशानुसार सदर जागेबाबत महानगरपालिकेने पुढील कार्यवाही करण्याची विनंती केलेली आहे. तद्अनुषंगाने सदरच्या विषयास मा. महासभेने प्रकरण क्र. २७, ठराव क्र. २८, दि.३०/०५/२०११ (दि.०३/०९/२०१२) अन्वये मंजूरी दिलेली आहे.

तद्अनुषंगाने प्रस्तावित फेरबदलाबाबत हरकती वजा सूचना मागविणेकरिता अधिसूचना दैनिक लोकसत्ता (मराठी) व दैनिक फ्रि प्रेस जरर्नल (इंग्रजी) या वृत्तपत्रात दि.१२/०९/२०१२ रोजी प्रसिध्द करणेत आली असून मा. राजपत्रात गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर ११-१७, २०१२ याप्रमाणे प्रसिध्द करणेत आलेली आहे. प्रसिध्द अधिसूचनेच्या अनुषंगाने महानगरपालिकेस कोणतेही हरकत वजा सूचना प्राप्त झालेली नाही.

दि.३०/०५/२०११, ठराव क्र. २८, प्रकरण क्र. २७ नुसार वरीलप्रमाणेच्या फेरबदलाबाबत मा. महासभेने मंजूरी दिलेली आहे. सुचना हरकती निरंक आहेत. त्यामुळे प्रस्तावित फेरबदल प्रस्तावास ही महासभा अंतिम मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५८, मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत "जेष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र " या संबंधी धोरण निश्चित करणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ठराव गोषवाऱ्यानुसार बैठे खेळ आहेत. त्याच्यात कॅरम ॲड करावे. म्हणजे बुध्दीबळासोबत कॅरमपण द्यावा. तसेच त्यांचा प्रवेश निःशुल्क असेल. ह्या संस्थेला कोणतीही प्रवेश फी घेता येणार नाही असा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**निलम ढवण :-**

एक सुचना आहे. ह्या विरंगुळा केंद्रात सुनियोजित आणि अजून काही त्याच्यासाठी सोयी सुविधा करण्यासाठी आपण खासदार आणि आमदारांच्या निधीतून त्यांचा निधी वापरला त्यासाठी आपण परवानगी आपण द्यावी अशी मी सुचना करत आहे.

**मा. महापौर :-**

तुमची सुचना घेत आहे. ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ५८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत "जेष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र " या संबंधी धोरण निश्चित करणे.

**ठराव क्र. ६७ :-**

**१) विरंगुळा केंद्र :-**

विरंगुळा केंद्र म्हणजे मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वास्तव्यास असणाऱ्या व ६० वर्षावरील वयोगटातील नागरीकांना विरंगुळा मिळावा व त्यातून त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य विषयक हित जपले जावे यासाठी व दिवसाच्या ठराविक कालावधीसाठी वापरात आणण्यासाठी महानगरपालिका किंवा स्वयंसेवी संस्थाच्या सहकार्याने निर्माण करण्यात आलेले वा येणारे केंद्र.

**२) विरंगुळा केंद्राचे बांधकाम :-**

अ) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतूदीनुसार विशेषतः "बगीचा" किंवा "करमणूकीची मैदाने" (आर.जी) यासाठी आरक्षित असलेल्या व महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या जागेवर एकूण भूखंड क्षेत्राच्या तुलनेत १०% पेक्षा अधिक असणार नाही तथापी किमान ५०० चौ.फुट बांधकाम उपलब्ध होऊ शकेल अशा ठिकाणी विरंगुळा केंद्राचे बांधकाम करता येईल.

ब) सर्वसाधारणपणे दोन विरंगुळा केंद्रात किमान २ किमी अंतर असावे.

**३) विरंगुळा केंद्रात उपलब्ध करण्यात येणाऱ्या सोयी :-**

अ) विरंगुळा केंद्रामध्ये खालील गोष्टी उपलब्ध करुन देण्यात येतील.

| | |
|---|---|
| बैठे खेळ | : बुध्दिबळ -०२, कॅरम |
| मनोरंजनाकरीता | : दुरदर्शन संच -०१, वृत्तपत्रे -०३, |
| साहित्य | : कपाट (मोठे) -०१, सेमी एक्झिक्युटीव्ह खुर्ची -०१, टेबल -०१, प्लास्टीक खुर्ची -५०, |
| वैद्यकिय साहित्य | : वजन मोजणी यंत्र -०१, वाफ घेण्याचे इलेक्ट्रीक भांडे (Steamer) -०१, शेकण्याची इलेक्ट्रीक बॅग -०१ इ. साहित्य. |

ब) उद्यानातील पाणी व विद्युत जोडणीमधून विरंगुळा केंद्राकरीता पाणी जोडणी व विद्युत जोडणी देता येईल.

क) सदर विरंगुळा केंद्र सुरु ठेवण्याची वेळ सकाळी ७.०० ते १०.०० व संध्याकाळी ५.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत असेल. अपवादात्मक परिस्थितीत वेळेत फेरबदल करण्याचा अधिकार संबंधित संस्थेस राहील.

**४) विरंगुळा केंद्रे व्यवस्थापनासाठी वितरीत करण्याची कार्यपध्दती :-**

अ) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (क) व (इ) मधील तरतूदीनुसार महानगरपालिकेने विकसित केलेली विरंगुळा केंद्रे नोदणीकृत ज्येष्ठ नागरिकांच्या स्थानिक संस्थाना जास्तीत जास्त तीन वर्षाच्या कालावधीकरीता देता येतील.

ब) सदर विरंगुळा केंद्रे व्यवस्थापनासाठी देताना, विरंगुळा क्षेत्राच्या ५०० मीटर परीघात वास्त्यव्यास असणा-या जेष्ठ नागरीकांच्या नोंदणीकृत संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

क) सदरची कार्यवाही महानगरपालिकेच्या धोरणानुसार अर्ज मागवून करण्यात येईल.

ड) सदर विरंगुळा केंद्र वितरीत करण्याबाबत आयुक्तांचा अधिकार अंतिम असेल.

**५) विरंगुळा केंद्रांच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक अटी व शर्ती :-**

सदर विरंगुळा केंद्र व्यवस्थापनासाठी खालील प्रमाणे अटीशर्ती प्रस्तावित करण्यात येत असून त्याबाबत संबंधित संस्थाना रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देणे आवश्यक असेल.

१) विरंगुळा केंद्राचा व्यवस्थापन कालावधी, सदर केंद्र वितरीत केल्याच्या दिनांकापासून तीन वर्ष असेल.

२) विरंगुळा केंद्र व्यवस्थापन करणाऱ्या संस्थेस सदर केंद्र इतर व्यक्ति/ संस्था/ आस्थापना इत्यांदीना हस्तांतरीत करता येणार नाही.
३) विरंगुळा केंद्र हे केवळ ज्येष्ठ नागरीकांना विरंगुळा मिळावा व त्यातून त्यांचे सामाजिक सांस्कृतिक, आरोग्य विषयक इत्यादी हित साधले जातील यासाठीच वापरणे अपेक्षित आहे. याव्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी त्याचा वापर करावयाचा झाल्यास त्याबाबत आयुक्त यांची लेखी पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.
४) सदर विरंगुळा केंद्रात परिसरातील ज्येष्ठ नागरिकांना, कोणताही भेदभाव न करता प्राथम्याने प्रवेश असेल व सदर प्रवेश निशुल्क असेल.
५) विरंगुळा केंद्र इमारतीच्या संरचनेत (Structure) महानगरपालिकेच्या पुर्वपरवानगी शिवाय कोणताही बदल करता येणार नाही, जर संरचनेत काही बदल करण्यात आल्यास सदर विरंगुळा केंद्राचा व्यवस्थापन करारपत्र रद्द करून ते महानगरपालिका ताब्यात घेईल व इमारतीचे/केंद्राचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई संबंधीत व्यवस्थापन संस्थेकडून करुन घेण्यात येईल.
६) विरंगुळा केंद्राची देखभाल,देखरेख व संरक्षण खर्च व्यवस्थापन संस्थेने करणे आवश्यक असेल.
७) मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे विरंगुळा केंद्रात पुरविण्यात आलेले साहित्य व फर्निचर यांची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी व्यवस्थापन संस्थेची राहील.
८) व्यवस्थापक संस्थेला टिव्हिचे केबल कनेक्शन व त्याचे भाडे तसेच महापालिकेचे इतर चार्जेस, अन्य कर, सरकारी कर स्वतंत्रपणे अदा करावे लागतील व देयके अदा केल्याच्या पावतीची छायांकित प्रत वेळोवेळी महापालिकेस उपलब्ध करुन द्यावी लागेल.
९) विरंगुळा केंद्राकरीता संस्थेस महापालिकेकडून कोणतेही अनुदान, कर्मचारी इत्यादी उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. सदरच्या बाबी संस्थेने स्वखर्चाने उपलब्ध करावयाच्या आहेत.
१०) व्यवस्थापन संस्थेने नेमलेल्या कर्मचाऱ्यांना महापालिका सेवेमध्ये सामावून घेतले जाणार नाही व तसा कोणताही हक्क सदर कर्मचाऱ्यांना असणार नाही. सदर कर्मचाऱ्यांची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील. त्यातून कोणतेही कायदेशीर, आर्थिक इत्यादी वाद निर्माण झाल्यास त्या संस्था स्वखर्चाने स्वतःच्या जबाबदारीवर दूर करेल. महानगरपालिकेला अशा वादाची झळ लागू देणार नाही.
११) विरंगुळा केंद्र इमारतीची महापालिकेस गरज भासल्यास संबंधीत संस्थेस सदरचे केंद्राची इमारत महापालिकेस तात्काळ उपलब्ध करुन द्यावी लागेल.
१२) दिलेल्या इमारतीच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ व सुशोभित ठेवावा लागेल.
१३) महापालिकेसोबत संबंधीत संस्थेने केलेल्या या करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्यास महानगरपालिका करारनाम्याची मुदत पूर्ण होण्यापूर्वी, अथवा महापालिकेस वाटेल त्या वेळी कोणतेही कारण न देता केव्हाही विरंगुळा केंद्रावा ताबा काढून घेता येईल.
१४) कोणत्याही कारणास्तव सदर केंद्राचे व्यवस्थापक सोडावयाचे झाल्यास त्याबाबत ३० दिवस अगोदर महापालिकेस लेखी कळवून जागा सुस्थितीत ताब्यात देणे आवश्यक असेल.
१५) विरंगुळा केंद्राची संपूर्ण मालकी महानगरपालिकेची राहील. या मालमत्तेवर महापालिके व्यतिरिक्त इतर कोणाचाही अधिकार राहणार नाही.
१६) सदर विरंगुळा केंद्रात व्यवस्थापन संस्थांव्दारे कोणत्याही कार्यक्रमाकरीता शुल्क, प्रवेश फी, इत्यादी जमा करीत असल्यास त्या कार्यक्रमासाठी महापालिकेमार्फत फी/शुल्क/भाडे आकारण्यात येईल व त्यासाठी संबंधित उप आयुक्त (मुख्यालय) यांची लेखी परवानगी आवश्यक असेल.
१७) सदर विरंगुळा केंद्रात मनोरंजनासाठी तसेच आरोग्य विषयक कार्यक्रमांचे आयोजन करता येईल.
१८) विरंगुळा केंद्राच्या बाबतीत कोणताही वाद झाल्यास आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहील.

वरील प्रमाणे धोरण निश्चित करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या सौ. निलम ढवण यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

ह्या विरंगुळा केंद्रात सुनियोजित आणि अजून काही त्याच्यासाठी सोयी सुविधा करण्यासाठी आपण खासदार आणि आमदारांच्या निधीतून त्यांचा निधी वापरावा त्यासाठी आपण परवानगी द्यावी अशी मी सुचना करत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५९, मिरा भाईंदर महानगरपालिकेची उर्वरीत मैदाने, उद्याने व लग्नकार्य हॉल मा. महासभेने ठरविलेल्या भाड्याने देणेबाबत निर्णय घेणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने मा. महासभा दि. ३०/१२/२०११ ठराव क्र. ८७ अन्वये ठरावात नमूद केल्यानूसार समाजमंदिर, खारीगांव, विनायक नगर हॉल, नगरभवन मंगल कार्यालय, सुभाषचंद्र बोस मैदान, नवघर शाळा व मिरारोड हजरतआला मैदान, शाळा इमारतीमधील वर्ग मंजूर केलेल्या दरानूसार कार्यक्रमाकरीता भाड्याने उपलब्ध करून देण्यास मान्यता दिलेली आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध भागात मैदाने असून भाईंदर (पूर्व) रामनगर येथील राष्ट्रसंत श्री परमसागर सुरीजी इमारत व मिरारोड (पूर्व) जांगीड इन्क्लेव्ह येथील कै. विलासराव दगडोजीराव देशमूख इमारतीमधील हॉल देखिल लग्न व इतर कार्याकरीता भाड्याने उपलब्ध करून द्यावयाचे आहेत.
तरी मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मैदाने/ अ.क्र.६ नुसार तसेच हॉल लग्न कार्य व इतर कार्यक्रमाकरीता अ.क्र. ०४ नुसार मा. महासभा दि. ३०/१२/२०११ ठराव क्र. ८७ अन्वये ठरविलेल्या दरानूसार भाड्याने उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मैदाने, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अ नूसार मैदानांच्या वापरा व्यतिरीक्त वापराकरीता वर्षातील जास्तीत जास्त ३० दिवसासाठी उपलब्ध करून देण्याबाबत बंधनांचे पालन करावे. लग्न कार्याकरीता कोणतीही मैदाने भाड्याने देण्यात येऊ नयेत. महानगरपालिका क्षेत्रातील पाणपोई बंद पडल्या असून अशा पाणपोई खाजगी संस्थानी स्वखर्चाने चालविण्याची मागणी केल्यास अशा पाणपोई सदर संस्थाना नामपात्र भाडयाने करारनामा करुन ५ वर्ष मुदतीसाठी देण्यास मा.आयुक्त यांना अधिकार देण्यात येत आहेत.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ५९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची उर्वरीत मैदाने, उद्याने व लग्नकार्य हॉल मा. महासभेने ठरविलेल्या भाड्याने देणेबाबत निर्णय घेणे.

**ठराव क्र. ६८ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने मा. महासभा दि. ३०/१२/२०११ ठराव क्र. ८७ अन्वये ठरावात नमूद केल्यानूसार समाजमंदिर, खारीगांव, विनायक नगर हॉल, नगरभवन मंगल कार्यालय, सुभाषचंद्र बोस मैदान, नवघर शाळा व मिरारोड हजरतआला मैदान, शाळा इमारतीमधील वर्ग मंजूर केलेल्या दरानूसार कार्यक्रमाकरीता भाड्याने उपलब्ध करून देण्यास मान्यता दिलेली आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध भागात मैदाने असून भाईंदर (पूर्व) रामनगर येथील राष्ट्रसंत श्री परमसागर सुरीजी इमारत व मिरारोड (पूर्व) जांगीड इन्क्लेव्ह येथील कै. विलासराव दगडोजीराव देशमूख इमारतीमधील हॉल देखिल लग्न व इतर कार्याकरीता भाड्याने उपलब्ध करून द्यावयाचे आहेत.
तरी मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मैदाने/ अ.क्र.६ नुसार तसेच हॉल लग्न कार्य व इतर कार्यक्रमाकरीता अ.क्र. ०४ नुसार मा. महासभा दि. ३०/१२/२०११ ठराव क्र. ८७ अन्वये ठरविलेल्या दरानूसार भाड्याने उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मैदाने, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अ नूसार मैदानांच्या वापरा व्यतिरीक्त वापराकरीता वर्षातील जास्तीत जास्त ३० दिवसासाठी उपलब्ध करून देण्याबाबत बंधनांचे पालन करावे. लग्न कार्याकरीता कोणतीही मैदाने भाड्याने देण्यात येऊ नयेत. महानगरपालिका क्षेत्रातील पाणपोई बंद पडल्या असून अशा पाणपोई खाजगी संस्थानी स्वखर्चाने चालविण्याची मागणी केल्यास अशा पाणपोई सदर संस्थाना नामपात्र भाडयाने करारनामा करुन ५ वर्ष मुदतीसाठी देण्यास मा.आयुक्त यांना अधिकार देण्यात येत आहेत.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
***ठराव वाचून कायम करण्यात आला***

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६०, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत वाहतुक नियंत्रण करणेकामी वाहतुक विभागाच्या मदतीसाठी महानगरपालिकेमार्फत ट्राफिक वॉर्डन जवान नेमणेस मान्यता देणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत वाहतूक नियंत्रण शाखा, ठाणे ग्रामिण यांच्या विनंती वरून महानगरपालिकेमार्फत मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावरील वाहतूक नियंत्रण करणे कामी ५० ट्राफिन वॉर्डन पुरविण्यात येत होते. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वाहतुक विभागाकडे अत्यंत अपूरा कर्मचारी वर्ग असल्याने महानगरपालिकेमार्फत ट्रफिक वॉर्डने उपलब्ध करुन देण्याबाबत वाहतुक शाखे मार्फत सातत्याने पाठपूरवठा करण्यात येत आहे. तरी महानगरपालिकेमार्फत ५० ट्राफिक वॉर्डन उपलब्ध करुन दिल्यास त्याचा फायदा मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वाहतुक व्यवस्था सुरक्षित होण्याकरीता होईल. ५० ट्राफिक वॉर्डन करीता महीन्यास रु. ५,४०,०००/- एवढा खर्च येईल. सदर खर्च भागविण्यासाठी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात रु. ५०.०० लक्ष एवढी तरतुद करण्यात यावी. सदर ट्राफिक वॉर्डन नेमण्यासाठी अशाप्रकारे मनुष्यबळ पुरवठा करण्याऱ्या संस्थाकडून निविदाव्दारे दर मागविण्यात यावेत. तसेच एक वर्ष कालावधी करीता करारनामा करण्यात यावा. सदर ट्राफिक वॉर्डन हे वाहतुक विभागाच्या नियत्रंणा खाली काम करतील. तथापी सदर ट्राफिक वॉर्डन हे फक्त मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातच काम करतील, त्यांना अन्य ठिकाणी अथवा अन्य कार्यक्रमांकरीता वाहतुक विभागास हलविता येणार नाही तसेच ट्राफीक वॉर्डन यांनी फक्त वाहतुकीचे नियंत्रणाचेच काम करावे, वाहनांची कोणत्याही प्रकारची तपासणी, कागदपत्र तपासणी करू नये अश्या अटी ठेवाव्यात. तरी ५० ट्राफिक वॉर्डन जवान वाहतुक विभागास उपलब्ध करण्याकरीता व येणाऱ्या खर्चास ही सभा मान्यता देण्यात येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ६० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत वाहतुक नियंत्रण करणेकामी वाहतुक विभागाच्या मदतीसाठी महानगरपालिकेमार्फत ट्राफिक वॉर्डन जवान नेमणेस मान्यता देणे.

**ठराव क्र. ६९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत वाहतूक नियंत्रण शाखा, ठाणे ग्रामिण यांच्या विनंती वरून महानगरपालिकेमार्फत मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावरील वाहतूक नियंत्रण करणे कामी ५० ट्राफिन वॉर्डन पुरविण्यात येत होते. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वाहतुक विभागाकडे अत्यंत अपूरा कर्मचारी वर्ग असल्याने महानगरपालिकेमार्फत ट्रफिक वॉर्डने उपलब्ध करुन देण्याबाबत वाहतुक शाखे मार्फत सातत्याने पाठपूरवठा करण्यात येत आहे. तरी महानगरपालिकेमार्फत ५० ट्राफिक वॉर्डन उपलब्ध करुन दिल्यास त्याचा फायदा मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वाहतुक व्यवस्था सुरक्षित होण्याकरीता होईल. ५० ट्राफिक वॉर्डन करीता महीन्यास रु. ५,४०,०००/- एवढा खर्च येईल. सदर खर्च भागविण्यासाठी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात रु. ५०.०० लक्ष एवढी तरतुद करण्यात यावी. सदर ट्राफिक वॉर्डन नेमण्यासाठी अशाप्रकारे मनुष्यबळ पुरवठा करण्याऱ्या संस्थाकडून निविदाव्दारे दर मागविण्यात यावेत. तसेच एक वर्ष कालावधी करीता करारनामा करण्यात यावा. सदर ट्राफिक वॉर्डन हे वाहतुक विभागाच्या नियत्रंणा खाली काम करतील. तथापी सदर ट्राफिक वॉर्डन हे फक्त मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातच काम करतील, त्यांना अन्य ठिकाणी अथवा अन्य कार्यक्रमांकरीता वाहतुक विभागास हलविता येणार नाही *तसेच ट्राफीक वॉर्डन यांनी फक्त वाहतुकीचे नियंत्रणाचेच काम करावे, वाहनांची कोणत्याही प्रकारची तपासणी,* कागदपत्र तपासणी करू नये अश्या अटी ठेवाव्यात. तरी ५० ट्राफिक वॉर्डन जवान वाहतुक विभागास उपलब्ध करण्याकरीता व येणाऱ्या खर्चास ही सभा मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६१, मिरा भाईंदर महानरपालिका क्षेत्रात नेटवर्किंग करीता खाजगी कंपनीस महानगरपालिकेच्या जागेत अँटीना पोल उभारण्यास जागा भाड्याने उपलब्ध करुन देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मे. इन्फोटेल ब्रॉड बॅंड सर्व्हिसेस लि. यांना ॲंटीना पोल उभारुन नेटवर्किंग करावयाचे असून त्यांना नेटवर्किंग करीता HDD Methodo logy द्वारे ६५ कि.मी. केबल टाकण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. सदर एजन्सीला शहरात एकूण ११० ठिकाणी ४ G ॲंटीना पोल उभारावयाचे असून त्यापैकी ६२ ॲंटीना पोल महानगरपालिकेच्या जागांवर प्रस्तावित आहेत. सदर कंपनीस ॲंटीना पोल उभारण्याकरीता २.०० मीटर X २.०० मीटर एवढी जागा फाऊंडेशनसाठी लागणार असून त्यावर ३०.०० मीटर उंचीचा पोल उभारण्यात येणार आहे. सदर ॲंटीना पोलवर महानगरपालिकेस हायमास्ट व कॅमेरे देखील बसविता येणार आहेत. सदर ॲंटीना पोल उद्याने, मैदाने व रस्त्याच्या मध्यभागात बसविण्यात येणार आहेत. सदर ॲंटीना पोल करीता २.०० मी. X २.०० मी. एवढ्या जागेचे चालू बाजारभावानुसार (Ready Reckner) रु. ५,१५०/- प्रति पोल (सरासरी) एवढे वार्षिक भाडे होणार आहे. (६२ पोलचे एकूण वार्षिक भाडे रु. ३,१९,३००/-) सदर जागा ३० वर्षे मुदतीसाठी भाड्याने मागितलेली आहे. सदर ॲंटीना पोल जमिनीवर फक्त १.०० मीटर व्यासाचे गोलाकार राहणार असून उंचीनुसार कमी होत जाणार आहे. त्यामुळे वाहतुकीस अडथळा होणार नाही. मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीत सदर ॲंटीना पोलचा पथदर्शी प्रकल्प (Pilot Project) करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. तरी महानगरपालिकेच्या जागांवर भाड्याने ॲंटीना पोल उभारण्यास रु. ७०००/- प्रति पोल दराने ३० वर्ष मुदतीसाठी जागा भाड्याने देण्यास व दरवर्षी १० % वाढ करण्यास ही सभा मान्यता देत आहे. सदर कंपनी सोबत तसा करारनामा करण्यात यावा. सद्यस्थितीत टाटा टेली सर्व्हिस यांचा ही प्रस्ताव प्राप्त झाला असून त्यांना देखील भाडे ठरवून ॲंटीना पोल उभारण्याकरीता परवानगी देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, मागच्या वेळेला मोबाईल टॉवरला परवानगी देण्यासाठी आपण एक गांभीर्याने विषय आणला होता. की हा हानीकारक आहे म्हणून प्रत्येक टॉवरचा निर्णय महासभेने घ्यावे असा विषय आणला होता. आणि आता आपण त्यांना सरसकट परवानगी देतो. मा. आयुक्त साहेब आता सांगितले दोन मिटर बाय दोन मिटर ध्रुवकिशोरजी त्याची साधारण अमाऊंट किती होती.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

७ हजार पर पोल वर्षाचे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, एक सॅम्पल पोल पालिकेत लावला आहे. दाखवायला दोन मिटर बाय दोन मिटर आहे. मागची एक पार्किंग कमी झाली. ह्या साईटच त्या जागेचा काय उपयोग होत नाही. सांगायला दोन मीटर बाय दोन मीटर पण जागा मोठी जाते. आपल्याकडे एक पार्किंगच कमी झाली. किती केल तरी ५० फुट बाय ५० फुट एवढी जागा त्याला लागते. सध्या ह्या सगळ्या कंपनीचे टॉवर सोसायटीच्या वरती आहे. कुठलीही सोसायटी घेतली तर साधारण लाखो रु. मध्ये म्हणजे एका टॉवरला वर्षाला दोन ते तीन लाख रुपये भाडे आहे. कुठल्याही सोसायटीमध्ये तीन लाखपेक्षा कमी भाडे नाही. आणि आपण त्यांना सात हजारामध्ये परवानगी देतो. भविष्यात ह्या सगळ्या मोबाईल कंपन्या ह्या स्टॅटीजीने येणार आहेत. मग असे किती पोल आपण शहरात उभे करावे हा एक मुद्दा आहे. प्रत्येक ठिकाणी आपण पोल उभे करायचे का? दोन मिटरचे दोन मिटर जागेसाठी त्यांचे रिपेयरींग असेल तिकडे गाडी येईल त्यामुळे आपण नेहमी आपण डिर्स्टब होणार आहे. उदा. खाली सॅम्पल लावले आहे. तिकडे बघा आपली किती जागा वाया गेली आहे. शासनाचा एक जी.आर.आहे. खांबित साहेबाना माहित आहे. जे फायबर ऑप्टिक्स टाकले. साहेब, त्यांच्यामध्ये एक लाईटचा पोल आहे ना म्हणजे साधारण ६ इंच बाय ६ इंच असेल त्याला शासनाने एक जी.आर. काढला. फायबर ऑप्टीक्स पोलवर स्ट्रेंज करण्यासाठी ज्या शहरात लावील त्याला १२०० रु. महिन्याला ६ इंचाला लावले आहे. जेवढे मीटर आहेत त्याचे भाडे वेगळे. जेवढे मीटर फायबर आहे त्याचे भाडे वेगळे. शासनाचा एक जी.आर.च आहे. ६ इंच जागा घेतले तर त्याचे वार्षिक भाडे २५०० ते ३०००/- येतो. इकडे आपण सात हजारात कितीतरी मोठी जागा देतो. भविष्याच्या ॲंगलनी इन्कम व्हाइज तरी तीस वर्षासाठी आपण देतो. रेडीरेकनर ह्या शहराचा खूप जोरात वाढत चालला आहे. १० टक्केपेक्षा वाढ चाललेली आहे. तर सात हजार म्हणजे साहेब ५०० रुपये झाले. मंथली ५०० रु. साठी आपण एवढी मोठी जागा द्यायची का? हा पहिला प्रश्न मागच्या वेळेला सभागृहाची शंका होती की हा एखादा हानीकारक आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने त्यासाठी परवानगी देऊ नये. मग ह्याला कोण सर्टीफाईड करणार की, आपण जिकडे लावणार तो हानीकारक नसणार. तुम्ही एखाद्या गार्डनमध्ये लावला तर गार्डनमध्ये मॉर्निंग वॉल्कला जातात, छोटी मुलं जातात ह्यांना हानीकारक होणार नाही त्याची गॅरंटी काय? आता ध्रुवकिशोरजीने सांगितले की टाटांनी मागितले आहे, साहेब एअरटेल पण मागतील,बी.पी.एल. पण मागतील, आयडीया पण मागतील मग पूर्ण शहरात आपण पोल लावायचे का? एकाला दिले एकाला द्यायचे नाही का? मॅडम, माझे आपल्याला एक निवेदन राहील की, परत हा विषय फेर चर्चा करा. दोन मिटर बाय दोन मिटर जागा जात नाही. मी इकडे एखादा पोल लावला तर संपूर्ण जागा वेस्ट

होईल तर त्याच्या गाड्या येतील, रिपेअरींगला येतील, माणसे चढतील ह्या सगळ्याचा विचार करा आणि ५०० रुपये मोठा फरक पडत नाही आणि आपण ३० वर्षासाठी देतो. उद्या आपल काय चेंजेस लागले तर आपण करु शकत नाही भविष्यात कोणती टेक्नॉलॉजी किती हानीकारक होईल हा प्रयोग शहरात आपण पहिल्यांदा करतो. शासन ज्यावेळेला सांगते २५०० रुपये ६ इंच जागेला २ मिटर बाय २ मिटर दाव्यासाठी आहे. जागा जास्त जाते आणि रिलायन्स कंपनीचे कोणत्याही प्रकारचे ह्या शहरावर प्रेम नाही.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्तांना मी अधिकार देते त्यांनी तपासून आणि व्यवस्थित करावे तोपर्यंत मी ठराव मंजुर करत आहे.

**गीता जैन :-**

नाही मॅडम ठराव कसा मंजुर करणार?

**मॉरेस रॉड्रीक्स :-**

आपल्याला इकडे गाडी पार्क करायला जागा नाही तुम्ही कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी आपण मिळून त्यांना जागा देता. कशासाठी? तुमच्या गाड्या बाहेर ठेवायच्या असतील तर सांगा तुमच्या गाड्या बाहेर पार्क होऊ द्या. आम्हाला गाडी पार्क करायची आहे. ५० लाख रुपये शौचालयासाठी खर्च करता, तर १० ते २० हजारासाठी जागा का देता? ही जागा मंजुर करु नये असे असेल तर राष्ट्रवादी आणि कॉंग्रेसनी आपल्या गाड्या रस्त्यावर पार्क कराव्या.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, पोल महापालिकेच्या आवारात लावला आहे त्याचा विरोध आहे फक्त.

**नरेंद्र मेहता :-**

आमचा विरोध अनेक विषयाला आहे.

**जुबेर इनामदार :-**

स्पष्ट करा तुम्ही विरोधी पक्ष आहेत तर विरोध करणारच नाही केलं तर तुम्हाला विरोधी पक्ष कोण बोलेल

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, एखाद्या महापालिकेने हे धोरण घेतले तर सर्टीफाईड होईल ना की हे हानीकारक नाही.

**जुबेर इनामदार :-**

विषय फक्त एका पोलचा आहे का? जो पोल खाली लावण्यात आलेला आहे तेव्हा आम्हीही विचारणा केली होती तेव्हा आम्हाला प्रशासनाने असे उत्तर दिले की, हा सॅम्पल पिस आहे. आपल्याला अशाप्रकारे पोल उभे करणार आहेत. गरज लागल्यास आपण तो पोल तिकडून काढू शकतो तो आपल्या अधिकारात आहे.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम, आपण ज्या शाळेला रिर्झव्हेशन डेव्हलप करायला दिले आहे ते पण ३० वर्षासाठी दिलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

रिझर्व्हेशन ठिक आहे ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग हे त्यांना इन्फ्रास्ट्रक्चर उभे करायचे आहे त्याच्यासाठी ३० वर्षे लागणारच ना आणि मॉरस साहेबांनी जे सांगितले आहे की गाड्या पार्किंग करायला मिळत नाही. विक्रम कुमार साहेबांनी स्ट्रिक्ट केले होते की, नगरसेवकांव्यतिरीक्त गाड्या एन्ट्री नव्हती. परंतु आता सगळ्याच्या गाड्या येतात म्हणून आमच्या गाड्यांना पार्किंगच मिळत नाही. त्यामुळे हे स्ट्रीक्ट करावे. नगरसेवकां व्यतिरीक्त कोणाच्या गाड्या आतमध्ये घेऊ देऊ नये.

**जुबेर इनामदार :-**

महापालिकेच्या आवारात जो पोल लावलेला आहे तो त्याला योग्य जागा द्या व तिकडुन स्थलांतर करा ही आमची सगळ्यांची भुमिका आहे.

(सभागृहात गोंधळ)

**प्रभात पाटील :-**

ह्या पोलच्या संदर्भात मा. महापौर मॅडम मला थोड बोलायचं आहे हा जो पोल तिथे घातला जागा पार्किंग वगैरे सगळेच मुद्दे तेवढेच खरे आहेत हा पोल घेताना तेव्हा बॉडी नव्हती असे मला वाटते हा विषय अवलोकन म्हणून आपल्या समोर आलेला आहे.

**मा. महापौर :-**

आपली बॉडी होती.

**प्रभात पाटील :-**

प्रशासनाला असेही वाटले नाही की, आपल्याला अवगत करावे महापालिकेची ही इमारत असताना तिथे फाऊंडेशन किती खोल केले आहे ह्याचा विचार केला असता आणि त्यावेळेला जर ह्या बिल्डींगला काही धोका झाला असता तर कारण ह्या गोष्टी आपल्याला अवगत केल्या नाहीत त्यावेळेला प्रशासनाने ह्या गोष्टी लक्षात घ्यायच्या आहेत ह्या वास्तुचे काय झाले असते तर तुमचे माझे सगळ्यांचे नुकसान होत संपूर्ण शहराचे नुकसान होते हा मुद्दा अतिशय महत्वाचा आहे. किती खोल त्यांनी डिगीट केले आहे ह्याचा विचार करावा आणि पार्किंगचाही प्रश्न आहे काही गोष्टी शहराच्या विकासासाठी करणे आवश्यक आहे करायल्या हव्यात तेवढेच खरे आहे परंतु काही गोष्टी ज्या आपल्याशी निगडीत आहेत त्या गोष्टींची जाणीव प्रशासनाने केली पाहिजे ते स्वतः इथे कार्यरत असतात. नगरसेवक एक-दोन तासासाठी असतात परंतु त्यांना इथे कायमचे वावरायचे असते तरी त्यांनी इतके खतरनाक रितीने काम केले. मी स्वतः त्या ठिकाणी जाऊन बघितले. बऱ्याच नगरसेवकांनी त्याच्यावर पत्रपण लिहिली पण प्रशासनाला काय पडले नाही. महापालिकेच्या परिसरामध्ये जे काही बांधकाम आहे त्याची परवानगी महासभेची व्हायलाच पाहिजे. हा मांझा मुद्दा आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय एक कंपनी असती तरी ठिक आहे. अनेक कंपन्या आहेत। साहेब एक उदाहरण सांगतो डिव्हायडर मध्ये एक ॲडव्हटाईजचा पोल लावला आठ इंच बाय आठ इंच तो महिन्याला दहा हजार की बारा हजार भरतो जागा तेवढीच गेली पण तो बारा हजार भरतो हा एवढा मोठा पोल लावणार त्याचे महिन्याला ५०० रुपये देणार मोटार सायकल पार्किंग होतात तेही महापालिकेला १२०० रुपये भरतात साहेब, महापालिकेकडे यायचे एकच कारण आहे. पर सोसायटी तीन लाख त्यांना परवडत नाही किंवा त्यांना पैसे वाचवायचे असतील म्हणून रिलायन्सने आपल्या शहराला काय दिले? शहराचा त्याचा विचार पाहिजे त्यांनी पण रेट कमी करावा करणार का? ह्यासाठी आमचा स्पष्ट विरोध आहे.

**प्रभात पाटील :-**

सगळ्यात जास्त इन्कम ह्या शहरात रिलायन्सला आहे म्हणून रिलायन्स आपल्यावरच सगळे लादते.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त महोदयांनी दुसऱ्या महासभेत धोरण निश्चित करुन यायचे आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ठिक आहे.

**गीता जैन :-**

आपण आपल्या महापालिकेची जागा द्यायचीच कशाला? सोसायटीना देऊ द्या त्यांना लाखात भरु द्या निदान सोसायटीचे तरी भलं होणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब तो पार्किंगचा विषय अतिशय गंभीर आहे बाहेरच्या गाड्या येऊ देऊ नका.

**प्र. नगरसचिव :-**

आजच्या सभेसाठी पुरक घोषणा आहे प्रकरण क्र.६६, सन्मा. सदस्य मदन उदितनारायण सिंह यांचा दिनांक १५/०३/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत लोकांच्या सेवेसाठी महानगरपालिका तर्फे उपलब्ध असलेली रुग्णवाहिका तसेच शववाहिनीचे मध्यवर्ती केंद्र सुरु करणेबाबत.

**मदन उदीतनारायण सिंह :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आपल्या मिरा भाईंदर शहरात लोकांच्या आरोग्यासाठी, सेवेसाठी आणि इर्मजन्सी सेवेसाठी आपल्या महापालिकेमार्फत चार ॲम्ब्युलन्स, एक शववाहीनी, एक फिरता दवाखाना तसेच त्या ॲम्ब्युलन्स आणि शव वाहीन्यावर २५ चालक आणि १२ मदतनीस ठेवण्यात आलेले आहेत मी काढलेल्या माहितीप्रमाणे आपण जी ॲम्ब्युलन्स शववाहीनी त्याच्यावर ड्रायव्हर आणि त्याची दुरुस्तीचा सर्व खर्च जवळपास ९० ते ९१ लाख पर्यंत जाते मी म्हणतो अजूनही वाढला तरी हरकत नाही पण ह्या खर्चाच्या रुपाने लोकांना सुविधा मिळायला पाहिजे ती मिळत नाही आता आपल्याकडे जेवढ्या ॲम्ब्युलन्स आहेत त्याच्या फक्त ड्रायव्हरचे नंबर दिले आहे म्हणजे चार ॲम्ब्युलन्स चार ड्रायव्हरचे नंबर मी म्हणतो आम जनता सोडा आम्ही जे ९५ जनप्रतिनीधी आहे त्याच्याकडे देखील ॲम्ब्युलन्स वाल्याचा नंबर नसेल आणि तरी नंबर असला तरी रात्री अपरात्री कोणाला मदत लागली तर आम्ही नंबर शोधत बसायचा का? पहिलं एका प्रभागाला करायचा आणि ती गाडी बाहेर गेली असेल तर दुसऱ्या प्रभागाला करायचा ती गाडी बिघडली असेल तर तिसऱ्याचा नंबर घ्यायचा म्हणजे हे नंबर घेता घेता जो इर्मजन्सी पेशंट असेल तोच वर जाईल आपल्या मिरा भाईंदरच्या १२ लाख जनतेची तसेच महासभेत असलेले सर्व जनप्रतिनिधी सगळ्याची अशी मागणी आहे आणि सगळ्या शहराला गरज आहे आपण चार चे सहा प्रभाग करतो प्रत्येक प्रभाग कार्यालयात एक ॲम्ब्युलन्स ठेवण्यात यावे आणि प्रत्येक ॲम्ब्युलन्सचे कॉन्टॅक्ट नंबर संपर्क सुत्र मध्यवर्ती केले पाहिजे म्हणजे महापालिकेत ऑपरेटर जवळ असेल आणि ज्यांनी गरज लागली आम जनतेने किंवा जनप्रतिनीधींनी फोन त्या संपर्क सुत्रावर करायचा सेंट्रलाईज कॉन्ट्रॅक्ट नंबर आणि त्याचा ऑपरेटर असेल तो जी ॲम्ब्युलन्स अवेलेबल आहे त्यांना कॉन्ट्रॅक्टकरुन ज्यांना गरज आहे तिकडे ॲम्ब्युलन्स पाठवावी असे केल्याने आपला जो ९० लाखचा खर्च आहे

तो खर्च लोकांना सुविधा देण्यात येईल नाही तर आपण खर्च करतो आणि त्याचा उपयोग होत नाही म्हणून मी असा ठराव मांडत आहे की आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत जे शववाहीन्या, ॲम्ब्युलन्स फिरता दवाखाना आहे त्याच्या सगळ्याचे संपर्क सुत्र केद्रीय कार्यालयात मध्यवर्ती करण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

**दिनेश जैन :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मॅडम, मला सुचना मांडायची आहे. मॅडम मी २०१० मध्ये आयुक्त साहेब शिवमुर्ती नाईक साहेबांना पत्र दिले होते की, आपल्या जेवढ्या प्रभाग समित्या आहेत त्या प्रत्येक समितीमध्ये दहन दाखला आणि मृत्यूदाखला देण्याची आपण सुविधा करावी. मॅडम ते शिवमुर्ती नाईक साहेबांनी मान्य केले. आणि चालूही केले पण तिकडे दहन दाखला देण्यासाठी एकही व्यक्ति बसले नाही. रात्री अपरात्री घोडबंदरवरुन वेस्टला येणार, ईस्टवरुन वेस्टला येणार. त्यासाठी चार प्रभाग कार्यालयामध्ये जन्म-मृत्यूचे हे केल होत. पण आज तिकडे एकही नाही. माझ्याकडे शिवमुर्ती नाईकसाहेबांचे पत्र आहे. २०११ मध्ये चालू केलेले पण आज एकही व्यक्ति तिकडे बसत नाही. तर ती सुविधा पुरविण्यात यावी. ही सुचना ह्या ठरावात मांडण्यात यावी.

**निलम ढवण :-**

मॅडम, ह्या संदर्भातील मागणी मी देखील केली होती. त्यानंतर मी पानपट्टे साहेबांना देखील भेटले होते. पण पानपट्टे साहेबांनी माणसे कमी असल्यामुळे त्या सुविधेसाठी पुढच्या महिन्यात विचार करतो असे सांगितले. परंतु ह्या संदर्भात लवकरात लवकर विचार होऊन प्रत्येक प्रभाग कार्यालयात ही सोय चालू करण्यात यावी अशी आपणांस विनंती आहे.

**प्रशांत केळूसकर :-**

मध्यवर्ती करण्यासंदर्भात जो विषय निघाला त्याच्यावर मी बोलू इच्छितो. मुंबई महानगरपालिकेत १०८ नंबर त्याच्यासाठी राखीव करुन घेतला असून ह्या नुसार त्याच्या सुविधा पुरविल्या जातात. आपल्या महानगरपालिकेतर्फे तीन डिजीटचा नंबर का घेण्यात येऊ नये. सदर बाबतीत आयुक्त महोदय आपण पाठपुरावा करुन तीन डिजीटना नंबर मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात यावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ह्या विषयावर बोलायचे आहे. सन्मा. मदन सिंग ह्यांनी जो ठराव मांडलेला आहे की, एकच सेन्ट्रलाईज करावे. मॅडम आपण सेन्ट्रलाईज्ड केले आणि टेंभा हॉस्पीटलमध्ये ॲम्ब्युलन्स ठेवली आणि नवघरच्या माणसाने जर फोन केला तर ती ॲम्ब्युलन्स नवघरपर्यंत जाण्यासाठी जो वेळ लागेल त्यापेक्षा तलाव रोडचे जे ऑफिस आहे तिकडे जर ॲम्ब्युलन्स ठेवली तर ती फास्ट जाईल. मिरारोडच्या प्रभाग समितीत एक ॲम्ब्युलन्स आहे तिकडच्या लोकांना सुविधा होते. सेन्ट्रलाईज केले तर ॲम्ब्युलन्स जायला खूप वेळ लागतो. त्याच्यामुळे आम्ही असा ठराव मांडतो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

ॲम्ब्युलन्स प्रत्येक प्रभाग कार्यालयातच ठेवायची. फक्त नंबर सेन्ट्रलाईज करायचा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेबांनी सांगितले त्याप्रमाणे प्रत्येक ठिकाणी आपली ॲम्ब्यूलन्स ठेवायची. पण नंबर जर एक ठेवला तर त्याच्यात कम्यूनिकेशन गॅप होईल. मी जर फोन केला आणि सांगितल की अशा ठिकाणी मला ॲम्ब्यूलन्स पाहिजे आणि त्याने जर बरोबर ऐकले नाही. त्याने मॅसेज पास ऑन केला तर मॅसेज चूकीचा जाईल. आणि जो ॲड्रेस आहे तो परफेक्ट मिळणार नाही. त्यामुळे ॲम्ब्यूलन्सवाला शोधत राहील. म्हणून जो माणूस ॲम्ब्यूलन्स घेऊन जाईल त्याच माणसाला फोन केला तर परफेक्ट ॲड्रेस आणि परफेक्ट लोकेशन मिळेल आणि त्याचा वेळ वाचेल.

**मदन उदितनारायण सिंह :-**

ती सिस्टम तर सध्या चालू आहे. परंतू लोकांना त्याची सुविधा मिळत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य केळूसकर साहेबांनी जे सांगितले की, तीन डिजीट नंबर ते बरोबर आहे. त्यासाठी प्रयत्न करा. आणि मी असा ठराव मांडतो. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील शहरवासियांकरीता महानगरपालिकेमार्फत रुग्णवाहिका व शववाहिनीची सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. यापूर्वी रुग्णवाहिका व शववाहिनी महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयामार्फत नागरीकांच्या आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देण्यात येत होत्या. परंतु, शहराच्या टोकावर राहणाऱ्या नागरीकांना मुख्य कार्यालयामध्ये येऊन रुग्णवाहिका किंवा शववाहिनी उपलब्ध करुन घेणे खुप अडचणीचे व वेळखाऊ होते. करीता नागरीकांच्या मागणीनुसार रुग्णवाहिका व शववाहिनी प्रभाग समिती निहाय ठेवण्यात आलेली आहेत. जर पुनःश्च रुग्णवाहिका व शववाहिनी मुख्य कार्यालयामध्ये एकत्रितरित्या ठेवल्यास नागरीकांची गैरसोय होणार आहे. करिता सद्यस्थितीत रुग्णवाहिका व शववाहिनी ज्या तऱ्हेने उपलब्ध करुन देण्यात येत आहेत त्याचप्रमाणे

यापुढे देखील प्रभाग समिती निहाय उपलब्ध करुन देण्यात याव्यात. यामध्ये कोणताही बदल करु नये असा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठरावामध्ये ती सुचना घ्या.

**मा. आयुक्त :-**

आपले हे प्रश्न ॲम्ब्युलन्स पुरता मर्यादित न ठेवता आपत्ती व्यवस्था आराखडा जो करायचा आहे त्या कामाला सुरुवात केलेली आहे. त्यामध्ये आपल्या महानगरपालिकेकडे असलेले ॲम्ब्यूलन्स, खाजगी क्षेत्राच्या ॲम्ब्यूलन्स, दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्र, जी महत्वाची आस्थापने आहेत. फायर ब्रिगेड किंवा प्रायव्हेट मेडीकल प्रॅक्टीशनर असतील ह्या सगळ्यांची यादी तयार करुन एक लहान पूस्तीका तयार करुन सर्वांच्या टेलिफोन नंबरसह मी येत्या एका महिन्यामध्ये आपल्याला सर्वांना सर्क्यूलेट करणार आहे. या शहराचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करताना या शहरामध्ये आतापर्यंत कोणकोणते संभाव्य धोके झालेले होते, कोणते होणार आहेत. तो एक विचार करुन आपल्याला फक्त शासन किंवा निमशासकीय महानगरपालिकेचाच फर्स्ट रिस्पॉडंट न राहता जनतेचा देखील सहभाग वाढावा ह्यासाठी देखील मी प्रयत्न करणार आहे. त्या आराखड्याचे काम ऑलरेडी सुरु केलेले आहे. महानगरपालिकेमध्ये एक करता येईल. महानगरपालिकेमध्ये एक केंद्रिय कंट्रोल रुम जे म्हणतो जसे पोलिस कंट्रोल रुम असते तसे एक केंद्रिय कंट्रोल रुम तयार करण्यासाठी एक खोली आयडेन्टीफाय केलेली आहे. तिथे सुरुवातीला किमान १२ तास नंतर पावसाळ्याचे दिवस येतील किंवा आणखी काही धोक्याच्या सुचना येतील त्यावेळीस दिवसाचे २४ तास ती आपत्ती व्यवस्था किंवा केंद्र म्हणा किंवा नियंत्रण कक्ष चालू राहील. आणि त्या नियंत्रण कक्षामध्ये आपल्याला संपर्क साधून नेमकी काय माहिती पाहिजे काय माहिती द्यायची असेल ती देता येईल. तिसरा मुद्दा होता १०८ नंबर सारखा प्रयत्न करायचा तर त्याचा देखील मी माझ्या लेवलला प्रयत्न करेन.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, जन्म-मृत्यू दाखले सर्व प्रभागामध्ये देण्यात यावे अशी तरतूद करावी. कारण अगोदर सर्व समितीमध्ये दहन दाखले देत होते.

**प्रशांत केळूसकर :-**

मॅडम, एक महत्वाचा विषय आहे. माझ्या माहितीप्रमाणे केंद्र शासन आणि राज्य शासनाने एक जी.आर. काढलेला आहे. डिझास्टेल मॅनेजमेन्ट सिस्टम चालू करावी त्यासाठी सरकार आपल्याला ग्रॅन्ड देते. त्याच्यावर देखील कारवाई करण्यात यावी. लवकरात लवकर सुरु करण्यात यावा.

**मा. आयुक्त :-**

त्यामध्ये कारवाई करण्यात येईल. त्यामध्ये आपले पैसे खर्च न होता केंद्रशासन किंवा राज्य शासनाचा निधी आणण्याचा माझा स्वतःचा प्रयत्न सुरु आहे. त्या प्रयत्नाला आणखी गती देण्यात येईल. जेणेकरुन आपल्या निधीतून खर्च न करता राज्य शासनाच्या निधीतून खर्च करु. कमी पडले तर ह्याच्यामध्ये आणखी मागवायची आपली तयारी आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सन्मा. सदस्यांचे तेवढच म्हणण होत की, नंबर एक द्या आणि ज्या-ज्या ठिकाणी तिकडेच तुम्ही पार्किंग करा. एका व्यक्तिला माहित नसते की, मी राहतो मला कोणत्या प्रभागामध्ये फोन करायचा तेवढच आहे. साहेब नंबर करायला काय हरकत नाही. दोन्ही क्लब करुन मंजूर करा.

**डॉ. आसिफ शेख :-**

मा. आयुक्त साहेब, जसा १०० नंबर पोलिस कंट्रोल रुमला जातो. मग तिकडचे पोलिस संबंधित पोलिस स्टेशनला फोन करतात की इकडे असा असा प्रॉब्लेम आहे. त्याप्रमाणे आपले ॲम्ब्यूलन्स सेन्ट्रलाईज झाले पाहिजे. १११ किंवा १२३ हा नंबर ......................

**मा. महापौर :-**

दोन्ही ठराव क्लब करुन मंजूर करत आहे.

**प्रकरण क्र. ६६ :-**

सन्मा. सदस्य मदन उदितनारायण सिंह यांचा दिनांक १५/०३/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत लोकांच्या सेवेसाठी महानगरपालिका तर्फे उपलब्ध असलेली रुग्णवाहिका तसेच शववाहिनीचे मध्यवर्ती केंद्र सुरु करणेबाबत.

**ठराव क्र. ७० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील शहरवासियांकरीता महानगरपालिकेमार्फत रुग्णवाहिका व शववाहिनीची सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. यापूर्वी रुग्णवाहिका व शववाहिनी महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयामार्फत नागरीकांच्या आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देण्यात येत होत्या. परंतु, शहराच्या टोकावर राहणाऱ्या नागरीकांना मुख्य कार्यालयामध्ये येऊन रुग्णवाहिका किंवा शववाहिनी उपलब्ध करुन घेणे

खुप अडचणीचे व वेळखाऊ होते. करीता नागरीकांच्या मागणीनुसार रुग्णवाहिका व शववाहिनी प्रभाग समिती निहाय ठेवण्यात आलेली आहेत. जर पुनःश्च रुग्णवाहिका व शववाहिनी मुख्य कार्यालयामध्ये एकत्रितरित्या ठेवल्यास नागरीकांची गैरसोय होणार आहे. करिता सद्यस्थितीत रुग्णवाहिका व शववाहिनी ज्या तऱ्हेने उपलब्ध करुन देण्यात येत आहेत त्याचप्रमाणे यापुढे देखील प्रभाग समिती निहाय उपलब्ध करुन देण्यात याव्यात. यामध्ये कोणताही बदल करु नये असा मी ठराव मांडत आहे. तसेच तीन अंकी टेलीफोन नंबर देण्यात यावेत व त्याची प्रसिध्दी करावी.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६७, सन्मा. सदस्य ॲड रवि व्यास यांचा दिनांक १५/०३/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महानगरपालिका हद्दीतील एकाच इमारतीमधील सर्व सदनिकांना एकसमान दराने कर आकरणी करणेबाबत.

**रवि व्यास :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील एकाच इमारतीमधील सदनिका/दुकाने यांना वेगवेगळ्या दराने कर आकारणी झालेली आहे. करिता एकाच इमारतीमधील सदनिका/दुकाने यांना समान दराने कर आकारणी करणेबाबत मा. महासभा दि. २०/०३/२०१० प्रकरण क्र. ६३, ठराव क्र. ६६ अन्वये मान्यता देण्यात आलेली होती. तरी अजूनही बऱ्याच जुन्या इमारतींना समान दराने कर आकारणी झालेली नाही. वास्तविक पाहता पारित झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने आजपावेतो सर्व जुन्या इमारतींना समान दराने कर आकारणी होणे अपेक्षित होते.

ज्या जुन्या इमारतींना समान दराने कर आकारणी झालेली नाही त्या सर्व इमारतींना समान दराने कर आकारणी करणेकरीता शहरात सर्व ठिकाणी या बाबतची जाहिरात करुन नागरीकांचे अर्ज प्राप्त करुन घेणेकामी ६ महिन्यांची मुदत देणेत यावी व त्याप्रमाणे समान दर कर आकारणी करणेची कार्यवाही करणेत यावी असा मी ठराव मांडत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर करत आहे. "क" चा प्रस्ताव प्रशासनानी दिलेला आहे.

**प्रकरण क्र. ६७ :-**

सन्मा. सदस्य ॲड रवि व्यास यांचा दिनांक १५/०३/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महानगरपालिका हद्दीतील एकाच इमारतीमधील सर्व सदनिकांना एकसमान दराने कर आकरणी करणेबाबत.

**ठराव क्र. ७१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील एकाच इमारतीमधील सदनिका/दुकाने यांना वेगवेगळ्या दराने कर आकारणी झालेली आहे. करिता एकाच इमारतीमधील सदनिका/दुकाने यांना समान दराने कर आकारणी करणेबाबत मा. महासभा दि. २०/०३/२०१० प्रकरण क्र. ६३, ठराव क्र. ६६ अन्वये मान्यता देण्यात आलेली होती. तरी अजूनही बऱ्याच जुन्या इमारतींना समान दराने कर आकारणी झालेली नाही. वास्तविक पाहता पारित झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने आजपावेतो सर्व जुन्या इमारतींना समान दराने कर आकारणी होणे अपेक्षित होते.

ज्या जुन्या इमारतींना समान दराने कर आकारणी झालेली नाही त्या सर्व इमारतींना समान दराने कर आकारणी करणेकरीता शहरात सर्व ठिकाणी या बाबतची जाहिरात करुन नागरीकांचे अर्ज प्राप्त करुन घेणेकामी ६ महिन्यांची मुदत देणेत यावी व त्याप्रमाणे समान दर कर आकारणी करणेची कार्यवाही करणेत यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रवि व्यास** **अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

२ के खाली प्रस्ताव आला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ठरावाचे वाचन केले.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, "क" च्या विषयाला आपल्याला माहित आहे की, काय बहुसंख्य लागते आमची सकाळपासून तीच विनंती आहे की, बजेट ऑलरेडी बाहेर पडलेले आहे. आता त्यात आर्थिक प्रशासकीय बदल होऊ शकत नाही. आमची इच्छा जरी असली तरी २६ तारखेला बजेट होणार आहे. २७ला सुट्टी आहे २८ ला सभा लावावी आम्ही आहोत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, मा. आयुक्तांसोबत काल आपली चर्चा झाली होती. नाले सफाई लवकरात लवकर व्हायला पाहिजे. बजेटची तरतूद आपण करणारच. बजेटची तरतूद प्रस्तावित केलेली आहे. त्याच्यामध्ये उल्लेख केलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सन्मा. जुबेर इनामदारानी चांगल उत्तर दिल की, तुम्हाला कसे माहित की, प्रस्ताव मंजूरच करणार आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आम्ही प्रस्तावित केलेले नाही.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्हाला कसे माहित की, ते मंजूरच होणार आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

स्टॅन्डिंगने मंजूर केले.

**नरेंद्र मेहता :-**

महासभेमध्ये येणार आहे ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आपण प्रस्ताव करु शकतो.

**जुबेर इनामदार :-**

आम्हाला शहराचा विकास करायचा आहे.

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

महिला समितीचा विषय होता. तुम्ही सांगितले मला घाई होती. तुम्ही १२ महिने झोपतात. २८ ला सभा लावा आम्ही येतो.

**मा. महापौर :-**

आमच्याकडे २८ ला टाईम नाही.

**गिता जैन :-**

मॅडम, शहराच्या विकासासाठी टाईम नाही असे बोलून चालणार नाही.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

नाले पुरुन झाले आहेत आता ५-६ नाले साफ करायला .....................

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब आम्ही तुमच्या विरुध्द कोर्टात जाणार.

**मॉरस रॉड्रिक्स :-**

आता नाले राहिलेच नाहीत. एवढी घाई नाही की आठ दिवसातच हा विषय मांडला पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

प्रस्ताव नाही, वाचला नाही काय बरोबर आहे कसे काय?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सगळी चर्चा करुन करतो.

**नरेंद्र मेहता :-**

गर्व्हनमेंटकडे चॅलेन्ज करणार, आम्ही कशी मंजूरी देणार.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, एक दीड महिना जातो. नालेसफाईला मे मध्ये सुरुवात होते. पाऊस पडला की, प्रॉब्लेम येतो. फक्त १०-१५ नाल्याच्या कामाला सुरुवात केली.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर करत आहे.

**गिता जैन :-**

आमचा विरोध आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मंजूर होऊ शकत नाही. आमचा विरोध आहे.

**मा. महापौर :-**

मग तुम्ही विरोध द्या.

**नरेंद्र मेहता :-**

तशी गरज नाही. सचिवांना माहित आहे "क" खाली आमच्या विरोधाची गरज नाही. मान्यतेची गरज आहे जी आम्ही देत नाही.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब किती लागतील.

**मा. महापौर :-**

तुम्ही वोटिंग घ्या.

**प्र. नगरसचिव :-**

२ के खाली जो विषय आलेला आहे मनपा क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी कच्चे पक्के नाले सफाई करणे व येणाऱ्या अंतर्गत सर्व कामाबाबत हा विषय सभा पटलावर घेण्यासाठी किमान ३/४ उपस्थित सदस्यांपैकी सदस्यांची मंजूरीची आवश्यकता आहे. आपल्यापैकी किती सदस्य ह्या ठरावाच्या बाजूने आहेत त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात जे आहेत त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी आहेत त्यांनी हात वर करायचे आहेत.

**हेलन जॉर्जी :-**

सन्मा. महापौर मॅडम, गुरुवार, शुक्रवार आपला गूड फ्रायडे आहे आणि गुरुवारी पायधवणीचा पास आहे. पवित्र आठवडा आहे. ४० दिवस आपले उपवास चालू आहे. त्यामुळे २८ तारखेला तुम्ही मिटींग ठेऊ नका.

**मा. महापौर :-**

लावणार नाही, मला स्वतःला माहित आहे मीच नसणार. सुचक श्री ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेला २ क खाली जे मतदान आलेले आहे. बाजूने ४५ आहेत विरोधात ३३ आहेत आणि तटस्थ ५ आहेत. हा ठराव मंजूर करत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मंजूर होतो का? मा. आयुक्त महोदय क खाली विषय मंजूरीचा नाही. विषय घ्यायचा की नाही ह्यासाठी ठराव झालेला आहे.

**प्रभात पाटील :-**

मॅडम एक मिनिट फक्त तुमचा वेळ घेणार आहे. विषय असा आहे. आपण जे सानुग्रह अनुदान मंजूर केलेले आहे. मागच्या वेळेला मी असच बोलले. मार्च एन्ड होतो आहे. आणि लिंक वर्करना सानुग्रह अनुदान दिलेले नाही. संगणक चालकांचा विषय पेन्डींग आहे. कधी करणार, की पुढल्या वर्षी देणार आहेत. ते विषय का राहिले आहेत. मी तुमच्याकडे येऊन त्या प्रश्नाचे उत्तर विचारेन.

**मा. महापौर :-**

मॅडम, तुम्ही माझ्याकडे या. मा. आयुक्त साहेब आपण जॉइन्टली बसून मी तुम्हाला ह्या प्रश्नाचा जवाब देते. सभा संपली असे मी जाहिर करते.

**सभा संपल्याची वेळ - दु. २.०० वा.**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.१६/०५/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.११- मिरा भाईंदर महानगरपालिका मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत रहिवास वापराकरिता लागणारे आवश्यक वाहनतळ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करणे बाबत.**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मंजूर विकास नियंत्रण नियमावली विनियम ३५, तक्ता क्र. १२ नुसार रहिवास वापराच्या बांधकामास खालीलप्रमाणे वाहनतळाबाबत तरतूद केलेली आहे.

| अ.क्र. | वापर | सदनिकेचे चटईक्षेत्र (चौ.मी.) | विकास नियंत्रण नियमावली मंजूर तरतूद | प्रस्तावित तरतूद |
|---|---|---|---|---|
| १ | रहिवास | ०.० - ३५.०० | ------ | प्रति २ सदनिका १ वाहनतळ |
| २ | रहिवास | ३५.०० - ४५.०० | ४ सदनिकांमागे १ वाहनतळ | प्रति सदनिका १ वाहनतळ |
| ३ | रहिवास | ४५.०० - ७०.०० | २ सदनिकांमागे १ वाहनतळ | प्रति सदनिका १ वाहनतळ |
| ४ | रहिवास | १२०.०० - व त्यावरील क्षेत्र | १ सदनिकांमागे १ वाहनतळ | प्रति सदनिका २ वाहनतळ |
| ५ | रहिवास | अभ्यगतांसाठी | एकूण आवश्यक वाहनतळापैकी १०% | एकूण आवश्यक वाहनतळापैकी २०% |

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे क्षेत्र तसेच महानगरपालिका क्षेत्रात इमारतींचा होत असलेला विकास व वाढती लोकसंख्या व तद्अनुषंगाने शहरातील वाढणारी वाहने यांचा विचार करता, महानगरपालिकेस प्राप्त होणा-या विकास प्रस्तावांमध्ये वाहनतळाबाबत यापूर्वीच्या मंजूर तरतूदीमध्ये वरील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे नियमावलीत फेरबदल केल्यास शहरातील रहिवास विभागात वाहनतळाची समस्या सुटण्यास तसेच शहरातील वहातुक कोंडीवरही नियंत्रण होणेस मोठ्या प्रमाणावर मदत होणार आहे.

तरी सदर प्रकरणी मिरा भाईंदर महानगरपालिका मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम ३५ तक्ता क्र. १२ मध्ये वाहनतळ बाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये प्रस्तावित फेरबदल प्रस्ताव मंजूरी मिळणेकरीता सादर करणेत येत आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

(१)

सामान्य प्रशासन
प्रा. शि. श्रा. ४
२३/४/१३

**परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना जमा झालेल्या अंशदानावर सन २०१२-१३ करीता व्याज दर**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक : अंनियो २०१३/ प्र.क्र.०५/सेवा- ४**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१३.**

**वाचा : - १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो १००५/१२६/सेवा -४, दि. ३१ ऑक्टोबर २००५**
**२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो १०१०/प्र.क्र.६७/सेवा -४, दि. १४ डिसेंबर, २०१०**
**३) शासन निर्णय, क्रमांक : अंनियो २०१२/ प्र.क्र.३६/सेवा- ४, दि. ३१ मार्च, २०१२**

**प्रस्तावना-**

संदर्भाधिन क्रमांक १ येथील शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो १००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ अन्वये नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत स्तर-१ मध्ये प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्याचे मूळ वेतन अधिक महागाई वेतन (असल्यास) अधिक महागाई भत्ता या रकमेच्या १०% इतके मासिक अंशदान व राज्य शासनाकडून सममुल्य अंशदान जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच संदर्भाधिन क्रमांक २ येथील शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो १०१०/प्र.क्र.६७/सेवा -४, दि.१४ डिसेंबर, २०१० अन्वये सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीची रक्कम नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या स्तर-२ मध्ये जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या स्तर-१ व स्तर-२ मध्ये सन २०१२-१३ मध्ये जमा झालेल्या रकमांवर व्याज देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**निर्णय -**

शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत स्तर-१ मध्ये शासकीय कर्मचाऱ्यांकडून वसुल केलेल्या तसेच राज्य शासनाच्या समतुल्य अंशदानापोटी जमा झालेल्या एकत्रित रकमेवर सन २०१२-२०१३ या वित्तीय वर्षाकरीता सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीकरीता ठरविण्यात आलेल्या व्याज दराने म्हणजेच दि.०१.०४.२०१२ पासून ८.८ % दराने व्याज देण्यात यावे. व्याज जमा करण्यासंदर्भातील कार्यवाही राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडून करण्यात येईल.

२. सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या स्तर-२ मध्ये सन २०१२-१३ मध्ये जमा झालेल्या थकबाकीच्या रकमेवर देखील दि.०१.०४.२०१२ पासून ८.८ % दराने व्याज देण्यात यावे. व्याज जमा करण्यासंदर्भातील कार्यवाही राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडून करण्यात येईल.

३. वरील कार्यपध्दती जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय प्राथमिक व माध्यमिक शाळा, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय महाविद्यालये तसेच कृषि विद्यापीठे इत्यादींमधील कर्मचाऱ्यांना योग्य त्या फेरफारांसह लागू राहील.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१३०२१६१२३७३८९६०५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(स्वाक्षरी)
**र.आ.नागरगोजे**
**शासनाचे अवर सचिव**

प्रति,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१००प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
सह संचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई (१०० प्रती)
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१०० प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष

रोटा/एच-२४४२[५०००+४०-२-२०१३]-१

अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई (२५ प्रती),
संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई, (५० प्रती)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १०प्रती),
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण कुटीर क्र.३ व ४,
मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
अधिदान व लेखा कार्यालय आवार, मंत्रालयासमोर, मुंबई,
मंत्रालयातील सर्व विभाग,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
शिक्षण संचालक(उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे (२० प्रती),
शिक्षण संचालक(माध्य.शिक्षण), महाराष्ट्र राज्य,पुणे (२० प्रती)
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),
कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ , परभणी (१० प्रती),
कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),
कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती),
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

-----------

**असुधारित वेतनश्रेणीत निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्ती वेतनघेणा-या निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतन धारकांनादि.०१ जुलै, २०१२ ते दि.३१ ऑक्टोबर, २०१२ या कालावधीतील निवृत्तिवेतन/कुटुंबनिवृत्ति वेतनावरील महागाई वाढीची थकबाकी देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
शासन निर्णय, क्रमांक: निमवा-२०१३/प्र.क्र.०४/सेवा-४,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२, दिनांक : २० मार्च, २०१३.

*पहा :-* १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक निमवा-२०१३/प्र.क्र.०४/सेवा-४, दिनांक २३ जानेवारी, २०१३.

**निर्णय**

संदर्भाधिन दिनांक २३ जानेवारी, २०१३ च्या शासन निर्णयानुसार असुधारित वेतनश्रेणीत निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन घेणा-या राज्य शासकीय निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना त्यांच्या मूळ निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन आणि महागाई निवृत्तिवेतन/महागाई कुटुंब निवृत्तिवेतन (असल्यास) यांच्या एकूण रकमेवर दिनांक ०१ जुलै, २०१२ पासून अनुज्ञेय महागाई वाढीचा दर **१३९ % वरुन १५१%** करण्यात आला आहे. सदर महागाई वाढीची रक्कम दि.०१ नोव्हेंबर, २०१३ पासून रोखीने देण्यात आली आहे.

२. शासन असा आदेश देत आहे की, असुधारित वेतनश्रेणीत निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन घेणा-या राज्य शासकीय निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना त्यांच्या मूळ निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन आणि महागाई निवृत्तिवेतन /महागाई कुटुंब निवृत्तिवेतन (असल्यास) यांच्या एकूण रकमेवर दि. ०१ जुलै, २०१२ ते दि.३१ ऑक्टोबर, २०१२ या कालावधीतील महागाई वाढीची रक्कम रोखीने देण्यात यावी.

३. प्रत्येक वैयक्तिक प्रकरणी देय होणाऱ्या महागाई वाढीच्या रकमेची परिगणना करण्याची जबाबदारी ही निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकारी म्हणजे यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांची राहील.

४. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तिवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यांमधील निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांना वरील निर्णय, ***योग्य त्या फेरफारांसह,*** लागू राहील.

५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांनाही लागू राहील.

६. ज्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी सरकारी क्षेत्रातील उपक्रमांमध्ये/स्वायत्त संस्थांमध्ये/स्थानिक संस्था इत्यादींमध्ये स्वत:ला सामावून घेतल्यानंतर एक रकमी ठोक रक्कम स्वीकारलेली आहे, व जे निवृत्तिवेतनाच्या १/३ इतका अंशराशीकृत भाग पुन:स्थापित करण्यासाठी तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-निअंक १०९९/३०६/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ अनुसार अंशराशीकृत रकमेच्या सुधारणेस पात्र ठरले आहेत, अशा कर्मचाऱ्यांनाही, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: निअंक १००१/५०/सेवा ४, दिनांक ९ एप्रिल २००१ च्या तरतुदीनुसार त्यांच्या पूर्ण निवृत्तिवेतनावर, वरील परिच्छेद-१ मध्ये विहित केलेल्या दिनांकापासून व विहित दराने महागाई वाढ अनुज्ञेय राहील.

७. यासंबंधीचा खर्च वरील परिच्छेदांत नमूद केलेल्या निवृत्तिवेतनधारकांची निवृत्तिवेतने ज्या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या शीर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

८. शासनाने वेळोवेळी मंजूर केलेल्या निवृत्तिवेतनावरील महागाई वाढी देण्याबाबतचे सध्या अस्तित्वात असलेले सर्व आदेश, ***योग्य त्या फेरफारांसह,*** आता मंजूर केलेल्या महागाई वाढीस देखील लागू राहतील.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१३०३२०१४११३६७६०५ असा आहे.

१०. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

(७)



महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

र.आ.नागरगोजे
शासनाचे अवर सचिव

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१००० प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा) -III, महाराष्ट्र (५ प्रती)
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई (२५ प्रती),
संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,(१० प्रती)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १०प्रती),
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
*विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
*प्रबंधक,, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा) मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा),मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई/नागपूर/औरंगाबाद
मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)
सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबइ
सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग,गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डींग), पोट माळा, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
ग्रं थपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
कार्याध्यक्ष, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, १४४९, सदाशिव पेठ, संकल्प खजिना महाल बोळ, एस.पी.कॉलेज समोर, पुणे ४११ ०३०
अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट गव्हर्नमेंट पेंशनर्स असोसिएशन, बेळगांव
मंत्रालयातील सर्व विभाग,
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१००० प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५प्रती),
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),
कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ , परभणी (१० प्रती),
कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),
कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेर, जिल्हा रायगड (१० प्रती),
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती),
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

---

*पत्राद्वारे.

सामान्य प्रशासन
शा. नि. शा. ६
२३/०४/२०१३

(४)

दि.१ जुलै,२०१२ ते दि.३१ ऑक्टोबर,२०१२ या कालावधीतील निवृत्तिवेतन/ कुटुंब निवृत्तिवेतनावरील महागाई वाढीची थकबाकी देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**

शासन निर्णय, क्रमांक: निमवा-२०१२/प्र.क्र.९०/सेवा-४,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२, दिनांक : १६ मार्च, २०१३.

*पहा :- शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक* निमवा-२०१२/प्र.क्र.९०/सेवा-४, दिनांक ०९ नोव्हेंबर, २०१२.

## निर्णय

संदर्भाधिन दिनांक ०९ नोव्हेंबर, २०१२ च्या शासन निर्णयानुसार राज्य शासकीय निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना त्यांच्या मूळ निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन आणि महागाई निवृत्तिवेतन /महागाई कुटुंब निवृत्तिवेतन (असल्यास) यांच्या एकूण रकमेवर दि. ०१ जुलै, २०१२ पासून अनुज्ञेय महागाई वाढीचा दर ६५% वरुन ७२% करण्यात आला आहे. सदर महागाई वाढीची रक्कम दि.०१ नोव्हेंबर, २०१२ पासून रोखीने देण्यात आली आहे.

२. शासन असा आदेश देत आहे की, राज्य शासकीय निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना त्यांच्या मूळ निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन आणि महागाई निवृत्तिवेतन /महागाई कुटुंब निवृत्तिवेतन (असल्यास) यांच्या एकूण रकमेवर दि. ०१ जुलै, २०१२ ते दि.३१ ऑक्टोबर, २०१२ या कालावधीतील महागाई वाढीची रक्कम रोखीने देण्यात यावी.

३. प्रत्येक वैयक्तिक प्रकरणी देय होणाऱ्या महागाई वाढीच्या रकमेची परिगणना करण्याची जबाबदारी ही निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकारी म्हणजे यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांची राहील.

४. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तिवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यांमधील निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांना वरील निर्णय, *योग्य त्या फेरफारांसह,* लागू राहील.

५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांनाही लागू राहील.

६. ज्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी सरकारी क्षेत्रातील उपक्रमांमध्ये/स्वायत्त संस्थांमध्ये/स्थानिक संस्था इत्यादींमध्ये स्वत:ला सामावून घेतल्यानंतर एक रकमी ठोक रक्कम स्वीकारलेली आहे, व जे निवृत्तिवेतनाच्या १/३ इतका अंशराशीकृत भाग पुन:स्थापित करण्यासाठी तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-निअंक १०९९/३०६/सेवा-४, दिनांक २५ नोव्हेंबर १९९९ अनुसार अंशराशीकृत रकमेच्या सुधारणेस पात्र ठरले आहेत, अशा कर्मचाऱ्यांनाही, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: निअंक १००१/५०/सेवा ४, दिनांक ९ एप्रिल २००१ च्या तरतुदीनुसार त्यांच्या पूर्ण निवृत्तिवेतनावर, वरील परिच्छेद-१ मध्ये विहित केलेल्या दिनांकापासून व विहित दराने महागाई वाढ अनुज्ञेय राहील.

७. यासंबंधीचा खर्च वरील परिच्छेदांत नमूद केलेल्या निवृत्तिवेतनधारकांची निवृत्तिवेतने ज्या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या शीर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

८. शासनाने वेळोवेळी मंजूर केलेल्या निवृत्तिवेतनावरील महागाई वाढी देण्याबाबतचे सध्या अस्तित्वात असलेले सर्व आदेश, *योग्य त्या फेरफारांसह,* आता मंजूर केलेल्या महागाई वाढीस देखील लागू राहतील.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१३०३१६१४२३५०७३०५ असा आहे.

१०. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स्वाक्षरी)

र.आ.नागरगोजे
शासनाचे अवर सचिव

रोटT/एच-२८२२[८०००+४०-३-२०१३]-१

(७)



प्रत,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१००० प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई (२५ प्रती),
संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,(१० प्रती)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी,
नवी मुंबई (१० प्रती)
मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १०प्रती),
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक
(प्रत्येकी १५ प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
*विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
*प्रबंधक,, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा) मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा),मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई/नागपूर/औरंगाबाद
मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)
सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ला मजला,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
ग्रं थपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान
भवन, मुंबई - ४०० ०३२. (१० प्रती)
कार्याध्यक्ष, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, १४४९,
सदाशिव पेठ, 'संकल्प' खजिना महाल बोळ, एस.पी.कॉलेज
समोर, पुणे ४११ ०३०
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय
विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
मंत्रालयातील सर्व विभाग,
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१००० प्रती)
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५प्रती),
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व
कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ ती),
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर
(१० प्रती),
कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी (१० प्रती),
कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),
कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),
कुल सचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर (१०
प्रती),
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे, जिल्हा
रायगड (१० प्रती),
बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १ (५ प्रती)
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं.१, योगक्षेम
समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईंट , मुंबई २० (५ प्रती)
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन,
एस.व्ही.पटेल रोड,, मुंबई ४ ( ५ प्रती)
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल,
ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३ (५प्रती)
इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक
भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५ (५ प्रती )
नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन
पॉईंट, मुंबई २१ ( ५ प्रती )
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८ (५ प्रती)
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

*पत्राद्वारे.

(6)

सामान्य प्रशासन
क्र. नि.आ. ७
22/08/2013

शासकीय निवासस्थानाचा ताबा असल्यास उपदानाची रक्कम रोखून ठेवण्याबाबत

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

### शासन निर्णय क्रमांकः सेनिवे २०१२/प्र.क्र.८९/सेवा-४

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

तारीख: दिनांक : १६ फेब्रुवारी, २०१३

**<u>प्रस्तावना —</u>**

महाराष्ट्र नागरी सेवा(निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १३३(५) मध्ये शासकीय निवासस्थानाशी संबंधित असलेल्या येणे रकमांचे समायोजन व वसूलीबाबत पुढीलप्रमाणे तरतुद आहे :

'एखादया विशिष्ट प्रकरणी, कार्यकारी अभियंत्याला शिल्लक राहिलेल्या लायसन्स फीची रक्कम निर्धारित करणे शक्य नसेल तर, तो कार्यकारी अभियंता, उपदानाच्या दहा टक्के रक्कम किंवा रुपये एक हजार यांपैकी जी कमी असेल तेवढी रक्कम पुढील सूचना देण्यात येईपर्यंत, रोखून ठेवण्याबाबत कार्यालय प्रमुखाला कळवील'.

केंद्र शासनाच्या पेन्शन तथा कार्मिक मंत्रालयाच्या दि.१९.०४.२०१० च्या कार्यालयीन ज्ञापनान्वये उपदानाची दहा टक्के रक्कम रोखून ठेवावी असा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या या कार्यालयीन ज्ञापनाच्या अनुषंगाने शासकीय निवासस्थानाशी संबंधित असलेल्या येणे रकमांचे समायोजन व वसूलीबाबत असलेल्या रकमेमध्ये बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय—

२. याबाबत शासन आता असा निर्णय घेत आहे की : अ) शासकीय निवासस्थानाशी संबंधित असलेल्या येणे रकमांचे समायोजन व वसूलीच्या अनुषंगाने उपदानाच्या दहा टक्के रक्कम रोखून ठेवण्यात येईल. ब) हा शासन निर्णय आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू राहील. क) दि.०१.०१.२००६ ते

शासन निर्णयाच्या दिनांकापुर्वीची प्रकरणे या सुधारणेनुसार वित्त विभागाच्या मान्यतेने निकाली काढण्यात येतील.

३. महाराष्ट्र नागरी सेवा(निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १३३ (५) च्या विद्यमान तरतुदींमध्ये या शासन निर्णयाच्या तरतुदींपुरती सुधारणा करण्यात आली आहे असे मानण्यात यावे. या नियमात रीतसर सुधारणा यथावकाश करण्यात येईल.

४. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृतीवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषित्तरे विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यामधील निवृतीवेतनधारक यांना वरील निर्णय, योग्य त्या फेरफारासह लागू राहतील.

५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधीचे इतर सर्व अधिकार याचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तिवेतनधारक यांनाही लागू राहतील.

६. सदर शासन निर्णयाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०२१६१२५५३२२१०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nagareoje Raghunath

Digitally signed by Nagareoje Raghunath
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=FD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Nagareoje Raghunath
Date: 2013.02.16 16:10:57 +05'30'

(र.आ.नागरगोजे)

शासनाचे अवर सचिव

प्रत,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१००० प्रती),

२) महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),

३) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),

४) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई (२५ प्रती),

५) संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,(१० प्रती)

६) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),

७) उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,

८) मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १०प्रती),

९) वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),

१०) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),

११) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),

१२) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई

१३) राज्यपालांचे सचिव,

१४) मुख्य मंत्र्यांचे सचिव,

१५) उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,

१६) सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,

१७) *विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,

१८) *प्रबंधक,, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा) मुंबई,

१९) *प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा),मुंबई,

२०) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

२१) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

२२) *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

२३) *प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई/नागपूर/औरंगाबाद

२४) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.

२५) आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)

२६) सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२

२७) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

२८) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ संचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२. (१० प्रती)

२९) कार्याध्यक्ष, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, १४४९, सदाशिव पेठ, 'संकल्प'

३०) खजिना महाल बोळ, एस.पी.कॉलेज समोर, पुणे ४११ ०३०

३१) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),

३२) शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),

३३) उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),

३४) कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),

३५) मंत्रालयातील सर्व विभाग,

३६) महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१००० प्रती)

३७) महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५प्रती),

३८) मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,

३९) सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),

४०) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),

४१) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष

४२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),

४३) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),

४४) तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),

४५) सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती), संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),

४६) सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),

४७) सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),

४८) शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,

४९) सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),

५०) सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),

५१) सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),

५२) कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),

५३) कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ , परभणी (१० प्रती),

५४) कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),

५५) कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),

५६) कुल सचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर (१० प्रती),

५७) कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेर, जिल्हा रायगड (१० प्रती),

५८) बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १ (५ प्रती)

५९) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं. १,योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईंट , मुंबई २० (५ प्रती)

६०) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड,, मुंबई ४ ( ५ प्रती)

६१) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी , मुंबई १३ (५ प्रती)

६२) इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५ (५ प्रती)

६३) नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई २१ ( ५ प्रती)

६४) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८ (५ प्रती)

६५) वित्त विभागातील सर्व कार्यासने,

६६) निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

*पत्राद्वारे.

सामान्य प्रशासन
शा.नि.शा.
२३/०४/१३

सहाव्या वेतन आयोगाच्याअनुषंगाने
दिनांक १ जानेवारी, २००६ नंतरच्या
निवृत्ती वेतनधारकांना /
कुटुंबनिवृत्ती वेतनधारकांना द्यावयाच्या
निवृत्तीवेतनाबाबत

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांकः सेनिवे २०१०/प्र. क्र.१३/सेवा ४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
तारीख: १६फेब्रुवारी, २०१३

वाचा —

१) शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक :सेनिवे १००९/प्र. क्र.३३/सेवा ४,दिनांक ३० ऑक्टोबर,२००९

२) शासन शुध्दीपत्रक, वित्त विभाग क्रमांक :सेनिवे १००९/प्र. क्र.३३/सेवा ४,दिनांक १५ डिसेंबर, २००९

शासन निर्णय—

दिनांक १.१.२००६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या/होणा-या/मृत पावलेल्या ज्या प्रकरणांत निवृत्तीवेतनधारक /कुटुंब निवृत्तीवेतनधारकांचे निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन सहाव्या वेतन आयोगानुसार रु.१९१३/- पेक्षा कमी निश्चित होईल, अशा सर्व प्रकरणांत संबंधितांना रु.१९१३/- एवढे निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सदर शासन निर्णयाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०२१६१२२५३४४१०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nagareoje Raghunath

Digitally signed by Nagareoje Raghunath
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=FD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Nagareoje Raghunath
Date: 2013.02.16 16:04:39 +05'30'

र.आ.नागरगोजे

शासनाचे अवर सचिव

प्रत,

१) राज्यपालांचे सचिव,

२) मुख्य मंत्र्यांचे सचिव,

३) उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,

४) सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव

५) *प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,

६) *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,

७) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

८) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

९) *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

१०) *प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण कुटीर क्र.३ व ४,

११) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.

१२) *महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१०००प्रती),*

१३) महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१००० प्रती),

१४) महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),

१५) *महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),*

१६) मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,

१७) सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),

१८) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),

१९) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई (२५ प्रती),

२०) *संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई, (५० प्रती)*

२१) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),

२२) उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,

२३) मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १०प्रती),

२४) वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),

२५) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),

२६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),

२७) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई

२८) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.

२९) अधिदान व लेखा कार्यालय आवार, मंत्रालयासमोर, मुंबई,

३०) मंत्रालयातील सर्व विभाग,

३१) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,

३२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),

३३) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष

३४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),

३५) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),

३६) तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),

३७) संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),

३८) सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),

३९) सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),

४०) शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,

४१) सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),

४२) सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),

४३) सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),

४४) कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),

४५) कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ , परभणी (१० प्रती),

४६) कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),

४७) कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),

४८) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती),

४९) शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),

५०) उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),

५१) कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),

५२) वित्त विभागातील सर्व कार्यासने,

५३) निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

सामान्य प्रशासन
शा. नि. शा. २
२३।०४।९३



शासकीय अधिकारी/कर्मचारी, आहरण व संवितरण अधिकारी तसेच मागणीदार/ पुरवठादार/कंत्राटदार/फर्म यांना कोषागारांमार्फत करण्यात येणारी प्रदाने इसीएस/इएफटी/एनईएफटीमार्फत प्रत्यक्ष बँक खात्यात जमा करण्यासाठी केंद्रीकृत आदात्याची यादी (Central Payee Master) तयार करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग,**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १०१० / प्र. क्र. ६८ / भाग - ३/ कोषा प्र ५,
दिनांक :- ४ मार्च, २०१३.

**परिपत्रक:** शासनाच्या विविध विभागांमार्फत कंत्राटदार/पुरवठादार/मागणीदार/फर्म यांना त्यांनी केलेल्या वस्तू व सेवाच्या/ पुरवठयाबाबत प्रदाने करण्यात येतात. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना सर्व प्रदाने ईसीएस/ईएफटी/एनईएफटी या सुविधेद्वारे करण्याच्या सूचना या पुर्वीच निर्गमित झाल्या आहेत. मात्र आता कोषागारांतून पुरवठादार/कंत्राटदार/मागणीदार/फर्म यांना केली जाणारी प्रदाने ई-प्रदान प्रणालीचा (इसीएस/इएफटी/एनइएफटी) वापर करुन प्रत्यक्ष पुरवठादाराच्या बँक खात्यात करण्यासाठी केंद्रीकृत प्राप्तकर्त्यांची यादी (Central Payee Master) तयार करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. अशी यादी तयार करण्यासाठी सर्व शासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी, आहरण व संवितरण अधिकारी तसेच त्यांच्याकडील कंत्राटदार/पुरवठादार/मागणीदार यांचा बँक खात्याचा तपशील व इतर अनुषंगिक आवश्यक माहिती एकत्रित करणे आवश्यक आहे. त्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

**<u>आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावयाची कार्यवाही</u>**

१) प्रथम आहरण व संवितरण अधिकारी, सोबत जोडलेल्या नमुना-अ मध्ये ज्या पुरवठादारांना रक्कम प्रदान करावयाची आहे, त्यांची माहिती उपलब्ध करुन घेतील. आहरण व संवितरण अधिकारी यांनी कंत्राटदारास पुरवठा आदेश किंवा कार्यादेश देते वेळीच सदर नमुना-अ पुरवठादारास देऊन माहिती संकलनाची कार्यवाही सुरु करावी. **नमुना अ** अन्वये प्राप्त केलेली माहिती कोषागारातील प्रणालीमध्ये सामाविष्ठ करण्याकरीता सध्या अस्तित्वात असलेल्या **बीम्स** (अर्थसंकल्पीय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणाली-BEAMS) या प्रणालीवर आहरण व संवितरण अधिकाऱ्याच्या Final Login मध्ये Maintenance या मेनू अंतर्गत Add Payee Proposal नावाने Link उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे सदर पर्यायाखाली उपलब्ध आदाता नोंदणीसाठीच्या अर्जा मध्ये **नमुना-अ** मध्ये प्राप्त झालेली सर्व माहिती आहरण व संवितरण अधिकारी यांनी भरुन Submit केल्यानंतर **आदाता नोंदणी आवेदन** (Payee Registration Application) तयार होते ते मुद्रीत करुन, **नमुना अ** च्या मुळ प्रतीसह संबंधित जिल्हा कोषागारात सादर करावे. (नमुना-अ ची छायांकित प्रत आहरण व संवितरण अधिकारी यांनी स्वतःकडे ठेवावी)

(७८)



## कोषागार कार्यालयाने करावयाची कार्यवाही

२) आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडून आदाता नोंदणी आवेदन मूळ प्रतीत प्राप्त झाल्यानंतर कोषागार अधिकारी यांनी अर्थवाहिनी या संकेतस्थळावर Payee या पर्यायाअंतर्गत Verify Payee Details मध्ये त्यांच्याकडे आदाता नोंदणीकरणासाठी प्रलंबित आवदने पाहावी. मुळ प्रतीतील आदाता नोंदणी आवेदनाची Online प्राप्त झालेल्या माहितीबरोबर पडताळणी करुन सदरचा अर्ज Approve करावा. त्यानंतर संबंधित आदात्यास कोषागार व DDO निहाय एकमेवाद्वितीय (Unique) १६ अंकी आदाता नोंदणी क्रमांक (Payee Registration Number) प्रणालीमार्फत प्रदान करण्यात येईल व तसे **आदाता नोंदणी प्रमाणपत्र** (Payee Registration Certificate) तयार होईल. कोषागाराने ते मुद्रीत करुन आहरण व संवितरण अधिकारी यांच्या मार्फत संबधित आदात्यास दयावे (हा क्रमांक १६ अंकी असेल. त्यातील पहिले ४ अंक जिल्हा कोषागार संकेतांक, नंतरचे ६ अंक आहरण व संवितरण अधिकारी संकेतांक व पुढील ६ अंक हे अनुक्रमांक दर्शवतिल) त्यानंतर कोषागारात सादर करण्यात येणाऱ्या संबंधित पुरवठादाराच्या सर्व देयकांवर त्याच्या आदाता नोंदणी क्रमांकाची नोंद करण्यात यावी.

३) आहरण व संवितरण अधिकारी यांची माहिती सध्या Central Payee Master मध्ये उपलब्ध नसल्यामुळे सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी सुध्दा आदाता म्हणून स्वत:ची माहिती प्रस्तुत पध्दतीनेच कोषागाराकडे सादर करुन आदाता नोंदणी क्रमांक प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. ही कार्यवाही आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी एकदाच करावयाची आहे.

४) एकच पुरवठादार एका जिल्हयातील अनेक आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना वस्तू व सेवा यांचा पुरवठा करत असण्याची शक्यता आहे. तथापि एकाच बँकखाते क्रमांकासाठी एकाच जिल्हयात दोन आदाता नोंदणी क्रमांक निर्माण होणार नाहीत त्यामुळे एखादया जिल्हयात आदात्याच्या/प्राप्तकर्त्याच्या बँकखाते क्रमांकाची नोंदणी प्रणालीवर एकदा झाल्यानंतर पुन्हा त्याच जिल्हयात त्याच बँकखाते क्रमांकाने आदाता नोंदणी करण्याचा प्रयत्न केल्यास सदर आदाता यापुर्वीच नोंदणीकृत असल्याबाबतचा संदेश सदर पुरवठादाराच्या आदाता नोंदणी क्रमांकासह प्रणालीवर दिसेल. सदरचा आदाता नोंदणी क्रमांकच संबंधित पुरवठादाराच्या कोषागारात सादर करण्यात येणाऱ्या देयकांवर नमुद करण्यात यावा. एकच पुरवठादार/कंत्राटदार एकापेक्षा जास्त जिल्हयात वस्तु व सेवा पुरवित असल्यास प्रत्येक जिल्हयात त्याला एकाच खाते क्रमाकावर वेगवेगळा आदाता क्रमांक प्राप्त होईल.

५) उपकोषागार स्तरावर आदाता नोंदणी क्रमाक निर्माण करण्यासाठी देखील प्रस्तुत कार्यपध्दतीचाच अवलंब करण्यात येईल. मात्र उपकोषागारामध्ये देयके सादर करणाऱ्या आहरण व संवितरण अधिकारी यांनी उपरोक्त परिच्छेद क्रमांक १ प्रमाणे कार्यवाही पूर्ण केल्यानंतर **आदाता नोंदणी आवेदन** संबंधीत उपकोषगारामार्फत जिल्हा कोषागाराकडे पाठवावे. त्या वर जिल्हा कोषागार कार्यलयाकडुन परिच्छेद २

(२०)



प्रमाणे कार्यवाही होऊन **आदाता नोंदणी प्रमाणपत्र** निर्गमित केले जाईल सदर क्रमांक जिल्हा कोषागारासह त्या जिल्हयातील इतर कोणत्याही उपकोषागारात ग्राहय धरण्यात येईल.

सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या संदर्भासाठी व सोयीसाठी जिल्हानिहाय सर्व नोंदणीकृत आदात्यांची आवश्यक ती सर्व तपशीलवार माहिती **बीम्स** या प्रणालीवरील MIS या मेनू मध्ये Existing Registered Payee या पर्यायाअंतर्गत पहावयास मिळेल. याशिवाय बीम्स प्रणालीवर Bill Entry Module मध्ये त्या जिल्हयातील सर्व नोंदणीकृत आदात्यांची यादी दिसेल. त्यातून त्यांनी आदात्याची निवड करावी.

प्राप्तकर्त्यांची केंद्रीकृत यादी तयार करण्याचे काम पुर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष आदाता/प्राप्तकर्त्यांच्या खात्यात NECS/NEFT द्वारे रक्कमा जमा करण्याची कार्यवाही सुरु करण्यात येईल. त्याबातच्या सूचना यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

सदर शासन निर्णय शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याच्या संगणक संकेतांक २०१३०३०४१६३९०२०८०५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(अ. म. जाधव)
कार्यासन अधिकारी

प्रति,

राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
प्रधान सचिव, वन विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
महालेखापाल (ले. व अ.) - १, महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल (ले. व अ.) - २, महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल (लेखा परीक्षा) - १, महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल (लेखा परीक्षा) - २, महाराष्ट्र, नागपूर
प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा), मुंबई
प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
महा व्यवस्थापक, लोक लेखा विभाग, भारतीय रिझर्व्ह बँक, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ (पत्राने)
महा व्यवस्थापक, भारतीय स्टेट बँक, स्थानिक प्रधान कार्यालय, प्लॉट क्रमांक सी - ६, जी ब्लॉक, वांद्रे - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१ (पत्राने)
उप महा व्यवस्थापक, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, प्रादेशिक कार्यालय, टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद (पत्राने)
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
सह संचालक, लेखा व कोषागारे, पुणे / नाशिक / औरंगाबाद/अमरावती/नागपूर/कोकण, नवी मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व उप कोषागार अधिकारी
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, कोषा प्र ५

*****

(21)



(शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १०१० / प्र. क्र. ६८ / भाग - ३/ कोषा प्र ५,दिनांक :- ४ मार्च, २०१३ चे सहपत्र)

# Payee Registration Application
## आदाता नोंदणी आवेदन

Mobile No. :
भ्रमणध्वनी क्रमांक :

To,
प्रति,
Treasury Officer,
कोषागार अधिकारी,
Mumbai.

Subject : Approval for Payee Registration.
विषय : आदाता नोंदणी स्वीकृतीबाबत.

Respected Sir/Madam,
आदरणीय महोदय/महोदया,

Details of Registrered Payee are as follows.
आदाता नोंदणी बाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| Treasury Code : कोषागार संकेतांक | : |
| DDO Code : आहरण व संवितरण अधिकारी संकेतांक | : |
| Payee Registration Number : आदाता नोंदणी संकेतांक | : |
| Payee Type (DDO/other) : आदात्याचा प्रकार (आ. व स. अ./अन्य) | : |
| Payee Name : आदात्याचे नाव | : |
| Payee Address : आदात्याचा पत्ता | : |
| Pin Code No. : पिन कोड क्रमांक | : |
| PAN/TAN No. : पॅन/टॅन नंबर | : |
| UID No. : आधार ओळख पत्र क्रमांक | : |
| E-mail id : ई-मेल पत्ता | : |
| Telephone No. : दुरध्वनी क्रमांक | : |
| Bank Name : बँकेचे नाव | : |
| Branch Name : बँक शाखेचे नाव | : |
| IFSC : आय एफ एस संकेतांक | : |
| MICR Code : एम आय सी आर क्रमांक | : |
| Bank Account No. : बँक खाते क्रमांक | : |
| Account Type (SB/CA/CC) : खाते प्रकार (बचत/चालू/रोख) | : |

You are requested to register the above payee for receiving payment from your Treasury. The cancelled Cheque of above account is enclosed herewith for confirmation of Bank details.

आपल्या कोषागारातून प्रदान प्राप्त करण्यास या अदात्याची नोंदणी करण्यात यावी हि विनंती. बँकेच्या तपशिलाची खात्री करण्यासाठी आदात्याच्या खात्याचा रद्द केलेला धनादेश सोबत जोडला आहे.

Date : दिनांक :- / /
Place : ठिकाण :-

Designation of the DDO.

-----

सामान्य - प्रशासन
प्र. वि.-प्रा. ९०
२२/०४/१३

(६२९)

**Cash Management Project (CMP)**
**या सुविधेद्वारे थेट आदात्याच्या खात्यामध्ये रक्कम जमा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १०१०/प्र. क्र. ६८/भाग - ३/कोषा प्र ५,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक :- २२ जानेवारी, २०१३

**संदर्भ:-** १) शासन निर्णय वित्त विभाग क्र.संकीर्ण-१०१०/प्र.क्र.६८/कोषा प्र-५, दिनांक २३/१२/२०१०
२) शासन निर्णय वित्त विभाग क्र.संकीर्ण-१०१०/प्र.क्र.६८/कोषा प्र-५, दिनांक १८/०४/२०११

**प्रस्तावना:-** शासनाच्या विविध विभागांमार्फत कंत्राटदार /पुरवठादार/अनुदान प्राप्त संस्था यांना त्यांनी केलेल्या वस्तू व सेवा यांच्या पुरवठयाप्रति प्रदान करण्यात येते. संदर्भांकित शासन निर्णयान्वये आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी त्या संबंधित पुरवठादाराच्या / कर्मचाऱ्याच्या खात्यात इलेक्ट्रॉनिक वितरण पध्दतीने जमा प्रदाने करण्याबाबत सूचना निर्गमित झाल्या होत्या. तथापि, सदर कार्यप्रणालीची अद्यापही निग्रहपूर्वक अंमलबजावणी होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, त्यामुळे आदात्यांना सत्वर रक्कम मिळण्यास विलंब होतो तसेच आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या बँक खात्यात हा निधी विनावापर पडून राहतो. परंतू यापुढे कोषागारातून होणारी प्रदाने, आहरण व संवितरण अधिकाऱ्यांमार्फत मागणीदारांची प्रदाने ई-प्रदान प्रणालींचा (ECS/NEFT/EFT) वापर करुन थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा करणे शक्य झाले आहे.

अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई, कोषागार कार्यालय, नागपूर व मराठवाडा विभागातील कोषागार कार्यालये वगळता राज्यातील सर्व कोषागार / उपकोषागार यांच्यामार्फत होणारी सर्व प्रदाने स्टेट बँक ऑफ इंडीया यांच्याकडून पुरविलेल्या Cash Management Product (CMP) या सुविधेद्वारे करण्याचे शासनाने ठरविले आहे. त्यास अनुसरुन यापुढे खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-** कोषागारातून पुरवठादार / कंत्राटदार यांना केली जाणारी प्रदाने थेट आदात्याच्या बँक खात्यात जमा होण्यासाठी प्रत्येक कार्यालयाने त्यांच्या प्राप्तकर्त्याची केंद्रीकृत यादी तयार करणे आवश्यक आहे. अशी यादी तयार करण्यासाठी बीम्स प्रणालीमध्ये आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या Draft Mode मध्ये Maintainance या मेनूमध्ये Add Payee Proposal अशा प्रकारची जोडणी (link) देण्यात आली आहे. सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडील पुरवठादार / कंत्राटदार / अनुदानीत संस्था यांची माहिती घेऊन ती उपरोक्त नमूद लिंक मध्ये भरावी व ती कोषागार/उपकोषागाराकडून मान्य करुन घेऊन आदाता नोंदणी क्रमांक PRN (Payee Registration Number) प्राप्त करुन घ्यावा.

सर्व आहरण व संवितरण अधिकारी तसेच त्यांचे आदाते पुरवठादार / कंत्राटदार/अनुदानीत संस्था यांना आदाता नोंदणी क्रमांक प्राप्त झाल्यानंतर CMP मार्फत प्रदान करण्यासाठी कोषागारात सादर होणारी सर्व देयके ही आहरण व संवितरण अधिकारी / आदाता यांचा आदाता नोंदणी क्रमांक देयकावर नमूद करणे आवश्यक आहे. तद्नंतर कोणतेही देयक कोषागारात सादर केल्यानंतर देयक लेखापरिक्षणात पारित झाल्यानंतर आहरण व संवितरण अधिकारी यांच्या नावे धनादेश /EFT न देता थेट आदात्याच्या (आहरण व संवितरण अधिकारी किंवा मागणीदार / पुरवठादार / कंत्राटदार) बँक खात्यात CMP प्रणालीद्वारे जमा करण्यात येईल. तथापि, कोषागार कार्यालयांकडून लेखा परिक्षणात पारित झालेल्या देयकांची स्टेट बँकेच्या

संकेतस्थळावरील E-Payment File संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्याने CMP Portal ला Login करुन स्विकृत करणे आवश्यक राहील.

सोबत जोडलेल्या जोडपत्रांप्रमाणे आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी आणि कोषागार कार्यालयांनी कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त कार्यपध्दती ज्या जिल्हयांमध्ये भारतीय स्टेट बँक महाराष्ट्र शासनाचे आर्थिक व्यवहार हाताळत आहे, अशा जिल्हयांमध्ये सोबतच्या परिशिष्ठ 'अ' मध्ये दर्शविलेल्या वेळापत्रकाप्रमाणे राबविण्यात यावी.

सदर शासन निर्णय शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याच्या संगणक संकेतांक २०१३०१२२१५१९५१०१०५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अ.म. जाधव)
कार्यासन अधिकारी

**प्रति,**

राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
प्रधान सचिव, वन विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
महालेखापाल (ले. व अ.) - १, महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल (ले. व अ.) - २, महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल (लेखा परीक्षा) - १, महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल (लेखा परीक्षा) - २, महाराष्ट्र, नागपूर
प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा), मुंबई
प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
महा व्यवस्थापक, लोक लेखा विभाग, भारतीय रिझर्व्ह बँक, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ (पत्राने)
महा व्यवस्थापक, भारतीय स्टेट बँक, स्थानिक प्रधान कार्यालय, प्लॉट क्रमांक सी - ६, जी ब्लॉक, वांद्रे - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१ (पत्राने)
उप महा व्यवस्थापक, स्टेट बॅक ऑफ हैद्राबाद, प्रादेशिक कार्यालय, टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद (पत्राने)
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
सह संचालक, लेखा व कोषागारे, पुणे / नाशिक / औरंगाबाद/अमरावती/नागपूर/कोकण, नवी मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व उप कोषागार अधिकारी
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, कोषा प्र ५

*****

(शासन निर्णय क्र. संकीर्ण १०१०/प्र. क्र. ६८/भाग - ३/कोषा प्र ५, दिनांक २२ जानेवारी, २०१३ चे जोडपत्र)

## आहरिका

### अ) CMP प्रणाली संदर्भात आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी अनुसरावयाची कार्यपध्दती.

१) भारतीय स्टेट बॅकेने CMP Cash Management Product (CMP), हे सुरक्षित संकेतस्थळ विकसित केले असून ते प्रस्तावित कार्यपध्दतीमध्ये electronic Payment Gateway म्हणून काम करेल. हे संकेतस्थळ **URL-https:/www.sbicmp.co.in/mahakosh** असे आहे.

२) राज्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचे युजर आयडी/पासवर्ड हे CMP मार्फत तयार करुन संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना बंद लिफाफ्यामधून कोषागार कार्यालयामार्फत वितरित करण्यात येतील.

३) युजर आय डी व पासवर्ड प्राप्त होताच आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी लॉग-इन करावे. प्रथम लॉग-इन केल्यानंतर संबंधित कोषागाराकडून देण्यात आलेला पासवर्ड त्यांनी स्वत: बदलणे सक्तीचे आहे तसेच त्याचवेळी त्यांची माहिती (User Profile) अद्ययावत करणे अनिवार्य आहे.

४) ही माहिती अद्ययावत करताना कार्यालयाचा परिपुर्ण/अद्ययावत पत्ता, आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचा भ्रमणध्वनी, दुरध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी इत्यादी माहिती अचूकपणे भरावी. या माहितीच्या आधारे CMP मार्फत देयकांची स्थिती एसएमएस, ई-मेल द्वारे कळविण्यात येणार असल्याने ही माहिती अचूकपणे भरणे आवश्यक आहे.

५) सर्व त्रयस्थ आदात्यांची (मागणीदार, पुरवठादार, कंत्राटदार, अनुदानित संस्था) प्रदाने CMP मार्फत परस्पर संबंधितांच्या खात्यामध्ये जमा होणार असल्याने सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी सध्या त्यांच्याकडून प्रदान केले जाणारे कंत्राटदार/पुरवठादार (Third Party Payee) यांची **बीम्स** या प्रणालीमध्ये आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या (Final) लॉग-इन मधील Maintenance या पर्यायाअंतर्गत Add New Payee या पर्यायामधून नोंदणी करुन घ्यावी व प्रणालीमार्फत मुद्रीत आवेदन पत्र योग्य त्या कागदपत्रासह कोषागारास जमा करावे. प्रस्तावित (जे भविष्यात पुरवठा करणार आहेत ते) कंत्राटदार/पुरवठादारांची नोंदणीही **बीम्स** प्रणालीवर करण्यात यावी.

६) आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी प्रचलित पध्दतीप्रमाणे देयक तयार करुन व **बीम्स** प्रणालीवरील Payee Details मधून Payee निवडून BDS Slip सह देयके कोषागारास सादर करावीत. कोषागारांच्या नियामोचित लेखापरिक्षणानंतर देयक पारित झाल्यास संबंधित प्रदानांची माहिती कोषागारामार्फत CMP पोर्टलला अपलोड करण्यात येईल व संबंधितास CMP Advice Slip देण्यात येईल.

७) पारित देयकाची माहिती CMP पोर्टलला कोषागाराने अपलोड केल्यानंतर लगेचच CMP मार्फत संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना लघुसंदेश सेवा (SMS)/ ई-मेल द्वारे अशी सूचना/संदेश मिळेल. तथापि, तो संदेश प्राप्त झाला नाही तरी त्याची प्रतिक्षा न करता संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी आपले देयकाचे प्रदान आदेश CMP पोर्टलला प्राप्त झाले अथवा नाहीत याची वरचेवर पोर्टलला लॉग-इन करुन खात्री करणे अपेक्षित आहे.

८) आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना CMP पोर्टलला लॉग-इन करुन Pending Authorization या पर्यायावर Click केले असता कोषागाराने प्रदानार्थ संमत करुन CMP पोर्टलला पाठवलेल्या देयकांची यादी दिसेल. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी प्रत्येक देयकाचे प्रदान तपासून त्यास संमती द्यावयाची आहे, त्यासाठी त्यांनी यादीमधील देयक निवडावे व त्यामधील सर्व अदात्यांचा तपशील तपासून पहावा. विशेषत: खाते क्रमांक, नाव, रक्कम याबाबी बारकाईने तपासून एका देयकामधील सर्व प्रदाने योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर Verify या टॅबवर Click करावे. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी देयकांची माहिती Verify केल्यानंतर लगेचच CMP मार्फत थेट संबंधितांच्या खात्यामध्ये प्रदान वर्ग होणार आहे.

९) कोषागार अधिकाऱ्यांनी देयक क्रमांकाची माहिती CMP पोर्टलला पाठविल्यानंतर/अपलोड केल्यानंतर १० दिवसामध्ये आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना देयकाचे प्रदान तपासून प्राधिकृत करावे लागणार आहे. विहित कालावधीत प्रदान प्राधिकृत न केल्यास सदरचे प्रदान CMP प्रणालीवर अकार्यान्वित होईल व संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची पुढील देयके ट्रेझरीनेट प्रणालीमध्ये स्विकृत होणार नाहीत. अशा परिस्थितीत योग्य ती कारणमीमांसा करुन आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना कोषागार अधिकाऱ्यास लेखी कळवावे लागेल. त्यानंतर संबंधित कोषागार अधिकारी सदरचे देयक पुन्हा CMP प्रणालीवर कार्यान्वित करतील. असे कार्यान्वित केलेले देयक कामकाजाच्या पुढील दोन दिवसापर्यंतच कार्यान्वित राहील. त्या कालावधीत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना प्रथम CMP प्रणालीवरील देयकाचे प्रदान प्राधिकृत करावे लागेल, त्यानंतरच नविन देयक कोषागारामध्ये सादर करता येईल. या प्रक्रियेमध्ये वेळ लागणार असल्याने सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, CMP वरील प्रदाने यथाशिघ्र तपासून प्राधिकृत करावीत. ज्या देयकाचे प्रदान पुढील १० दिवसामध्ये करता येणार नसेल असे देयक कोषागारात विचारपुर्वक सादर करावे. देयक ९० दिवसांच्या आत CMP प्रणालीद्वारे प्रदानासाठी प्राधिकृत केले नाहीतर, प्रचलित पध्दतीप्रमाणेच व्यपगत होतील व प्रचलित कार्यपध्दतीने देयक पुन्हा सादर करावे लागेल. त्यासाठी व्यपगत धानादेशाची कार्यपध्दती लागू होईल.

१०) CMP प्रणालीवर आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना कोषागाराने पाठवलेल्या देयकांची प्रदानाची माहिती तपासून प्रदान प्राधिकृत करणे, देयकाच्या प्रदानांची स्थिती तपासून पाहणे, केलेल्या प्रदानांचा तपशील पाहणे, अयशस्वी प्रदानांचे कारण इत्यादी संबंधीची पाठवलेली माहिती पाहणे, पासवर्ड बदलणे, वेगवेगळे अहवाल मुद्रीत करणे यासारखी कामे करता येतील.

११) पासवर्ड विसरल्यास तो पुनर्प्रस्थापित करण्यासाठी CMP मार्फत रक्कम रुपये १००/- अथवा बँक वेळोवेळी ठरवेल एवढा सेवा आकार द्यावा लागेल. तो संबंधितांस व्यक्तीगत भरावा लागेल व या प्रक्रियेमध्ये प्रसंगी वेळही लागेल. यासाठी संबंधित व्यक्ति वैयक्तिक रित्या जबाबदार राहील.

१२) CMP पोर्टल हे कामकाजासाठी दररोज सकाळी ८.०० ते संध्याकाळी ८.०० या कालावधीत खुले राहील. प्रणाली व्यवस्थापनासाठी विशिष्ट दिनांकास पूर्वसूचना देऊन प्रणाली बंद राहू शकेल.

१३) आहरण व संवितरण अधिकाऱ्यानी आदात्याची Central Payee Master मध्ये नोंदणी करावयाची असून त्यांनी प्राधिकृत केल्यानंतरच प्रदान होणार आहे. त्यामुळे दोन्ही वेळेला अदात्याचे नाव आणि खाते क्रमांक योग्य असल्याची खात्री करणे अनिवार्य राहील. यामधील चुकामुळे होणाऱ्या चुकीच्या प्रदानास आहरण व संवितरण अधिकारी जबाबदार राहतील. कारण कोषागार अधिकाऱ्यांना यामध्ये बदल करण्याची सुविधा व अधिकार नाहीत.

१४) आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी प्राधिकृत केल्यानंतर CMP प्रदान प्रक्रिया करील. प्रत्येक प्रदानासाठी स्वतंत्र UTR क्रमांक दिसेल. खाते क्रमांकामधील तफावत वा अन्य कारणासाठी

प्रदान होऊ न शकल्यास CMP मार्फत संबंधित अदात्यांच्या नावे धनाकर्ष (Demand Draft) तयार करुन कोषागार कार्यालयास देण्यात येईल. संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी CMP पोर्टलला एखादे प्रदान अयशस्वी झाल्याचे दिसत असल्यास त्याच्या धनाकर्षाची स्थिती CMP पोर्टलला पाहून ते प्रदान धनाकर्षाद्वारे कोषागाराकडून प्राप्त करुन घ्यावे व प्रचलित पध्दतीप्रमाणेच ते आदात्यास अदा करावे.

१५) प्रस्तावित प्रणालीनुसार प्रदान होताना कोषागाराने देयकाचे प्रदान CMP पोर्टलला पाठवल्याचा लघुसंदेश/ई-मेल प्राप्त झाल्यानंतर अथवा अशी सूचना/संदेश प्राप्त झाला नाही तरी त्याची प्रतीक्षा न करता कोषागारातून CMP Advice Slip प्राप्त करुन त्या तपशीलाप्रमाणे बँक रोख पुस्तकाच्या जमा बाजूस नोंद घेण्यात यावी आणि प्रदान प्राधिकृत केल्यानंतर प्रदान यशस्वी होऊन UTR क्रमांक प्राप्त होताच अथवा प्रदानाची खात्री होताच त्या तपशीलासह बँक रोख पुस्तकाच्या खर्च बाजूस नोंद घ्यावी. हे व्यवहार थेट बँकेमार्फत होणार असल्याने सदरच्या नोंदी थेट सध्याच्या बँक रोखवही (Bank Cashbook) मध्ये नोंदवाव्यात. ज्या प्रकरणी प्रदान अयशस्वी होऊन धनाकर्ष (Demand Draft) घेण्यात येईल त्याप्रकरणी धनाकर्ष (Demand Draft) प्राप्त झाल्यानंतर प्रथम बँक रोख पुस्तकात खर्च बाजूस कारणासह तपशील नोंदवून नियमित रोख पुस्तकात (Main Cash Book) हस्तांतरीत अशी नोंद घ्यावी व त्याच बरोबर नियमित रोख पुस्तकात जमा बाजूसदेखील तपशीलासह नोंद घ्यावी. प्रदान अदात्यास अदा केल्यानंतर नियमित रोख पुस्तकात तशी नोंद घ्यावी.

**(टिप:- रुपये ५०००/- चे आतील देयकांसाठी ही व्यवस्था वैकल्पिक राहील).**

**ब) CMP प्रणाली संदर्भात कोषागार कार्यालयांनी अनुसरावयाची कार्यपध्दती.**

१) CMP पोर्टलला प्रदानाची माहिती (File) पाठविण्यासाठी व अनुषंगिक कामकाज करण्यासाठी CMP पोर्टलवर कोषागारासाठी Uploader आणि Verifier असे दोन स्वतंत्र User-ID आणि पासवर्ड उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. यापैकी uploader हा User Id धनादेश पर्यवेक्षकांनी तर Verifier हा User Id अप्पर कोषागार अधिकारी/कोषागार अधिकारी यांनी वापरावयाचा आहे. युजर आयडी प्राप्त होताच प्रथम लॉग-इन केल्यानंतर CMP मार्फत देण्यात आलेला पासवर्ड बदलणे सक्तीचे आहे तसेच त्याचवेळी युजर प्रोफाईलही अद्ययावत करणे गरजेचे आहे. युजर प्रोफाईल अद्ययावत करताना कोषागार कार्यालयाचा परिपुर्ण अद्ययावत पत्ता, कोषागार अधिकाऱ्यांचा भ्रमणध्वनी, दुरध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी इत्यादी माहिती अचूकपणे भरावी. या माहितीच्या आधारे CMP मार्फत माहितीची देवाणघेवाण होणार असल्याने ही माहिती अचूकपणे भरणे आवश्यक आहे. CMP पोर्टलला लॉग-इन करण्यासाठी युजर आय डी व पासवर्ड बरोबरच Bio-Metric प्रणालीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल.

२) प्रचलित कार्यपध्दतीप्रमाणे प्रदानांचा पर्याय (CMP/EFT/NEFT/Cheque) लेखा परिक्षा शाखेत निश्चित करण्यात यावा. देयकांची योग्य ती पडताळणी करुन देयके लेखा परिक्षा शाखेने पारित केल्यानंतर अशी देयके प्रदान करण्यापूर्वी प्रमाणक क्रमांक देण्यासाठी अप्पर कोषागार अधिकारी धनादेश यांच्या लॉग-इनला उपलब्ध होतील. अप्पर कोषागार अधिकारी, संगणक यांनी उचित तपासणी करुन देयकास प्रमाणक क्रमांक दिल्यानंतर देयके (प्रणालीमधून आणि प्रत्यक्षातही) धनादेश शाखेत जातात. EFT प्रदानासाठी वापरण्यात येणाऱ्या प्रचलित पध्दतीप्रमाणेच CMP प्रदानांच्या देयकावरही लिपिक/पर्यवेक्षक/अप्पर कोषागार अधिकारी यांनी कार्यवाही करावी. सध्या EFT File तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी कार्यपध्दती वापरुन CMP प्रदानाची File

तयार करण्यात यावी. (अप्पर कोषागार अधिकारी, धनादेश आणि पर्यवेक्षक यांचा पासवर्ड वापरुन CMP मार्फत करावयाच्या प्रदानांची इलेक्ट्रॉनिक File तयार करावी)

३) ट्रेझरीनेट प्रणालीमध्ये तयार झालेली CMP प्रदानाची File धनादेश पर्यवेक्षकाने CMP पोर्टलवर Uploader या लॉग-इनला जाऊन अपलोड करावी. त्यानंतर कोषागार अधिकारी/अप्पर कोषागार अधिकारी यांनी CMP पोर्टलवरील Verifier या लॉग-इन ला जाऊन Pending Validation या विकल्पामधून पर्यवेक्षकांनी Upload केलेली File तपासून मान्य (Approve) करावी. कोषागार अधिकारी/अप्पर कोषागार अधिकारी यांनी CMP Payment File Approve केल्यानंतरच सदरची File प्रदानासाठी CMP प्रणालीस अंतिमत: उपलब्ध होईल. कामकाजाच्या सोयीप्रमाणे धनादेश पर्यवेक्षक/कोषागार अधिकारी/अप्पर कोषागार अधिकारी CMP पोर्टलला जाऊन एकापेक्षा अधिक वेळा फाईल Upload करु शकतील. अथवा प्रदानास मान्यता देऊ शकतील. CMP पोर्टल कामकाजासाठी दररोज सकाळी ८.०० ते संध्याकाळी ८.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील.

४) CMP प्रदानासाठीही EFT प्रदानाप्रमाणे आहरण व संवितरण अधिकारी यांना CMP Advice Slip देऊन प्रणालीवर वितरण (Delivery) झाले असे दाखविण्यात येईल. CMP प्रदान सूचनापत्राचा स्वतंत्र नमुना प्रणालीवर तयार होईल.

५) CMP प्रणालीवर प्रदान अकार्यान्वित झाल्यामुळे प्रदानास मान्यता देता येत नाही, अथवा पुढील देयक ट्रेझरीनेट प्रणालीमध्ये स्वीकृत होत नाही, अशी तक्रार घेऊन आहरण व संवितरण अधिकारी आल्यास CMP प्रणालीवर कोषागाराच्या User Id ने लॉग-इन करुन संबंधित प्रदानास आणखी दोन दिवसांसाठी कार्यान्वित करुन देण्यात यावे व त्यासाठी संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून लेखी आवेदन पत्र घ्यावे. कोषागार अधिकारी यांनी प्रदान पुन्हा: कार्यान्वित केल्यानंतर संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना प्रथम प्रलंबित प्रदानास CMP पोर्टलवर जाऊन मान्यता दयावी लागेल.. त्यानंतर CMP मार्फत दुसऱ्या दिवशी पाठवलेल्या अकार्यान्वित प्रदानांची माहितीमध्ये सदरचे प्रदान नसल्याची नोंद ट्रेझरीनेट प्रणालीमध्ये झाल्यानंतरच संबंधितांचे पुढील देयक स्विकारले जाईल. असे वारंवार घडूनही अंतिमत: संबंधित प्रदानास आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी ९० दिवसांमध्ये मान्यता दिली नाही, तर प्रचलित कार्यपध्दतीप्रमाणे सदरचे प्रदान व्यपगत होऊन त्यास कोषागारामार्फत मा. महालेखापाल कार्यालयाची मान्यता लागेल तसेच व्यपगत धनादेशाची कार्यपध्दती वापरुन आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना दुसऱ्यांदा देयक सादर करावे लागेल.

६) कोषागाराने CMP पोर्टलवर प्रदानार्थ पाठवलेली व संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी CMP पोर्टलवर प्रदानार्थ मान्यता दिलेली प्रदाने अदा करुन, त्यांचा प्रदान लेखापट (Payment Scroll) CMP शाखा, अंधेरी -पूर्व, स्टेट बँक ऑफ इंडिया ही कोषागार कार्यालयाच्या स्थानिक अभिकर्ता बँकेमार्फतच कोषागारास पाठवेल. तसेच कोषागारास त्यांच्या लॉग-इन मध्ये प्रदान लेखापट (Payment Scroll) download करुन घेण्याची सुविधा उपलब्ध आहे. कोषागारास उपलब्ध केलेल्या लॉग-इन वरुन प्रदान लेख्याची छापील प्रत (Print out) प्राप्त करुन घेण्याची सुविधा आहे.

७) प्रचलित पध्दतीप्रमाणेच CMP मार्फत केलेल्या प्रत्येक प्रदानाचा ताळमेळ (Reconciliation) घेणे धनादेश शाखेचे काम राहील. त्यासाठी CMP पोर्टलवरुन Download केलेला Payment Scroll ट्रेझरीनेट प्रणालीमध्ये upload करण्यात यावा. तसेच धनादेश शाखेमार्फत CMP Payment Scroll चे प्रत्येक प्रदान हे कोषागाराने पारित केलेल्या देयकाचेच असल्याची खात्री करण्यात यावी. एखादे देयकाचे प्रदान अमान्य असल्यास लगेचच तसे CMP प्रणाली

प्रशासकास कळविण्यात यावे. CMP Payment Scroll कोषागाराने प्राधिकृत केलेल्या प्रदानांशी जुळल्यानंतर स्थानिक अभिकर्ता बँकेने पाठवलेला स्क्रोल व CMP प्रणालीवरुन Download केलेल्या स्क्रोलच्या रकमा एकमेकांशी तसेच कोषागाराच्या प्रदानांशी परिपूर्णपणे जुळत असल्याची खात्री करावी. अशा प्रकारे सर्व तपासण्या झाल्यानंतरच CMP प्रदानाचा कोषागाराने प्राधिकृत केलेल्या प्रदानांशी ताळमेळ झाला असे समजण्यात येईल.

८) कोणत्याही विशिष्ट वेळी CMP पोर्टलला दिसणारी कोषागाराची प्रलंबित प्रदाने आणि ट्रेझरीनेट प्रणालीमधील CMP विकल्पाची प्रलंबित प्रदाने एकमेकांशी तंतोतंत जुळतील.

९) कोणत्याही विशिष्ट कालावधीसाठी CMP ने केलेली प्रदाने आणि ट्रेझरीनेट प्रणालीमध्ये encash म्हणून दाखवलेली CMP प्रदानेही एकमेकांशी तंतोतंत जुळतील.

१०) CMP प्रणालीने दुसऱ्या बँकांना NEFT अथवा इतर मार्गाने केलेली प्रदाने प्रथम आदात्याच्या खात्यामध्ये पारेषित होऊनही जमा न झाल्यास, CMP मार्फत संबंधित अदात्यांच्या नावे धनाकर्ष/बँकर्स चेक तयार करुन कोषागार अधिकाऱ्यांना पाठविण्यात येईल. यासाठी कोषागाराने स्वतंत्र धनादेश नोंदवही ठेवावी. CMP कडून प्राप्त झालेले धनाकर्ष कोषागार अधिकाऱ्यांनी संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना अथवा त्यांचे अधिकृत दूतवाहकास ओळखपत्र पाहून व पेपर टोकन घेऊन हस्तांतरित करावे. वितरीत केलेल्या सर्व धनाकर्षांच्या परिपुर्ण नोंदी धनाकर्ष नोंदवहीमध्ये घ्याव्यात. (कोणत्या प्रकरणी धनाकर्ष पाठवलेले आहेत याची माहिती CMP पोर्टलला लगेचच कोषागार अधिकारी आणि संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना दिसेल.)

११) कोषागाराच्या अधिनस्थ असणाऱ्या सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचे/नव्याने अस्तित्वात येणाऱ्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचे User Id/Password हे CMP मार्फत बंद लिफाफ्यामधून टपालाद्वारे कोषागारांस देण्यात येतील. कोषागार कार्यालयाने योग्य ती खातरजमा करुन सदरचे बंद लिफाफे संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना समक्ष उपस्थितीत द्यावेत. व त्यासंबंधीची उचित पोच घ्यावी. हे लिफाफे प्राधिकारपत्रधारक अथवा संदेशवाहकाकडे देऊ नयेत. भविष्यात आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचे पासवर्ड काही कारणास्तव पुनर्स्थापित करावे लागल्यास त्यांचेही पासवर्ड हे CMP मार्फत बंद लिफाफ्यामधून टपालाद्वारे कोषागारांस देण्यात येतील व कोषागारास ते योग्य ती खातरजमा करुन संबंधितास वितरित करावे लागतील.

१२) कोषागार अधिकाऱ्यांना CMP पोर्टलवर खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध असतील.

A) प्रदानांची माहिती CMP पोर्टलला अपलोड करणे आणि मान्यता देणे.

B) तारिखनिहाय झालेल्या प्रदानांचे (Payment Scroll) Download करणे.

C) CMP ला पाठवलेली प्रदाने आणि झालेली प्रदाने यांचा ताळमेळ घेणे.

D) १० दिवसापेक्षा आधिक कालावधीमुळे अकार्यान्वित प्रदाने आहरण व सवितरण अधिकाऱ्यांच्या विनंतीप्रमाणे पुन्हा कार्यान्वित करणे.

E) पासवर्ड बदलणे.

F) प्रदानांचे MIS अहवाल पाहणे.

*****

(शासन निर्णय क्र. संकीर्ण १०१०/प्र. क्र. ६८/भाग - ३/कोषा प्र ५, दिनांक २२ जानेवारी, २०१३ चे जोडपत्र)

## परिशिष्ठ - अ

| अ. क्र. | विभागाचे नाव | जिल्हयांची नावे | CMP ची प्रदान प्रणाली सुरु करण्याची नियोजित तारीख |
|---|---|---|---|
| १ | कोकण | ठाणे, सिंधुदुर्ग | १५.०४.२०१३ |
| २ | पुणे | सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर | १५.०४.२०१३ |
| ३ | नाशिक | अहमदनगर, जळगाव, नंदुरबार, धुळे | १५.०४.२०१३ |
| ४ | नागपूर | गोंदिया, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली | १५.०५.२०१३ |
| ५ | अमरावती | अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम | १५.०५.२०१३ |

*****

सामान्य प्रशासन
शा. नि. आ. ११
२२५४१९३

(३०)

**विविध विकास योजनेच्या संदर्भात लाभार्थींच्या बँक खात्यात थेट रोख रक्कम हस्तांतरीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग,**
शासन निर्णय क्र. संकीर्ण १०१०/प्र. क्र. ६८/भाग - ४/ कोषा प्र ५,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २४ जानेवारी, २०१३.

**संदर्भ:-** १) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण १०१०/प्र. क्र. ६८/ कोषा प्र ५, दि.२३.१२.२०१०.
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण १०१०/प्र. क्र. ६८/ कोषा प्र ५, दि. १८.०४.२०११.

**प्रस्तावना:-** शासनामार्फत विविध योजनांतर्गत होणारी प्रदाने कोषागारांमार्फत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांमार्फत संबंधीत मागणीदारास अथवा लाभार्थ्यांस करण्यात येते. सदरची प्रदाने करतांना कोषागारांनी आहरण व संवितरण अधिकाऱ्यास व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी संबंधीत मागणीदारास अथवा लाभार्थ्यांस ईसीएस / एनईएफटी सुविधा वापरून करणेबाबत संदर्भांकीत क्र. १ व २ चे शासन निर्णयानुसार आदेशीत केले आहे. केंद्र शासनातर्फे दिली जाणारी विविध अनुदाने थेट लाभार्थ्यांचे खात्यात जमा करणेबाबत केंद्र शासनाचे धोरण ठरले आहे. त्याअनुषंगाने त्याच धर्तीवर राज्य शासनाच्या विविध योजनांमध्ये दिले जाणारे अर्थसहाय्य थेट लाभार्थ्यांच्या आधार कार्ड निगडीत खात्यात जमा करणेबाबत कार्यवाहीचा निर्णय विचाराधीन होता. त्याअनुषंगाने खालील कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-** कोषागारातून आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचे खात्यात रक्कम जमा होईल. त्यानंतर केंद्र व राज्य शासनाच्या योजनांतर्गत वितरीत करावयाचे अनुदान / अर्थसहाय्य थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये (आधारपत्र निगडीत बँक खात्यामध्ये) जमा करण्यात यावे. या बाबतची कार्यपध्दती पुढील प्रमाणे असावी.

१) लाभार्थी निश्चित करताना आधार कार्ड निगडीत बँक खाते क्रमांक मिळवावा. सदरची बँक कोअर बँक सुविधा असलेली असावी.
२) बँक निहाय अर्थसहाय्य / अनुदान प्राप्त लाभार्थी यादी तयार करुन लाभार्थ्यांचे खात्यात थेट जमा करणेसाठी ज्या बँकेत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचे खाते आहे त्या बँकेस कळवावे. बँकेस लाभार्थ्यांची यादी पाठवितांना त्यामध्ये लाभार्थ्यांचे नाव, रक्कम UID / EID क्रमांक या तपशीलाचा समावेश असावा.
३) सदर बँकेने संबंधीत लाभार्थ्यांचे खात्यात यादीप्रमाणे रकमा जमा करावी.
४) सदरची योजना खालील सहा जिल्हयांकरीता पथदर्शी प्रकल्प म्हणून राबविण्यात येत आहे.
**जिल्हे** :- पुणे, नंदुरबार, वर्धा, अमरावती, मुंबई शहर, मुंबई उपनगरे
५) दि. १ फेब्रुवारी, २०१३ पासून सर्व प्रकारच्या शिष्यवृत्त्या व दि. १ मार्च, २०१३ पासून लाभार्थ्यांच्या सर्व योजनांचे थेट प्रदान उपरोक्त जिल्हयांमध्ये या पध्दतीने करणे बंधनकारक राहील.

यासाठी वित्त विभागाने लाभार्थ्यांच्या खात्यात EBT (NEFT / RTGS) चा वापर करुन रक्कम जमा करण्याच्या सूचना उपरोक्त संदर्भांकीत क्र. २ मधील शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या आहेत. सदर जमा होणाऱ्या रक्कमेकरीता मर्यादा निश्चित करण्यात आलेली नाही.

वरील सर्व व्यवहारांसाठी संबधीत बँकांनी कोणतेही शुल्क अथवा कमीशन आकारावयाचे नाही. तसेच असे आकार मागणीदारांना देय रकमेतून वसूल करावयाचे नाही.

वरील तरतूदींच्या अनुषंगाने महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील व जिल्हा कोषागारांच्या मार्गदर्शनासाठी धनादेशाद्वारे प्रदानांच्या कार्यपध्दतीच्या नियमावलीतील संबंधीत नियमामध्ये यथावकाश सुधारणा करण्यात येईल.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील सर्व महामंडळे, शासकीय / निमशासकीय / अनुदानित स्वायत्त संस्था, अनुदानित कृषी / अकृषीक विद्यापीठ स्थानिक स्वराज्य संस्था यांना सुध्दा लागू राहील.

सदर शासन निर्णय शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१३०१३११२२३५३४६०५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(अ. म. जाधव)
कार्यासन अधिकारी

प्रति
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
प्रधान सचिव, वन विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
महालेखापाल (ले. व अ.) - १, महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल (ले. व अ.) - २, महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल (लेखा परीक्षा) - १, महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल (लेखा परीक्षा) - २, महाराष्ट्र, नागपूर
प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा), मुंबई
प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
महा व्यवस्थापक, लोक लेखा विभाग, भारतीय रिझर्व्ह बँक, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ (पत्राने)
महा व्यवस्थापक, भारतीय स्टेट बँक, स्थानिक प्रधान कार्यालय, प्लॉट क्रमांक सी - ६, जी ब्लॉक, बांद्रे - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१ (पत्राने)
उप महा व्यवस्थापक, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, प्रादेशिक कार्यालय, टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद (पत्राने)
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
सह संचालक, लेखा व कोषागारे, पुणे / नाशिक / औरंगाबाद/अमरावती/नागपूर/कोकण, नवी मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व उप कोषागार अधिकारी
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, कोषा प्र ५

*****

सामान्य प्रशासन
प्रा.स.शा. ९२
२२।०४।१३.

(३२)

**बाहय यंत्रणेकडून (आऊटसोर्सिंग द्वारे) कामे करुन घेण्याबाबत मार्गदर्शक सूचना**

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**शासन परिपत्रक - क्रमांकः क्र. पदनि २०१३/प्र.क्र. ११/१३/विसु-१**

मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२.

तारीख: २ फेब्रुवारी, २०१३.

**संदर्भ - शासन परिपत्रक क्र. पदनि २०१०/८४/१०/विसु-१, दिनांक : २७ सप्टेंबर, २०१०.**

**- परिपत्रक -**

प्रशासनावरील खर्च आटोक्यात ठेऊन विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रशासकीय विभागांनी पदनिर्मितीचे प्रस्ताव सादर करतांना विचारात घ्यावयाचे मुद्दे संदर्भाधिन परिपत्रकाद्वारे प्रसृत करण्यात आले आहेत. या परिपत्रकामध्ये शक्य असेल तेथे पदनिर्मिती न करता सदर पदाची कामे बाहय यंत्रणेद्वारे करुन घेण्यात यावीत असे सूचित करण्यात आले आहे. बाहय यंत्रणेद्वारे कामे कशा प्रकारे करुन घ्यावीत याची विचारणा प्रशासकीय विभागाकडून या विभागाकडे करण्यात येत आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेता बाहय यंत्रणेद्वारे काम करुन घेण्याबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक मुद्दे नमूद करण्यात येत आहे :-

१) बाहय यंत्रणेदवारे काम करून घेणे म्हणजे आवश्यक कामे ठेकेदार / कंपनी / संस्थेकडून शासनाचे विहीत पध्दीतीने निविदा मागवून सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने करुन घेण्यात यावीत.

२) संबंधित विभाग / कार्यालयाने ज्या कंपनीस / संस्थेस काम सोपवावयाचे आहे त्यांचे बरोबर त्याबाबतचा करार करावा. सदर करारात आवश्यकतेनुसार संबंधित विभाग कार्यालयांनी

अटी व शर्ती नमूद कराव्यात. या करारामध्ये कंपनी / संस्थेतर्फे काम करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

३) बाहय यंत्रणेद्वारे काम करुन घेण्याकरीता कोणतीही पदनिर्मिती केली जाणार नाही.

४) बाहय यंत्रणेद्वारे काम करुन घेण्याच्या कामाचे प्रदान "वेतन" या तपशीलवार शिर्षाखाली न दाखविता "कार्यालयीन खर्च" या तपशीलवार शिर्षाखाली दाखविणे आवश्यक आहे.

५) बाहय यंत्रणेद्वारे कामे करुन घेताना, जर ती कामे नियमितपणे पदनिर्मिती करुन केली असता जितका खर्च आला असता त्या खर्चाच्या कमीत कमी १० ते २५ टक्के इतकी बचत होईल अशारितीने करुन घेण्यात यावीत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक क्रमांक २०१३०१३०१२१४२१०२०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satpute Shankar Ganapati

Digitally signed by Satpute Shankar Ganapati
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=FD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Satpute Shankar Ganapati
Date: 2013.02.02 15:52:22 +05'30'

(शं.ग. सातपुते)

उपसचिव

प्रत,

सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य,

मा. राज्यपालांचे सचिव,

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक

मा. मुख्य सचिव यांचे सचिव सचिव.

सर्व मंत्रालयीन विभाग,

महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.

सर्व सहसचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

विभागातील सर्व कार्यासने.

वित्तीय सुधारणा कार्यासन संग्रहार्थ.

----------

(३५)

बाह्य यंत्रणेकडून (आऊटसोर्सिंगद्वारे)

कामे करुन घेण्याबाबत मार्गदर्शक सूचना

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**शासन शुध्दिपत्रक क्र. पदनि २०१३/प्र.क्र.११/१३/विसु-१**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

तारीख: २१ फेब्रुवारी, २०१३.

**संदर्भ : शासन परिपत्रक, क्रमांक - पदनि २०१३/प्र.क्र.११/१३/विसु-१, दिनांक - ०२/०२/१३.**

<u>शुध्दिपत्रक</u> -

उपरोक्त विषयांकित संदर्भाधिन शासन परिपत्रक दि. ०२.०२.२०१३ च्या शेवटच्या परिच्छेदातील "सदर शासन निर्णय" या शब्दाऐवजी "सदर शासन परिपत्रक" असे वाचण्यात यावे.

सदर शुध्दिपत्रक हे महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१३०२२११४०६०८०२०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satpute Shankar Ganapati

(शं.ग. सातपुते)

उप सचिव

[ कु. म ा. प.

शासन शुध्दिपत्रक क्र. मदवि २०१३/प्र.क्र.११/१३/विसु-१, दि २१/०२/१३

प्रत,

१. सर्व विधान सभा / विधान परिषद सदस्य

२. मा.राज्यपालांचे सचिव

३. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

४. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक

५. मा.मुख्य सचिव यांचे सचिव

६. सर्व मंत्रालयीन विभाग

७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.

८. सर्व सहसचिव / उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, मंत्रालय, मुंबई.

९. विभागातील सर्व कार्यासने.

१०. वित्तीय सुधारणा कार्यासन संग्रहार्थ.

८६

सामान्य प्रशासन
शा. वि. आ. १३
२३/५/१३

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना
दि. १ जुलै, २०१२ ते दि. ३१ ऑक्टोबर, २०१२
या कालावधीतील महागाई भत्त्याची थकबाकी
देण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**
*वित्त विभाग*
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
शासन निर्णय क्रमांक मभवा-१११२/प्र.क्र.१५/सेवा-९
दिनांक:- ५ मार्च, २०१३.

संदर्भ:- शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:- मभवा-१११२/प्र.क्र.१५/सेवा-९ दि. ८ नोव्हेंबर, २०१२.

## शासन निर्णय

शासन निर्णय समक्रमांक दि. ८ नोव्हेंबर, २०१२ अन्वये राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना दि. १ जुलै, २०१२ पासून सुधारित वेतनसंरचनेतील मूळ वेतनावरील (वेतनबँडमधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ६५% वरून ७२% करण्यात आला आहे. तसेच दि. १ नोव्हेंबर, २०१२ पासून सदर महागाई भत्त्याच्या वाढीची रक्कम रोखीने देण्यात आली आहे.

२. शासन आता असे आदेश देत आहे की, राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना दि. १ जुलै, २०१२ ते दि. ३१ ऑक्टोबर, २०१२ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम रोखीने देण्यात यावी.

३. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे त्याचप्रकारे यापुढे लागू राहील.

४. सदर आदेश सुधारित वेतनसंरचनेत वेतन अनुज्ञेय असलेल्या संस्थांमधील कर्मचाऱ्यांना योग्य त्या फेरफारासह लागू राहतील.

५. यावर होणारा खर्च संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, संबंधित प्रमुख लेखाशीर्षाखालील ज्या उप लेखाशीर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखाशीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक 201303051544518405 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(शि. म. म्हात्रे)
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,
राज्यपालांचे सचिव
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा-अहमदनगर

मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन , मुंबई
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
मंत्रालयीन सर्व विभाग
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख
# प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
# प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
# सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
# सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
# प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
#आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
# सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
#प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद
राज्य महिला आयोग, वरळी ,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
सर्व लेखाधिकारी, वेतन पडताळणी
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद
कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
कुलसचिव, महाराष्ट्र पशू व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई / पुणे/ नागपूर/ औरंगाबाद /नाशिक/ अमरावती.
बहूजन समाज पार्टी, डी-1 इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-1
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ., बॅरेक क्रमांक 1, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-20
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, 314, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-4
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-13
इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस(आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-25
नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट ,मुंबई-21
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-28
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-9)

—x—

एन-2506-13अ